**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.:तोंडी उत्तरे.**

**अकोला जिल्हा परिषदेतील महिला व बालकल्याण विभागाच्या साहित्य वाटपातील लाभार्थींच्या नावामध्ये सिनेसृष्टीतील नामवंत अभिनेत्री यांच्या नावाचा खोटा वापर करुन केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१) * ३३५१६ श्री. रमेश निकोसे , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री.राजन तेली , श्री. गोविंदराव आदिक , मेजर सुधीर सावंत , श्री. सुधाकर गणगणे , श्री. सुरेश जेथलिया , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेतील महिला व बालकल्याण विभागाच्या साहित्य वाटपात लाभार्थ्यांच्या यादीत माधुरी दीक्षित, श्रीदेवी, सोनाली व भाग्यश्री या अभिनेत्रींच्या नावाचा वापर करुन पदाधिकारी व कर्मचारी यांनी संगनमताने लाखो रुपयांचा घोटाळा केल्याचे माहे सप्टेंबर, २००७ रोजी वा त्यादरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) नाही,

तथापि, सन २००६-२००७ च्या लाभार्थी यादीमध्ये माधुरी, सोनाली, भाग्यश्री इ. नांवे आहेत. परंतु या लाभार्थ्यांच्या वडिलांचे नाव व आडनांव वेगवेगळे असून ते ग्रामीण भागातील रहिवाशी असल्याबाबत सरपंचांचे प्रमाणपत्र आहे. त्यामुळे सिनेसृष्टीतील नामवंत अभिनेत्रींच्या नावांच्या लाभार्थी म्हणून खोटा वापर करण्यात आलेला नाही. परंतु दिनांक २५ ऑगस्ट, २००७ चे सुमारास काही वृत्तपत्रांमध्ये तथ्यहिन बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत.
(२) होय,
(३) चौकशीत कोणतीही गैरप्रकार आढळून न आल्याने कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माधुरी, सोनाली, भाग्यश्री या लाभार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आलेले आहे त्यामुळे माधुरी, सोनाली, भाग्यश्री यांच्या वडिलांची नाव व अडनावे काय आहेत तसेच या मुली कोणत्या गावाच्या रहिवासी आहेत आहेत याची माहिती देण्यात यावी. तसेच या प्रकरणाची चौकशी कोणत्या अधिका-याने केली व या चौकशीचे स्वरूप काय होते?

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 35516.....

श्री. हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, वर्तमानपत्रात माधुरी, भाग्यश्री, सोनाली यांना सायकलींचे वाटप करण्यात आलेले आहे अशी माहिती आलेली आहे. माधुरी, सोनाली, भाग्यश्री अशी नावे कोणाचीही असू शकतात. या मुलींच्या वडिलांचे नावे अडनावे पुढील प्रमाणे आहेत. माधुरी रामनाथ वाघमारे, ता. तेलारा, सोनाली अशोक वानखेडे अशी माझ्याकडे 24 नावे आहेत. माधुरी, सोनाली, भाग्यश्री ही मुलींची नावे असून, कोणत्याही सायकलीचे वाटप माधुरी दिक्षितला करण्यात आलेले नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अकोला जिल्हापरिषदेमधील महिला बालकल्याण विभागाच्या माध्यमातून माधुरी, सोनाली, भाग्यश्री यांना सायकलीचे वाटप करण्यात आलेले आहे. महिला बालकल्याण विभागाच्या माध्यमातून हे वाटप करीत असतांना त्यासाठी जे नियम असतात त्या नियमांचे पालन न करता वस्तुंचे वाटप करण्यात आलेले आहे. वस्तुंचे वाटप करतांना तेथील पदाधिका-याला विश्वासात न घेता, पदाधिकां-यांना वाटपाची यादी न दाखवता तेथील अधिका-यांनी वस्तुंचं परस्पर वाटप केलेले आहे. जिल्हापरिषदेच्या पदाधिका-यांना विश्वासात न घेता, त्यांची सही न घेता वस्तूंचे वाटप परस्पर करण्यात आलेले आहे काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, वाटपाच्या संदर्भातील सगळया योजना जिल्हापरिषद आपल्या 10 टक्के सेसफंडातून करीत असते. वस्तू वाटपाच्या संदर्भात जे डायरेक्शन दिलेले आहे त्या प्रमाणे स्थानिक पदाधिका-यांच्या मान्यतेने हे वाटप केले जात असते. माननीय विरोधीपक्ष नेते म्हणतात त्या प्रमाणे या जिल्हा परिषदेमध्ये प्रकार घडला असेल तर यासंदर्भात चौकशी करुन जरुर कारवाई केली जाईल.

--------------

**मुंबई औरंगाबाद रस्त्याचे चौपदरीकरणाचे कामाबाबत**

**(२) * ३६५२७ श्री.अरुण गुजराथी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई औरंगाबाद रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम सुरु आहे हे खरे काय,

(२) असल्यास, सदरच्या कामाची सद्यस्थिती काय,

(३) सदरचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येईल ?

**श्री.छगन भुजबळ** : (१) होय,

(२) मुंबईहून औरंगाबादला जाण्याकरिता दोन मार्ग उपलब्ध आहेत. त्यापैकी-

१. मुंबई-पुणे-शिरुर- अहमदनगर-औरंगाबाद : या लांबीतील मुंबई ते पुणे व पुणे ते शिरुर या मार्गाचे चौपदरीकरण पूर्ण झाले असून शिरुर ते औरंगाबाद या लांबीतील चौपदरीकरणाचे काम प्रगतीत आहे.

२. मुंबई-नाशिक-वैजापूर- औरंगाबाद- या लांबीतील मुंबई ते नाशिक या मार्गाचे चौपदरीकरण भारतीय राजमार्ग प्राधिकरण या संस्थेमार्फत प्रगतीत आहे. तसेच नाशिक ते औरंगाबाद या लांबीतील (१८५ कि.मी.) पैकी काही कि.मी. चे काम प्रगतीत आहे.

(३) मे २०१० अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**सभापती** : ता. प्र. क्र. 36527 हा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी विचारलेला आहे परंतु ते आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे हा प्रश्न विचारण्याची संधी सन्माननीय सदस्य श्री. गिरीश गांधी यांना देण्यात यावी यासंदर्भात त्यांनी अधिकृत पत्र दिलेले आहे. नियम 86 प्रमाणे सन्माननीय सदस्य असे अधिकृत पत्र देऊ शकतात. परंतु सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. गिरीश गांधी हे देखील उपस्थित नसल्यामुळे पुढील प्रश्न पुकारण्यात येत आहे.

( मा.सदस्य अनुपस्थित )

----------------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईच्या वांद्रे वरळी सागरी पूलाच्या प्रकल्पात राज्य रस्ते विकास महामंडळाने अनेक बदल केल्यामुळे पुलाचे काम बंद पडल्याबाबत**

**(३) * ३३५२२ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , मेजर सुधीर सावंत , श्री. धनाजी साठे , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. दिपक सावंत , श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , श्री. प्रकाश शेंडगे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या वांद्रे वरळी सागरी पूलाच्या प्रकल्पात राज्य रस्ते विकास महामंडळाने अनेक बदल केले आहेत, तसेच पुलाचे काम सध्या संपूर्णत: बंद पडलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर फेरबदल केल्याने सागरी पूलाचा खर्च सुमारे ८०० कोटी रुपयांच्यावर गेला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वांद्रे-सागरी पूलाचे काम करणाऱ्या हिंदूस्तान कन्स्ट्रक्शन कंपनी व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामध्ये सध्या पुलाच्या प्रस्तावाबाबत व वाढीव खर्चाबाबत आर्थिक वाद सुरु असून ८०० कोटी रुपयांच्या कामांपैकी हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनीला शासनाच्या रस्ते विकास महामंडळाने फक्त २४३ कोटी रुपये दिले असून उर्वरित रक्कम तात्काळ न दिल्यास वांद्रे-वरळी प्रकल्पाचे काम थांबविण्याची धमकी उपरोक्त कंपनीने शासनाला दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) सदरहू पुलाचे उर्वरित काम शीघ्रगतीने हाती घेऊन त्वरीत पूर्ण होण्याचे दृष्टीने शासनाने कोणती खास उपाययोजना केली आहे, तसेच पुलाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.अनिल देशमुख** : (१) वांद्रे वरळी सागरी पूलाच्या प्रकल्पात फेरबदल केले हे खरे आहे. पुलाचे काम सुरु आहे.
(२) फेरबदल तसेच भाववाढ व पुलाच्या कामासाठी घेतलेल्या कर्जावरील व्याज इत्यादी बाबी समाविष्ट करुन प्रकल्पाची सुधारीत किंमत रुपये १३०६ कोटी आहे.
(३) कंत्राटदाराने सादर केलेल्या देयकांचे प्रदान महामंडळाकडून करण्यात आले आहे. कंत्राटदाराने काम थांबविण्याची धमकी दिली नाही.
(४) सदरहू पुलाचे उर्वरित काम निविदा वेळापत्रकाप्रमाणे डिसेंबर, २००८ अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मुंबईच्या वांद्रे वरळी सागर पुलाच्या प्रकल्पात राज्य रस्ते विकास महामंडळाने कोणकोणते बदल केलेले आहेत? कंत्राटदारांनी सादर केलेल्या देयकाची किती रक्कम कंत्राटदारांना आतापर्यंत देण्यात आलेली आहे व अजून किती रक्कम देण्याचे बाकी आहे?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, वांद्रे वरळी सिलिंग प्रोजेक्ट आहे. त्यामध्ये बदल करण्यात आलेला आहे. ओरिजनल ढाच्यामध्ये अनेक बदल करण्यात आलेले आहेत. वरळी साईडचा पूल अर्धा कि.मी. समुद्रातून घेतलेला आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33522.....

श्री.अनिल देशमुख.............

त्यामध्ये 300 मीटर्स ॲडीशनल घेतले. मूळ डिझाईनमध्ये बदल करण्यात आला आहे. वांद्रे-वरळी सागळी पूल प्रथम 8 लेनचा एकत्रित सागरी मार्ग होता. परंतु आता तो चार-चार लेनमध्ये केलेला आहे. त्यामुळे डिझाईनमध्ये फरक झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी कंत्राटदारांचे देयक देण्यात आलेले आहे का, असा प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, कंत्राटदाराचे कोणत्याही प्रकारचे देयक राज्य रस्ते विकास महामंडळाकडे प्रलंबित नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वांद्रे-वरळी सागरी पुलाचा मूळ आराखडा बदलण्याचे कारण काय ? दोन्ही बाजूला जी केबल नेटस होती त्याची किंमत 364 कोटी रूपये होती. असे कोणते कारण घडले की, ज्यामुळे पुलाच्या मूळ आराखड्यात बदल करावा लागला आणि त्यामुळे खर्चाच्या रकमेत दुप्पट वाढ झाली ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, वांद्रे-वरळी सागरी पुलाची मूळ किंमत 666 कोटी होती. वांद्र-वरळी सागरात पूल होणार म्हणून तेथील मच्छिमार बांधवांनी आंदोलन केले. प्रस्तावित केलेल्या डिझाईनमध्ये पूल बांधल्यास मच्छिमार करणे अडचणीचे होईल. तेव्हा त्यांनी या डिझाईनमध्ये बदल करण्याबाबत मच्छिमारांकडून विनंती करण्यात आली होती. हा पूल आत समुद्रात घ्यावा अशी त्यांची मागणी होती. त्यामुळे पूल आतमध्ये घ्यावा लागला. मूळ डिझाईनमध्ये बदल करावा लागला. पुला खालून मच्छिमारांच्या बोटींना जाता येईल ही बाब विचारात घेऊन पुलाची उंची वाढविली आहे. त्यामुळे चेंज इन अलाइनमेंट आले. तसेच मुंबई महानगरपालिकेची जागा घेतल्यामुळे महानगरपालिकेस 100 कोटी रुपये द्यावे लागले. इंटरेस्ट बॉरोईंगचे 90 कोटी रुपये झाले त्यामुळे या पुलाच्या खर्चामध्ये जवळपास 640 कोटी रुपयांची वाढ झालेली आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले की, या प्रकल्पामध्ये 640 कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. मागील अधिवेशनातसुध्दा हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. आता एकूण प्रकल्पाची किंमत 1300 कोटी रुपये झालेली आहे. त्यातील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33522.....

श्री.प्रकाश शेंडगे...........

800 कोटी रुपयांची तरतूद मंजूर करून घेतलेली आहे. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले की, कोळी बांधवांनी आंदोलन केल्यामुळे सागरी मार्ग आतमध्ये घ्यावा लागला त्यामुळे स्पॅन वाढला. मला अशी माहिती पाहिजे की, सिमेंट आणि स्टीलच्या किंमतीमध्ये वाढ झाल्यामुळे किती खर्च वाढला ? कंत्राटदाराला 900 कोटी रुपये वाढवून देण्याऐवजी कोळी बांधवांना 100 कोटी रुपये दिले असते तर त्यांनी आपला व्यवसाय करण्यासाठी नेटस् व इतर साहित्य घेतले असते. हा प्रॅक्टीकली मार्ग होता. शासनाने यावर का विचार केला नाही ? तेव्हा याबाबतचा अहवाल मंत्रिमहोदय सभागृहाच्या पटलावर ठेवतील काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, इंटरेस्ट बॉरोईंग आणि मुंबई महानगर पालिकेला 100 कोटी रुपये दिल्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये 640 कोटी रुपयांनी वाढ झाली. त्याची माहिती मी नंतर सभागृहाच्या पटलावर ठेवतो. कंत्राटदारांचे कोणतेही देयक प्रलंबित नाही. यापूर्वी मुंबईचा लॅन्डमार्क म्हणून गेट वे ऑफ इंडियाकडे पाहिले जात होते. वांद्रे-वरळी सागरी पूल झाल्यानंतर तो एक मुंबईतील लॅन्डमार्क होणार आहे. पुढील वर्षी डिसेंबर अखेरपर्यंत हा सागरी पूल रहदारीसाठी खुला करणार आहोत. बिझनेस विकली या साप्ताहिकाने या सागरी पुलाचा भारतातील टेन वन्डर्समध्ये समावेश केलेला आहे.

यानंतर श्री. पुरी.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33522....

श्री.अनिल देशमुख....

डिस्कव्हरी ऑफ इंडिया, नॅशनल जिओग्राफी चॅनलवरही हा "पूल वंडर ऑफ इंडिया" म्हणून दाखवला जातो. याठिकाणी मी हेही सांगू इच्छितो की, आपल्याकडे अनेक परदेशी पाहुणे येत असतात, त्यावेळी ते या पुलास भेट देत असतात. नुकत्याच ब्रिटीशच्या पंतप्रधान, जर्मनीच्या प्रेसिडेंट या परदेशी पाहुण्यांनी बांद्रा-वरळी सी-लिंक पुलाला भेट दिलेली आहे. परदेशी पाहुणे मोठया प्रमाणात या पुलाला भेट देतात. हा प्रोजेक्ट अतिशय महत्वाचा आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, प्रश्न कोणता विचारला जात आहे आणि त्यास मंत्रिमहोदयांकडून उत्तर कोणते दिले जात आहे, तेच समजत नाही. मुळात आपण हा बांद्रा-वरळी सागरीसेतू मुंबईतील वाहतुकीची अडचण दूर करण्यासाठी बांधत आहोत. वंडर ऑफ इंडियासाठी किंवा वंडर्स ऑफ वर्ल्डसाठी बांधत नाहीत, असे मला वाटते. या पुलाचा मूख्य उद्देश हा मुंबईतील वाहतुकीची कोंडी होऊ नये या उद्देशाने आपण बांधणार आहोत. तो पूल आपण 10 वंडर ऑफ इंडियाच्या दृष्टीकोनातून बांधणार असाल, तर ते आपण स्वीकारा, त्याबद्दल मला काहीही बोलायचे नाही. परंतु यामध्ये एच.एस.हिंदुस्थान कंस्ट्रक्शन कंपनी विरुध्द एम.एस.आर.डी.सी.चे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून याबाबतीत वाटाघाटी करण्याच्या दृष्टीने माननीय मंत्रिमहोदय प्रयत्न करीत आहे व अजून या पुलाचे काम सुरु आहे. या पार्श्वभूमीवर हा पूल एप्रिल,2008 मध्येच पूर्ण होणार होता, परंतु अजून तो पूर्ण झालेला नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी अनेकवेळा सांगितलेले आहे की, हा पूल एप्रिल,2008 पर्यंत पूर्ण होईल. याबाबत माझा प्रश्न आहे की, या कामाला गती देण्याच्या दृष्टीकोनातून, मुंबईच्या वाहतुकीच्या रहदारीवर उपाय म्हणून आपण या पुलाचे काम किती लवकर करणार आहात ? कंत्राटदारांच्या सगळया अडचणी सोडवून या कामास केव्हा व कशी गती देणार ? व हा प्रोजेक्ट कधी पूर्ण होणार ?

श्री.अनिल देशमुख : मुंबईतील वाहतुकीची कोंडी दूर व्हावी, हा या पूल बांधण्यामागील मूळ उद्देश आहे. आज मुंबईतील माहिम-कॉजवे रोडवर रोज 1 लाख 40 हजार वाहने ये-जा करतात. त्या रस्त्यावरुन वरळीला येण्यासाठी जवळपास 23 सिग्नल्स् लागतात. परंतु या पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर व तो डिसेंबर महिन्यात रहदारीला खुला झाल्यानंतर हे 23 सिग्नल्स् कमी

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33522....

श्री.अनिल देशमुख....

होणार आहेत. या पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील वाहतुकीची कोंडी दूर होण्याच्या दृष्टीने मदत होणार आहे. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी असे सांगितले की, सदरचे काम बंद आहे. परंतु मी याठिकाणी सांगू इच्छितो की, एक दिवसही काम बंद नाही, ते सुरुच आहे. सागरीपुलाचे काम असल्यामुळे व सागरामध्ये काम करावे लागत असल्यामुळे सदरचे काम सहा महिने करावे लागते. एकदा समुद्र खवळला की काम करणे अवघड होते. परंतु यावर्षी आपण पावसाळयातही एक आणखी वेगळा पूल बांधून पुलाचे काम चालूच ठेवलेले होते. तसेच याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी असे विचारले की, कंत्राटदाराचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे का ? याबाबत मी सांगू इच्छितो की, अशाप्रकारचे कुठलेही प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आजच्याघडीला पुलाचे किती टक्के काम पूर्ण झाले आहे ? असल्यास, ते शेडयूलप्रमाणे चालू आहे का ? तसेच या कामास डिले होत असल्यामुळे कॉस्ट एस्कॅलेशन होत असेल तर त्याबाबत शासन कोणती काळजी घेऊन कोणती योजना आखत आहे ? याबाबतची माहिती माननीय मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.अरविंद सावंत : कंत्राटदारांची बिले राहिली असतील...

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, एका दिवसाचेही कंत्राटदारांचे बिल देणे शिल्लक नाही. बिल आल्यानंतर 10 दिवसांमध्ये ते क्लिअर केले जाते. दोन वर्षापूर्वी या संपूर्ण प्रोजेक्टचे काम 5 टक्के झाले होते, आजच्याघडीला ते काम जवळपास 70 टक्के झालेले आहे. उर्वरित 30 टक्के काम डिसेंबर,2008 पर्यंत पूर्ण होईल व त्यानंतर हा पूल रहदारीसाठी खुला करण्यात येईल.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.33522 पुढे सुरु.............</u>**

श्री.अनिल देशमुख.............

सन्माननीय सदस्यांनी हे सांगितले की, डिले होत आहे. परंतु, मी हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, हा एवढा मोठा प्रोजेक्ट आहे की सद्य:स्थितीत भारतात यापेक्षा मोठा प्रोजेक्ट सुरु नाही. ही देखील आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे की, संपूर्ण भारतातील अभियंते एकत्र येऊन हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी झटत आहेत. या प्रकल्पाचा समावेश 'टेन वंडर्स ऑफ इंडिया' यामध्ये केला जातो, या प्रकल्पाला पारितोषिक दिले जाते, या सर्व गोष्टी अभिमानास्पद आहेत. या प्रकल्पाला यापुढे कोणताही डिले होणार नाही, पुढच्या डिसेंबरपर्यन्त हा पूल रहदारीसाठी खूला केला जाईल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझ्या एका प्रश्नाचे उत्तर यापूर्वीच सन्माननीय मंत्री महोदयांनी दिले आहे. मला दुसरा प्रश्न असा विचारावयाचा आहे की, केबल स्टेड मुख्य पुलाचे काम सुरु झाले आहे का, नसल्यास ते कधी सुरु होणार, किती दिवसात पूर्ण होणार आणि यासाठी अतिरिक्त खर्च येणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, केबल स्टेडसाठी अतिरिक्त खर्च येणार नाही. पायलॉनचे काम पूर्ण झाल्याशिवाय केबल स्टेडचे काम सुरु करता येत नाही. 15 डिसेंबर 2007 पर्यन्त पायलॉनचे काम पूर्ण होणार आहे व त्यानंतर केबल स्टेडचे काम सुरु होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी यापूर्वी विचारलेल्या प्रश्नाला सन्माननीय मंत्रीमहोदयांनी विनोदी उत्तर दिले आहे व ते दिशाभूल करणारेही आहे. मूळ आराखडयानुसार वायर रोप तंत्रज्ञान होते व त्यात फार मोठे टॉवर उभे करण्यात येणार होते. अगदी आयफेल टॉवरपेक्षाही हे टॉवर मोठे होते. या टॉवरवर जाण्याचा लाभ पर्यटकांना मिळणार होता व त्या टॉवरवरुन पूर्ण मुंबईचे दर्शन होणार होते. सन्माननीय मंत्री महोदय 'टेन वंडर्स ऑफ इंडिया' याबद्दल सांगत होते त्यापेक्षाही मूळ आराखडयातील हे काम मोठे होते. या टॉवरकडे पर्यटकांना आपल्या बोटीतून घेऊन जाण्याचा रोजगार तेथील मच्छिमारांना मिळणार होता. पण मच्छिमारांसाठी मूळ आराखडयात बदल केला, असे दिशाभूल करणारे उत्तर मंत्रिमहोदय देत आहेत. मच्छिमारांकडे काही जहाजे नसतात, त्यांच्या छोटया-छोटया होडया असतात, त्यामुळे त्यांना याचा

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.33522 पुढे सुरु.............**

**श्री**.दिवाकर रावते...........

काहीही त्रास नव्हता. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, समुद्रतळापासून पुलाच्या बॉटमपर्यन्तचे अंतर किती होते ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, पर्यटकांसाठी टॉवरची तरतूद मूळ आराखडयात होती, हे खरे आहे. समुद्राच्या तळापासून वरच्या टोकापर्यन्तची उंची साठ मजली इमारतीएवढी होती. यातील 15 मजले समुद्रतळात व 45 मजले समुद्राच्या वर अशाप्रकारचे ते डिझाईन होते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आताच उंची सांगितलेली आहे. अमेरिका देश सोडला तर जगातील असे एकही जहाज नाही की ते एवढया उंचीचे असेल. त्यामुळे मच्छिमारांसाठी डिझाईन बदलले, हे मंत्रिमहोदयांचे उत्तर योग्य वाटत नाही.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, 15 मजले समुद्रतळात व 45 मजले समुद्राच्या वर अशाप्रकारच्या ऑब्झरव्हेटरीचे डिझाईन पूर्वी केले होते. सेफ्टी नॉर्म्सखाली पोलीस विभागाने परवानगी दिली नाही, त्यामुळे ते डिझाईन रद्द करण्यात आले. काही दिवसांपूर्वी राज्यातील सर्व खासदार, आमदार, मंत्रीमहोदय यांना प्रकल्प भेटीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. अनेक आमदार, खासदार या भेंटीसाठी उपस्थित होते, त्यांनी सुध्दा प्रकल्प कामाविषयी समाधान व्यक्त केले आहे. सुरुवातीच्या डिझाईननुसार होणा-या बांधकामामुळे मच्छिमार तेथून ये-जा करु शकत नव्हते, त्यामुळे ते डिझाईन रद्द करण्यात आले व आता 25 ते 50 मीटरचा स्पॅन ठेवण्यात आला असून केबल स्टेड पूल पायलॉन या नवीन तंत्रज्ञानानुसार विकसित करण्यात येणार आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.33522**.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दुस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, या पुलाच्या प्रकल्पाच्या खर्चामध्ये 1306 कोटींची वाढ झालेली आहे. हा प्रचंड भुर्दंड आहे. प्रकल्पात झालेल्या फेरबदलामुळे किती कोटींची वाढ झाली. मूळ प्रकल्प किती कोटीचा होता आणि त्यामध्ये किती कोटींची वाढ झाली ? कर्जावरील व्याजापोटी आपल्याला किती रक्कम द्यावी लागणार आहे, याबाबतची माहिती उत्तरामध्ये दिलेली नाही. ती माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी आणि आता पर्यंत ठेकेदाराला किती रक्कम अदा करण्यात आलेली आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, सन 2002 मध्ये या प्रकल्पाची मूळ किंमत 666 कोटी होती. नंतर ती 1306 कोटी झाली. अलाईनमेंट चेंज केल्यामुळे 300 कोटी रुपयांचा फरक पडला. बी.एम.सी.ने असे सांगितले होते की, जोपर्यंत आम्हाला 100 कोटी रुपये मिळत नाहीत तोपर्यंत आम्ही काम सुरु करणार नाही. बी.एम.सी.बरोबर वाटाघाटी करुन बी.एम.सी.ला 100 कोटी रुपये देण्याचे ठरले. भाव वाढीमुळे 100 कोटी रुपयांची वाढ झ ाली. आम्ही या सागरी प्रकल्पाचे बांधकाम सरकारच्या पैशातून करीत नाही. फायनान्सीयल इन्स्टीटयुशनकडून आम्ही पैसे उचलले आहेत आणि त्यातून आम्ही या प्रकल्पाचे बांधकाम करीत आहेत. यामध्ये 90 कोटी रुपये व्याजाचे आहेत. या सर्व बाबींमुळे 640 कोटींची वाढ झालेली आहे. आपल्याला पाहिजे असेल तर याबाबतचा सर्व तपशील मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. 1306 कोटींची वाढ झालेली नसून फक्त 640 कोटींची वाढ झालेली आहे.

-------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोकण किनारपट्टीवर बहुउद्देशिय सागरी महामार्ग..**

**(४) * ३५१५५ श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत , श्री.परशुराम उपरकर , श्री. अनिल परब** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण किनारपट्टीवरील बहुउद्देशिय रेवस-रेड्डी यासुमारे २५० किलोमीटर सागरी महामर्गाचा प्रस्ताव शासनाने तयार केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण किनारपट्टीवरील बहुउद्देशिय सागरी महामार्गावर सुमारे ३०० कोटी रुपयांचा आराखडा तयार करुन तो उत्तर सार्वजनिक बांधकाम विभागाने मुख्य कार्यालयाला सादर केला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधा वापरा व हस्तांतर करा या तत्वावर हा प्रस्ताव असून या मार्गावर काही टोल वसूली नाके उघडण्यात येणार आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बहुउद्देशिय महामार्गाचे काम एकूण तीन टप्प्यात हाती घेण्यात येणार आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास, कोकण किनार पट्टीवरील सदर बहुउद्देशिय सागरी महामार्गाच्या कामाला आता प्रत्यक्ष सुरुवात साधारणपणे केव्हा केली जाणार आहे?

**श्री.छगन भुजबळ** : (१) तांत्रिक सर्वेक्षण व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

(२), (३), (४) व (५) चे उत्तर. क्षेत्रीय स्तरावर प्रकल्पाबाबत सर्वांगीण तपासणी करण्यात येत आहे. सदरचे निर्णय प्रकल्पाच्या सुसाध्यतेवर अवलंबून आहेत.

श्री.जगन्नाथ शेवाळे : सभापती महोदय, सर्वेक्षण सुरु आहे असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, या सर्वेक्षणासाठी कालमर्यादा निर्धारीत करण्यात आली होती काय आणि सर्वेक्षणाचे काम केव्हा पूर्ण होणार आहे ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, शासनाला अहवाल प्राप्त झालेला आहे. ही जी माहिती आहे ही माहिती विभागाच्या त्या त्या जिल्हयातील इंजिनिअर्सनी गोळा करुन एकत्रित अहवाल तयार केलेला आहे. या अहवालाचा अभ्यास सुरु आहे. खरे म्हणजे या अहवालाला सुसाध्य म्हणण्यापेक्षा असाध्य म्हणावे लागेल अशा प्रकारचा तो अहवाल आहे. हा दोन पदरी रस्ता पूर्ण करण्यासाठी आणि सर्व ब्रिज पूर्ण करण्यासाठी जवळ जवळ १६०० कोटी रुपये लागतील असे त्या अहवालामध्ये दर्शविण्यात आले आहे. खाजगी कन्सल्टंसीचे मत घेण्यासाठी आम्ही निविदा

..३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. ३५१५५ ......**

श्री.छगन भुजबळ .....

मागविलेल्या आहेत आणि २८ नोव्हेंबर ही निविदा स्वीकारण्याची तारीख आहे. त्यानंतर पुन्हा एकदा या अहवालाची आणि प्रत्यक्ष रस्त्याची तपासणी करुन त्यांच्याकडून नवीन अहवाल मागविण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, चौपदरी रस्त्याचे सर्वेक्षण होईल तेव्हा होईल. हा सागरी मार्ग रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयांना जोडण्यासाठी राजापूर आणि देवगड या ठिकाणी ब्रिजची आवश्यकता आहे. तो ब्रिज केव्हा पूर्ण होईल ? संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हयापासून मुंबई पर्यंत जे ब्रिज तयार झालेले आहेत त्याला सागरी मार्ग म्हणून संबोधले जाते तो मार्ग केव्हा सुरु होणार आहे ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, याची संपूर्ण लांबी ७५०.४० किलोमीटर आहे. या रस्त्याचे ६९५.९४५ कलोमीटर काम पूर्ण झालेले आहे. हा रस्ता काही ठिकाणी अरुंद आहे, एकपदरी आहे तर काही ठिकाणी थोडासा मोठा आहे. या रस्त्याच्या कामासाठी आपण मागच्या ४-५ वर्षात जवळ जवळ १७८.५० कोटी रुपये इतकी बजेट प्रोव्हिजन केली.

यानंतर कु.जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.35155.....

श्री.छगन भुजबळ.........

त्यापैकी 161 कोटी रुपये वेगवेगळया ब्रिजेस,रस्ते पूर्ण करण्यासाठी शासनाने खर्च केले. साधारणपणे 54.04 किलोमीटरचा जो रस्ता आहे तो पूर्ण करण्यासाठी आपल्याला 25.84 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. अर्थात, हे सगळे केल्यानंतर सुध्दा राजापूर,बाणकोट,दाभोळ,जयगड या ठिकाणी जंगलातून जाणारे जे रस्ते आहेत,त्या रस्त्यांवरुन निरनिराळे व्यापार करण्यासाठी ते रस्ते पूर्ण करण्यासाठी प्रस्तावित आहेत. त्यावर जे ब्रिज बांधण्याचे प्रस्तावित आहे ते ब्रिजेस मोठे आहेत, म्हणून ब्रिज बांधण्यासाठी जो काही खर्च आहे, तो साधारणपणे 250 कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे,असा अंदाज येत आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आज कोकणामध्ये जाण्याकरिता रस्त्यांची तसेच रेल्वेची देखील वाहतूक आहे. पूर्वी पश्चिम महाराष्ट्रामध्ये जाण्याकरिता सुध्दा जलवाहतूकीचा उपयोग केला होता. आज नॅशनल हायवे क्रमांक 17 जो आहे, तेथे एवढे ट्रॅफिक आहे की, त्यामुळे या पाश्वभूमीवर सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, याकरिता तयार केल्या जाणा-या रस्त्याचे काम सुरु आहे आणि त्या अहवालासंबंधी विचारल्या जाणा-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "तांत्रिक सर्वेक्षण व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे." या वाक्यातील सुसाध्य या शब्दाच्या ऐवजी असाध्य असा शब्द वापर केला गेला पाहिजे असेही ते या ठिकाणी म्हणाले. या प्रकल्पासाठी एकूण 1600 कोटी रुपयांपर्यंत खर्च येईल असे सांगितले माझा यासंबंधी माननीय मंत्रिमहोदयांना पॉईंटेड असा प्रश्न आहे की, आपण हे 1600 कोटी रुपये केंद्रशासनाकडून किंवा राज्यशासनाकडून उभे करुन सदर प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने किंवा साध्य करण्याच्या दृष्टीने कोणता कार्यक्रम आखलेला आहे, याची माहिती या ठिकाणी देण्यात यावी.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, याकरिता आमचे प्रयत्न सुरु आहेत. या खात्याचे केंद्रीय मंत्री जे आहेत, त्यांच्याशी मी आणि माननीय मुख्यमंत्री साहेब अशा आम्ही दोघांनीही चर्चा केलेली आहे, त्यावेळी त्यांनी असे मत प्रदर्शित केले की, या देशातील जी मुख्य बंदरे आहेत, जसे की, मुंबई,गोवा किंवा अन्य बंदरे त्यांच्या बाजूने जाणारे जे रस्ते आहेत, हे रस्ते चांगले असावेत आणि ते चांगले करण्याकरिता एखाद्या योजनेअंतर्गत किंवा दोन तीन एजन्सीमार्फत आपल्याला पैसे

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देता येतील का याचा आम्ही अभ्यास करीत आहोत, असे एक तोंडी आश्वासन आम्हा दोघांनाही दिलेले आहे. यासंदर्भातील आणखी काही कागदपत्रे आम्ही त्यांच्याकडे पाठविलेले आहेत, त्यांच्या उत्तराची अपेक्षा आम्ही करीत आहोत, परंतु अद्यापही त्याचे उत्तर आलेले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदर प्रश्नाच्या उत्तराबद्दल मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो. कोकणातील सागरी महामार्गाच्या संदर्भात या सदनामध्ये उत्तर सखोल अशा प्रकारचे मिळाले,त्याबद्दल मी प्रश्न विचारणा-या सन्माननीय सदस्यांना देखील धन्यवाद देतो. पण माझा जो प्रश्न आहे, तो वेगळा आहे.

सन 2004 साली माननीय शरदचंद्रजी पवार साहेब नाशिकला जात होते,त्यावेळी त्यांची मोटार काशेळी घाटात अडकून त्यांना पुढे तीन किलोमीटर चालत जावे लागले होते. ही गोष्ट माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांच्या जिव्हारी लागली होती. माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी प्रेसमध्ये जाहीर केले की, सन 2006 साली याच रस्त्यावर चौपदरी महामार्गावरुन माननीय श्री.शरदचंद्रजी पवार यांची पहिली मोटार धावेल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते,आपला प्रश्न वेगळा असून सदर तारांकित प्रश्नाशी संबंधित नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही बाब गंभीर आहे. कारण एका राष्ट्रीय नेत्याकरिता एका मंत्र्याने केलेली ही प्रतिज्ञा आहे.

**सभापती** : होय, कबूल आहे परंतु ही गोष्ट आपल्याला इतर वेळी देखील सांगता येऊ शकते.

श्री.दिवाकर रावते : आता या रस्त्याला एवढा डिले का झाला ? माननीय मंत्र्यांचा संकल्प पूर्ण का झाला नाही. मला त्यावेळी आनंद झाला होता की, आता पुणे - मुंबईप्रमाणे नाशिक महामार्गही लगेच पूर्ण होईल पण सन 2006 निघून 2007 हे वर्षही संपावयाला येऊन सन 2008 उजाडू पाहत आहे. अजूनही माननीय मंत्रिमहोदयांनी सन 2004 साली केलेला संकल्प पूर्ण होत नाही. या कामामध्ये अडथळा आणणारे कोण आहेत ? या महामार्गाचे काम कशासाठी थांबले आहे?

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सदर रस्ता लवकरात लवकर पूर्ण व्हावा म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहोत.

श्री.विनोद तावडे : माननीय सभापती महोदय, हा सागरी महामार्ग म्हणजे कोकणातील पर्यटनाला चालना देणारा रस्ता आहे. त्यामुळे या सागरी महामार्गाचे एक वेगळे महत्व आहे. बरीच वर्ष बांधकाम खाते असा अहवाल देत होते की, फाईल पुढे जाते पण ते जमत नाही वगैरे असे म्हणते आणि विभागाला त्यांचे इंटरनल रेट ऑफ रिटर्न्स परवडत नाहीत,असेही त्यांच्या अहवालामध्ये नमूद केलेले असते. ही वस्तुस्थिती देखील वेगळया माध्यमातून समोर आलेली आहे.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.35155 .....

श्री.विनोद तावडे .....

येथे ज्या ठिकाणी ब्रिजेस नाहीत. तेथे तात्पुरत्या स्वरुपात फेअरी बोर्डद्वारे त्यातून वाहतुकीची ताबडतोब व्यवस्था केली पाहिजे. अशा प्रकारे वाहतुक दापोली व गुहागर खाडीत फेअरी बोर्डातर्फे चालविली जात आहे. असा सागरी मार्ग 100 टक्के कार्यान्वीत होण्यासाठी तात्पुरती योजना असेल तर सार्वजनिक बांधकाम खाते याच्या अंमलबजावणीसाठी विचार करीत आहे काय ? ब्रिजेस बांधणे परवडत नाही हे वर्षानुवर्षे आम्ही ऐकत आलेला आहेत. महामार्ग होईल तेंव्हा होईल. यामध्ये कोकणातील पर्यटनाला चालना मिळणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन त्यासाठी काही कालबध्द कार्यक्रम आपण सांगू शकाल का ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, हे खरे आहे की, अनेक छोटे मोठे ब्रिजेस बांधण्याची आवश्यकता होती. पैकी ठाणे जिल्हयातील 11 ब्रिजेसपैकी 7 पूर्ण झाले असून 4 शिल्लक आहेत. रायगड जिल्हयात 5 ब्रिजेसपैकी 5 पूल पूर्ण केले. रत्नागिरी जिल्हयात 18 ब्रिजेसपैकी 14 पूर्ण केले, 4 शिल्लक आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयात 11 ब्रिजेसपैकी 10 पूर्ण झाले आहेत, एका ब्रिजचे काम करावयाचे आहे. राजापूर, दाभोळ, जयगड येथील जंगलजेटीचा समावेश अपूर्ण कामामध्ये केलेला नाही. शासनाच्या वतीने हे काम सुरु असून जंगलजेटीचा आपणास वापर करावयाचा आहे. लिंक रस्ते व ब्रिजेस पूर्ण तयार करावयाचे आहेत. यावर आतापर्यंत 178 कोटी रुपये खर्च झ ालेला आहे. 10 कोटी रुपये या कामासाठी शिल्लक आहेत. त्याप्रमाणे 9 पुल अद्याप बांधलेले नाहीत. सर्वसाधारणपणे मी सांगितल्याप्रमाणे 54 किलोमीटर रस्त्यासाठी 25.5 कोटी रुपये हवे आहेत. हा निधी लवकर उपलब्ध केला जाईल व ब्रिज पूर्ण करण्यात येतील. मोठया खाडी असलेल्या सहा ठिकाणी जंगलजेटीचा वापर करण्यात येईल. कामे अपूर्ण ठेवलेली नाहीत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यासाठी टाईम बाऊंड प्रोग्राम मंत्री महोदयांनी सांगावा.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, येत्या दोन वर्षात हे काम पूर्ण करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.35155.....

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी खूप सविस्तर माहिती दिलेली आहे त्याबद्दल धन्यवाद देतो. परंतु राजापूर, देवगड येथे एक ब्रिज आहे. सावंतवाडी व मालवणमधील सर्व पूल झाले. परंतु राजापूर व देवगड येथील एकमेव पूल शिल्लक आहे, या कामास प्राधान्य दिले तर ब्रिज व रस्ता पूर्ण होईल.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, या कामास प्राधान्य देण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रोजगार हमी योजनेतील साहित्य विक्रीत कोट्यावधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(५) * ३३५४० श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. नितीन गडकरी , श्री. संजय केळकर , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २९६७१ ला दिनांक १९ जुलै, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेतील वापर न झालेली हत्यारे व सयंत्रे या शासकीय मालाचा कमी रकमेत लिलाव करण्यासाठी माहिती विभागातील बनावट कागदपत्रांचा वापर करुन बेकायदेशीर जाहिराती प्रसिध्द करुन शासनाची एक कोटी २४ लाख ८२ हजार १२० रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपावरुन सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार व एका वृत्तपत्राचा संपादक अशा ७ जणांविरुध्द पुणे येथील बंड बार्डन पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तपास करण्यांत आला आहे काय,

(३) असल्यास, तपासात काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यांत आली आहे वा येत आहे ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय,

(२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार व वृत्त पत्रसंपादक अशा एकूण ७ जणांविरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन गु.र.नं. १५६/०७, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (ब) (ड) सह १३ (२) व भा.दं.वि. कलम १२० (ब), ४२०, ४६५, ४६७, ४६८ प ४७१ प्रमाणे दिनांक १९ एप्रिल, २००७ रोजी ०६.१५ वा. गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, त्यांना अटक केलेली आहे. मला असे वाटते की, आरोपी किती आहेत, कोण आहेत ?. कारण रोजगार हमी योजनेचा पैसा हा लोकांना रोजगार मिळावा यासाठी आहे. दुष्काळी किंवा बाकीच्या कामावर खर्च होतो. ज्यांना रोजगार नाही, ज्यांची उपासमार होते त्यांच्यासाठी आहे. परंतु कोटयावधी रुपयाचा दुरुपयोग होत आहे. त्यावर आपल्याला जरब बसवली पाहिजे. यातील आरोपी किती आहेत, कोण आहेत, त्यांना कामावरुन निलंबित केले आहे का ?. किंवा पुन्हा ते पदावर जाऊन बसले आहेत का ?. सदरील घटना जुलै २००७ मधील असून अजूनही त्याचा अद्यापही तपास चालू आहे. याची सद्यस्थिती काय आहे ?.

....४



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३३५४०.....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये सहा जण आरोपी आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. सर्वश्री लक्ष्मीकांत जोशी तत्कालीन कार्यकारी अभियंता, उत्तम तुकाराम काळे भांडारपाल, सचिन प्रल्हाद शिंदे सहाय्यक भांडारपाल, शकील जियाउद्दीन मोमीन कनिष्ठ लिपिक पाटबंधारे विभाग, अतुल पागे लिलापार सोसायटी शिवतीर्थनगर, विजय बाळकृष्ण आंबाडे संपादक दै.पिंपरी चिंचवड समाचार, अतुल फारुकी  यांना अटक करण्यात आलेली आहे व ४८ तासापेक्षा जास्त काळ अटकेत असलेल्या आरोपींना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

यानंतर कु.धनश्री......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गोंदिया जिल्ह्यातील बेरडीपार ग्रामपंचायतीअंतर्गत ग्रामीण रोजगार हमी योजनेमार्फत घेण्यांत आलेल्या तलाव खोलीकरण व ढोरफोडी रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याबाबत**

**(६) * ३६९५२ डॉ. एन. पी. हिराणी , श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील बेरडीपार ग्रामपंचायतीअंतर्गत ग्रामीण रोजगार हमी योजनेमार्फत घेण्यांत आलेल्या तलाव खोलीकरण व ढोरफोडी रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे हे खरे आहे काय,

(२) या कामावर मजुरांना मे, २००७ पासून अद्यापही मजूरी देण्यात आली नाही हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता** : (१) नाही,

(२) नाही,

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ. एन. पी. हिराणी **:** सभापती महोदय, महाराष्ट्रात सुरु करण्यात आलेली रोजगार हमी योजना ही अतिशय चांगली व आदर्श योजना असावी अशी अपेक्षा होती. मजुरांना रोजगार मिळण्याचा हक्क देऊन ही योजना सुरु करण्यात आली. मागील वर्षीपासून केंद्र शासनाने देखील या आदर्श योजनेचा अवलंब करण्यास सुरुवात केलेली आहे. इतकी चांगली ही योजना असून व या योजनेवर बराच खर्च होऊन देखील हा पैसा तेथील मजुरांना न मिळता कंत्राटदारांच्या खिशात जातो. कंत्राटदार मजुरांच्या नावे खोटे हजेरीपट तयार करतात व हा पैसा लाटतात. याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी काहीही भ्रष्टाचार झाला नाही अशा स्वरुपाचे उत्तर दिले. येथे एक महत्वाचा प्रश्न मला विचारावयाचा आहे की, गोंदीया, बेरडीपार या ठिकाणी जो तलाव आहे, या तलावाचे किती खोलीकरण प्रस्तावित होते व किती खोलीकरण करण्यात आले ? माझा दुसरा उपप्रश्न असा आहे की, तलावाचे खोलीकरण केल्यानंतर जी माती निघाली, त्याची विल्हेवाट परस्पर लावण्यात आली असे सांगण्यात आले. या विषयी माहिती देण्यात यावी. तसेच या कामावर किती मजुरांना घेण्यात आले होते, हे काम नियमाप्रमाणे, शासकीय यादीप्रमाणे करण्यात आले होते

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन. पी. हिराणी......... ता.प्र.क्र.३६९५२......

काय, की, कॉन्ट्रेक्टरच्या यादीप्रमाणे काम करण्यात आले होते तसेच या मजुरांना त्यांची मजुरी पूर्णपणे देण्यात आली होती काय, आज या कामाची स्थिती काय आहे ? तसेच या विभागामध्ये दुसरा एक रस्ता आहे. ढोरफोडी रस्त्याच्या कामात देखील मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. हा रस्ता कोठल्या प्रकारचा रस्ता आहे, तेथे कोणत्या प्रकारचे काम झालेले आहे, त्या ठिकाणी मातीकाम केले गेले की खडीकरण केले गेले, या कामाची सद्यस्थिती काय आहे, हा रस्ता पूर्ण झालेला आहे काय तसेच या कामासाठी किती मजूर कामावर घेण्यात आले होते ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा. अनेक उपप्रश्न विचारु नयेत.

डॉ. एन. पी. हिराणी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माझ्या केवळ दोन ते तीन उपप्रश्नांना तरी उत्तरे द्यावीत.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, तलावातील गाळ काढण्याचे जे काम आहे, ते दिनांक 5 एप्रिल पासून 19 एप्रिल पर्यंत हाती घेण्यात आले होते. तेथे 251 मजूर कामावर होते. त्यांची मजुरी दिनांक 5.9.2007 रोजी अदा करण्यात आली. ढोरफोडी रस्त्याचे काम दिनांक 14.5 रोजी सुरु करण्यात आले होते. हे काम तीन पंधरवडे चालले. त्यांची मजुरी दिनांक 15 नोव्हेंबर पर्यंत अदा करण्यात आली.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, ग्रामीण रोजगार हमी योजने मध्ये सन 2007 पर्यंत मजुरांना मजुरी दिलेली नाही या संदर्भात आम्ही प्रश्न विचारला होता. आता मी असा उपप्रश्न विचारु इच्छितो की, या मजुरांना कोणत्या तारखेला आणि किती मजुरी देण्यात आली ? खऱ्या अर्थाने ग्रामीण रोजगार हमी योजना योग्य पद्धतीने चालवावयाची असेल व यामध्ये होणारा भ्रष्टाचार आपणास थांबवावयाचा असेल तर योग्य चौकशी करुन अहवाल तयार करणे आवश्यक आहे. हा अहवाल पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, तलावातील गाळ काढण्याचे जे काम हाती घेण्यात आले होते , त्या कामावर 251 मजूर होते. दिनांक 5.09.2007 रोजी त्यांना त्यांची मजुरी देण्यात आली. तसेच रस्त्याच्या बांधकामाचे काम तीन पंधरावडे चालले.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील.....

दिनांक 14.05 ते दिनांक 28.05 या पहिल्या आठवडयातील कामावर असलेल्या 267 मजुरांना दिनांक 5.09.2007 रोजी मजुरी देण्यात आली. दिनांक 29.05 ते दिनांक 12.6 पर्यंत सुरु असणाऱ्या कामावर 295 मजूर होते. त्यांची मजुरी दिनांक 17.09 रोजी देण्यात आली.

यानंतर श्री. सुंबरे......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (पुढे चालू..) ता.प्र.क्र.36952 ...

त्यांचे पेमेंट 17 सप्टेंबरला करण्यात आले आणि 13 जून ते 26 जून या कालावधीत 22 मजूर कामावर होते त्यांचे पेमेंट 15 नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे.

श्री. राजेंद्र जैन : सभापति महोदय, मैं यह जानना चाहता हूं कि इस काम में कितने कुशल और अकुशल काम प्रस्तावित थे, इस काम के लिए कितनी धनराशि का प्रावधान किया गया था ? अभी माननीय मंत्री जी ने कहा कि इस काम में भ्रष्टाचार नहीं हुआ है. लेकिन हमारी जानकारी के अनुसार इस काम में भ्रष्टाचार हुआ है. इसलिए मैं यह जानना चाहता हूं कि इस मामले की जांच किस यंत्रणा के द्वारा की गई थी ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या कामामध्ये काही भ्रष्टाचार झालेला आहे अशा तक्रारी उपलब्ध नाहीत. पण आता आजच्या या चर्चेच्या दरम्यान दोन्ही सन्माननीय सदस्यांनी त्याबाबत उल्लेख केलेला आहे. तेव्हा त्याची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचाराच्या संदर्भात माननीय राज्यमंत्री महोदयांनीच आम्हाला यापूर्वी येथेच आश्वासन दिलेले आहे की, रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्या प्रत्येक मजुराला जॉब कार्ड देण्यात येईल आणि हे कार्ड देण्याचे काम सप्टेंर 2006 पर्यंत पूर्ण होईल. तेव्हा आता राष्ट्रीय रोजगार हमी योजना असो वा राज्याची रोजगार हमी योजना असो त्यातील सर्व मजुरांना आपण जॉब कार्ड दिली आहेत काय ? जेणे करून त्यांना मजुरी दिली होती की नाही हेही पाहता येईल. तसेच प्रत्येक ठिकाणच्या कामावरील भ्रष्टाचाराची प्रकरणे रोखण्यासाठी सव पक्षीय समित्या तालुका पातळीवर आपण करणार काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या बेरडीपार ग्रामपंचायतीने पहिल्यांदाच हे काम केलेले आहे आणि त्यांनी प्रत्येक पेमेंट हे बँकेमार्फत केलेले आहे आणि त्यामुळेच पेमेंट होण्यामध्ये उशीर झालेला आहे. ग्रामपंचायतीने हे पेमेंट बँकेकडून त्या मजुरांच्या खात्यावर केलेले आहे म्हणजे यात पूर्ण पादर्शकता आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे आणि कामावरील हजेरीपटाचे वाचन देखील त्यांनी गावात चावडीवर केलेले आहे. तसेच आता जॉब कार्डाच्या बाबतीत जी सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे तिचा निश्चितपणे विचार केला जाईल.

.... आय 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36952 ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये किती दिवसात मजुरांना पगार दिला पाहिजे आणि या कामावर जो पगार दिलेला आहे त्यात अनियमितता झालेली आहे, ती होण्याची कारणे काय आहेत आणि त्याला जबाबदार कोण आहेत ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कायद्याप्रमाणे मस्टर पूर्ण झाल्यानंतर 15 दिवसात पेमेंट पूर्ण करावे असे आहे. परंतु आता माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे आणि आपणही विचारल्याप्रमाणे मजुरांना मजुरी मिळण्यात थोडा विलंब झालेला आहे पण तोही बँकेमार्फत पेमेंट केले गेले म्हणून झालेला आहे. आता आपण एमआरइजीएस ही नव्याने योजना सुरू केली आहे आणि त्यामध्ये मजुरांना पेमेंट चेकद्वारे बँकेमार्फत करावे असे आहे.ण ...

श्री. पांडुरंग फुंडकर : परंतु ग्रामीण रोजगार हमी योजना आणि केंद्रीय रोजगार हमी योजना ही वेगवेगळी आहे. तेव्हा आपण त्याबाबत एकत्रित करून सांगू नये. हे जे काम आहे ते कोणत्या योजनेतून सुरू करण्यात आलेले होते ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हे काम महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतून झालेले होते. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : मग त्या योजनेतूनच त्यावरील मजुरांना पेमेंट व्हायला पाहिजे होते.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजना ही केंद्राची योजना आहे आणि आपली योजना म्हणजे रोजगार हमी योजना. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा कायदा झाल्यानंतर प्रत्येक राज्याला ही योजना राबविण्याची परवानगी केंद्राने दिली आणि हे काम आपण त्या एमआरइजीएसमध्ये घेतलेले आहे आणि या कामांवरील मजुरांना पेमेंट देण्यात थोडा विलंब झालेला आहे. म्हणजे पाचव्या-सहाव्या महिन्यातील कामाचे पेमेंट नवव्या महिन्यात दिले गेले आहे. आता हा विलंब का झाला याची चौकशी करण्यात येईल. परंतु माझ्याकडे असलेल्या माहितीनुसार मी आपल्याला सांगू इच्छितो की, या योजनेतून बँकेमार्फत पेमेंट करावयाचे होते आणि तेथे जवळपास बँक नसल्याने बँक अकाऊंट मध्ये पैसे जमा करावे लागले. त्यामुळे आता असा निर्णय घेण्यात आला आहे की, शक्यतो बँक अकौंटमधून पेमेंट केले जावे आणि ते शक्य नसल्यास रोखीने पेमेंट करावे.

***

( यानंतर श्री. सरफरे .... जे 1 ..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**भिवंडीतील नवीन पोलीस ठाण्याच्या बांधकामाबाबत**

**(७) * ३३५४४ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहराच्या क्वार्टर गेट भागात नवीन पोलीस ठाण्याच्या बांधकामास मनाई करणारा औरंगाबाद येथील वक्फ न्यायाधीकरणाने दिलेला अंतरिम आदेश मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस ठाण्याचे बांधकाम केव्हा सुरु करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे कोणती ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय,

(२) व (३) या संदर्भात प्रशासकीय बाबींची पूर्तता करुन सदरहू पोलीस ठाण्याचे बांधकाम सुरु करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत महाराष्ट्र शासन आणि त्यांचे गृह खाते दुबळे कां झाले आहे हे मला समजत नाही? एका समाजाच्या धर्मांध लोकांपुढे हे शासन नांगी टाकत आहे. यामुळे भिवंडीमध्ये फार मोठी दंगल झाली होती. त्या दंगलीमध्ये काही धर्मांध लोकांनी दोन पोलिसांचा खून केला होता, त्यांचा कोथळा बाहेर काढला होता. याठिकाणी मी प्रश्न असा विचारला आहे की, "भिवंडी शहराच्या क्वार्टर गेट भागात नवीन पोलीस ठाण्याच्या बांधकामास मनाई करणारा औरंगाबाद येथील वक्फ न्यायाधीकरणाने दिलेला अंतरिम आदेश मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला आहे, हे खरे आहे काय? या प्रश्नाला "होय" असे उत्तर देण्यात आले आहे. असल्यास, सदर पोलीस ठाण्याचे बांधकाम केव्हा सुरु करण्यात येणार आहे? असे विचारण्यात आले असता "यासंदर्भात प्रशासकीय बाबींची पूर्तता करुन सदरहू पोलीस ठाण्याचे बांधकाम सुरु करण्यात येईल" असे उत्तर देण्यात आले आहे. या संदर्भात उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर पोलीस आयुक्त श्री. डी. शिवानंदन यांनी एक पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी त्यांनी असे म्हटले आहे की, भिवंडी येथील क्वॉर्टर गेट परिसरात नवीन पोलीस ठाणे बांधणे आवश्यक आहे. मात्र त्याला काही लोकांचा विरोध असेल तर त्यांचे मत परिवर्तन करण्यात येईल. मला असे विचारावयाचे आहे की, "हे काही लोक" कोण आहेत? उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर सुध्दा प्रशासकीय बाबींची पूर्तता करण्याचे काम अपूर्ण राहिले आहे. त्याबाबत अडचण काय आहे? त्यानंतर श्री.डी. शिवानंदन यांनी पत्रकार परिषदेमध्ये असे म्हटले आहे की, ८० वर्षापेक्षा अधिक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३३५४४..

श्री. मधुकर चव्हाण...

काळ पोलिसांच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर इतरांचा हक्क कसा पोहोचतो? पावसाळयात त्या ठिकाणी ९ फूट पाण्यामध्ये उभे राहून आमच्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना काम करावे लागत असेल तर इतरांचे हित जपण्याचे कारण काय? ही कारवाई करण्याकरिता आपण इतरांच्या दाढीला हात लावून त्यांची समजूत काढणार काय? उच्च न्यायालयाने एकदा निर्णय दिल्यानंतर सुध्दा पोलीस ठाण्याचे बांधकाम करण्यास अडचण काय आहे? असे कोण लोक आहेत की, ज्यांचे आपण मत परिवर्तन करणार आहात? उच्च न्यायालयाने एकदा निर्णय दिल्यानंतर सुध्दा काही लोकांचे मत परिवर्तन करण्याकरिता आपणास आणखी वेळ पाहिजे काय? पावसाळयात ९-९ फूट पाण्यामध्ये उभे राहून आपल्या पोलीस अधिकाऱ्यांना काम करावे लागत असतांना सुध्दा कोणत्या प्रशासकीय बाबींची पूर्तता करावयाची राहिली आहे? या कामाकरिता ९ वर्षाहून अधिक वेळ कां लागला आहे?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, भिवंडी येथे पोलीस स्टेशन उभारण्याकरिता अडचणी निर्माण झालेली नाही. हे पोलीस स्टेशन पूर्वीपासून त्या ठिकाणी होते. मध्यंतरी स्थानिक प्रशासनाने स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून निधी उपलब्ध करुन घेऊन हे पोलीस स्टेशन बांधण्याचा प्रयत्न केला होता. या इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देतांना बांधकाम खात्याने संपूर्ण आर्थिक तरतूद झाल्यानंतर बांधकामाला सुरुवात करावी या अटीवर प्रशासकीय मान्यता दिली होती. या इमारतीचे एस्टिमेट १ कोटी ९४ लाख होते. त्याला शासनाची मान्यता घेऊन निधी उपलब्ध करुन दिला होता. या बांधकामासाठी भिवंडी महानगरपालिकेच्या महापौरांनी २५ लाखाचा निधी दिला, स्थानिक आमदार श्री. योगेश पाटील यांनी १२ लाखाचा निधी दिला, विधानपरिषदेचे माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे यांनी १० लाखाचा निधी दिला, मीरा-भाईंदर येथील विधानपरिषद सदस्य श्री. मुजफ्फर हुसैन यांनी १० लाखाचा निधी दिला. अशाप्रकारे १ कोटी ९४ लाखापैकी ५७ लाख रुपये लोकप्रतिनिधींनी उपलब्ध करुन दिले होते. एवढा निधी जमा झाल्यानंतर बांधकामाला सुरुवात करण्याकरिता दि.२३.३.२००६ रोजी माननीय उपसभापती, माननीय महापौर आणि माननीय स्थानिक आमदारांना पाचारण करण्यात आले होते. या इमारतीला प्रशासकीय मान्यता दि. १९ जून २००६ रोजी मिळाली. प्रशासकीय मान्यता मिळण्यापूर्वी ३ महिने अगोदरच हे काम सुरु करण्यात आले होते. परंतु त्यानंतर वाद निर्माण झाला आणि त्यावर या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३३५४४...

श्री. आर. आर. पाटील...

सदनामध्ये चर्चा झाली होती. सदरहू ठिकाणी पोलीस स्टेशन बांधू नये म्हणून वक्फ बोर्डाकडे अपिल करण्यात आले म्हणून बोर्डाने त्या बांधकामाला स्थगिती दिली. त्या स्थगितीविरुध्द शासन उच्च न्यायालयामध्ये गेले. वक्फ बोर्डाने दिलेली स्थगिती उच्च न्यायालयाने रद्द केली. स्थगिती रद्द करीत असतांना शासन स्वत:च्या जबाबदारीवर हे पोलीस स्टेशन बांधू शकते असे उच्च न्यायालयाने प्रमाणपत्र दिले. वक्फ बोर्डाने घेतलेल्या हरकतीप्रमाणे जर ही जागा आढळलीतर वक्फ बोर्डाची जागा काढून टाकण्यात येऊन उर्वरित जागेवर पोलीस स्टेशन बांधण्याचे काम शासनाने स्वत:च्या जबाबदारीवर सुरु करावे अशाप्रकारचा निकाल दि. ९ ऑक्टोबर २००७ रोजी उच्च न्यायालयाने दिला.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 33544 ..... श्री. आर. आर. पाटील ....

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाकडून आम्ही मार्गदर्शन मागितले आहे. त्यांचे मार्गदर्शन घेण्यात येईल. तेथील स्थानिक परिस्थिती बिघडली होती याची सगळ्यांना कल्पना आहे. कोणतेही पोलीस स्टेशन किंवा शासनाचे कोणतेही काम शांततेच्या वातावरणामध्ये करण्याचा प्रयत्न करणे ही काही चूक नाही. म्हणून संबंधित आयुक्तांनी ज्यांचा कोणाचा विरोध असेल त्यांना त्या जागेच्या मालकीची सर्व कागदपत्रे दाखवून, त्यांचे मत परिवर्तन करुन शांततेच्या वातावरणामध्ये, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची पूर्ण काळजी घेऊन हे काम सुरु करण्यात येईल असे जे सांगितले ते योग्य आहे. ज्या घटकांचा याला विरोध आहे त्यांच्याशी सुध्दा चर्चा करण्यात येईल. त्यांचे मत परिवर्तन करण्यात येईल. त्यांना हायकोर्टाचा निकाल दाखवण्यात येईल. त्यानंतर शांततेच्या वातावरणात या कामाला सुरुवात करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा शांततेचा प्रयत्न, समजवण्याचा प्रयत्न तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी म्हटल्याप्रमाणे दाढी कुरवाळण्याचा प्रयत्न करणे...

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, कोणाची दाढी आणि कोण कुरवाळतो ? सन्माननीय सदस्यांनी केलेला उल्लेख रेकॉर्डवरुन काढला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना काय वाटत असेल ?

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांची दाढी कुरवाळता काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. आर. आर. पाटील : आतापर्यंत आम्ही नुसती कुरवाळत होतो आता तेल लावून कुरवाळण्याचा प्रयत्न सुरु आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले की, दाढी कुरवाळण्यासबंधीचा उल्लेख काढून टाकावा परंतु आता त्यांनीच तेल लावून कुरवाळण्याचा प्रयत्न सुरु आहे असे सांगितले. तेल कोठे लावतात ते आपल्याला माहीत आहे काय ? याबाबत आपण सभागृहाला मार्गदर्शन करावे.

...2...23-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 33544 .....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, दाढी कुरवाळणे हा नेहमीचा वाक्प्रचार आहे. तो वाक्प्रचार कोणत्याही कम्युनिटीसाठी लागू नाही. दाढी कुरवाळणे याचा अशा प्रकारे एका कम्युनिटीशी संबंध जोडून या सदनाच्या नेत्यांनी अशा प्रकारचा वाक्य प्रयोग करणे चुकीचे आहे. दाढी कुरवाळणे ही कोणाची मिरासदारी नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, यह भिवंडी का प्रश्न है.....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्य श्री. जव्हेरी यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे काय ?

**सभापती** : मी त्यांना बोलण्याची परवानगी दिलेली नाही. आपण आपला प्रश्न विचारावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला असे वाटते की, सभागृहाचे माननीय नेते आता साहित्य सम्मेलन भरवत आहेत त्यामुळे त्यांना कळत असेल असे समजतो. दाढी कुरवाळण्याचा जो मुद्दा आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराजांना सुध्दा दाढी होती.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, गेल्या दोन्ही अधिवेशनांमध्ये ज्या ज्या वेळी हा विषय आला त्या त्या वेळी राणाभीमदेवी थाटात माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते की, काय वाटेल ते होवो पण पोलीस स्टेशन बांधले जाईल. 14 दिवसात ते बांधले जाईल असे सांगितले होते. कोर्टाचा निर्णय येऊन बरेच दिवस झालेले आहेत. मी सर्व पुरवणी मागण्या चाळल्या. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, पैसे नाहीत. पूर्ण पैसे दिल्याशिवाय बांधकाम खाते वर्क ऑर्डर देत नाही असे त्यांनी सांगितले ते चुकीचे आहे. तरीही त्यांनी तसे सांगितले. याबाबतीत प्रायोरिटी सुध्दा दिसत नाही. काल माननीय विरोधी पक्ष नेते म्हणाले की, शासनाला बिनभांडवली धंदा करावयाचा आहे. शासनाला खरोखरच हे काम करावयाचे आहे काय ? या ठिकाणी नुसती घोषणाबाजी होते.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ (पूर्वी श्री. बरवड) 11:55

(ता.प्र.क्र.35544...)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. विनोद तावडे : माझा प्रश्न असा आहे की, त्या ठिकाणी पोलिसांना पाण्यामध्ये राहून काम करावे लागते. म्हणून त्या ठिकाणी पोलीस स्टेशन होणे गरजेचे आहे. हे पोलीस स्टेशन किती दिवसात बांधण्यात येईल आणि त्याची तारीख कोणती असेल ?

श्री. आर.आर.पाटील : लवकरात लवकर.

श्री. संजय केळकर : हा प्रश्न दाढीचा किंवा बिनदाढीचा नाही. हा प्रश्न जनतेच्या हिताचा आणि पोलिसांच्या संदर्भातील आहे. पोलीस स्टेशनच्या बांधकामाचा प्रश्न हा दोन वर्षापासून प्रलंबित आहे. पोलीस स्टेशनचे बांधकाम सुरु झाले होते. हायकोर्टाने निर्णय देऊन दोन वर्षे झाली. हा कोणत्या जाती-धर्माचा प्रश्न नाही. हा जनहिताना प्रश्न आहे. त्या बांधकामाला महानगरपालिकेचीही मंजुरी मिळालेली आहे. तसेच प्रशासकीय मंजुरी देखील मिळालेली आहे. हे बांधकाम कुणाच्या दबावाखाली प्रलंबित ठेवले जात आहे काय ? तेव्हा या पोलीस स्टेशनचे बांधकाम निश्चित केव्हा सुरु होणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : कोणाचा विरोध असेल तर त्यांच्या बरोबर चर्चा करणे याचा अर्थ कोणाच्या दबावाला बळी पडून किंवा कोणाच्या दबावाखाली शासन निर्णय घेते असा होत नाही. 9 ऑक्टोबरला या प्रकरणी हायकोर्टाने निकाल दिला. हायकोर्टामध्ये हे प्रकरण प्रलंबित होते. म्हणून या बाबतीत विधि व न्याय विभागाचा सल्ला मागण्यात आला. विधी व न्याय विभागाचा सल्ला आल्यानंतर व संबंधित घटकांशी चर्चा झाल्यानंतर लवकरात लवकर हे पोलीस स्टेशन बांधण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : या विषयावर सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी राणाभीमदेवी थाटात केलेले भाषण मी ऐकलेले आहे. आज त्यांची अशी केविलवाणी अवस्था बघून वाईट वाटते. मला एका गाण्याच्या ओळी आठवतात, "काय होतास तू, काय झालास तू" पुढच्या ओळी मी म्हणत नाही. सन्माननीय बांधकाम मंत्री श्री. छगन भुजबळ हे बाजूला बसलेले आहेत. प्रशासकीय मान्यता वगैरेची नवीन थिअरी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितली. माझ्या माहिती प्रमाणे त्या जागेचे भूमिपूजन माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालेले आहे.बांधकामाला एक रुपयाची जरी तरतूद

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.35544...) (श्री. नितीन गडकरी....)

असली तरी भूमिपूजन करता येते अशी नवीन थिअरी त्यांनी सांगतली. माझे म्हणणे असे आहे की, हे काम तुम्ही टाळत आहात. माझे प्रश्न असे आहेत की, माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेला स्थगनादेश उठलेला आहे काय ? बांधकाम विभागाच्या नियमाप्रमाणे एक रुपयाची तरतूद असली तरी भूमिपूजनाचे काम करता येते काय ? हायकोर्टाच्या निर्णयानंतर आपण विधी व न्याय विभागाचा सल्ला घेत आहात. हायकोर्टाचा निर्णय आय.एस.आय. अधिका-यांना समजत नाही असे नाही. तेव्हा या सर्व गोष्टी 15 दिवसात तपासून - मागच्या वेळी जसे जोशात बोललात तसे बोलून एक महिन्याच्या आत हे काम करण्यात येईल असे आश्वासन सभागृहामध्ये माननीय उपमुख्यमंत्री देतील काय ?

श्री. आर.आर.पाटील : अलिकडे सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे राजकीय काम अधिक करीत असल्यामुळे येथील काम करण्यास ते कमी वेळ देतात. या कामाचे भूमिपूजन मी केलेले नाही. सन्माननीय सदस्यांची माहिती चुकीची आहे. त्या कामाला आर्थिक तरतूद असेल तर ते काम आपण सुरु करतो. आपण सर्व आमदार आहोत. आमदार फंडातून काम करीत असताना एक अट अशी घातलेली असते की, पूर्ण तरतूद झाल्यानंतर कामाला सुरुवात करावी.

... नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ 12:00

ता.प्र.क्र.35544....... श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, तशी पूर्ण तरतूद या कामामध्ये केली गेली नव्हती. उच्च न्यायालयाने 9 ऑक्टोबर रोजी निकाल दिला तो विधी व न्याय विभागाकडून तपासून त्यांचे मार्गदर्शन घेण्यात येत आहे. त्यानंतर हे काम करण्याचा सरकारचा मानस आहे. केवळ सामाजिक वाद वाढविणे हा शासनाचा हेतू नाही. लोकांना परिस्थिती समजल्यानंतर कदाचित विरोध असेल तर तो मागेही घेतला जाईल. शासनाला शांतता प्रस्थापित करुन सगळ्यांची समजूत घालून पोलीस स्टेशन बांधण्यामध्ये इंटरेस्ट आहे. काही लोकांना केवळ राजकारण करावयाचे आहे. का यांनी त्यावेळी पोलीस स्टेशन बांधले नव्हते? शासनाला पोलीस आणि जनतेची गैरसोय दूर होण्यासाठी पोलीस स्टेशन पाहिजे. केवळ राजकीय वाद वाढविण्यासाठी पोलीस स्टेशन हवे असेल तर आपल्या म्हणण्याला बळी पडण्याची काही आवश्यकता नाही. राज्यातील शांततेचे वातावरण कुठेही बिघडू न देता लवकरात लवकर हे पोलीस स्टेशन बांधण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

विशेष कार्य अधिकारी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 20, 21 व 22 नोव्हेंबर, 2007 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी हक्कभंगाची सूचना का स्वीकारीत नाही? त्या संदर्भात उत्तर देत नाही किंवा तो नाकारीत नाही. मला काही कळत नाही. 15 दिवसात मांडतो असे सांगितले, अजून का मांडला जात नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी उभे असतात)

**सभापती** : अनेक विषयांवर तुम्हाला प्रश्न विचारण्याची परवानगी दिलेली आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी उभे असतात)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया सभागृहात शांतता राखावी.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

**सभापती** : दिनांक 20, 21 व 22 नोव्हेंबर, 2007 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात)

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या (ठाणे) सन 2005-2006 च्या लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 2005-2006 चा चाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा चौदावा अहवाल सादर करणे.

श्री.धोंडिराम राठोड (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा चौदावा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा चौदावा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

-----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M.5

SGB/ SBT/ 12:00

**पृ.शी./मु.शी.**: महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

डॉ.नीलम गोऱ्हे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिला हक्क व कल्याण समितीने "कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध" या विषयावर दिनांक 24 जुलै, 2003 रोजी सभागृहात सादर केलेल्या सातव्या अहवालात समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

**सभापती** : महिला हक्क व कल्याण समितीचा अनुपालन अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

--------

(नंतर श्री.जुन्नरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे.

श्री.अरविंद सावंत ( समिती सदस्य ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले प्रतिवृत्त छापण्यात यावे. )

----------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

श्री.अरविंद सावंत : महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आज शुक्रवार असला तरी काही सन्माननीय सदस्यांनी औचित्याचे मुद्दे मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. पहिला औचित्यांचा मुद्दा सन्माननीय विरोधीपक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा आहे त्यांनी तो थोडक्यांत मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो.

काल आपल्या सभागृहामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या आणि कर्जमुक्ती या विषयावर चर्चा सुरु असतांना दुपारी 3 वाजता मला एक चिठ्ठी आली. त्या चिठ्ठीमध्ये माझ्या खामगाव तालुक्यातील बोरजवळा गावातील महादेव दगडू ठाकरे या 21 वर्षाच्या तरुणाने आत्महत्या केल्याची माहिती होती. ती चिठ्ठी मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना त्यांचे भाषण सुरु असतांना दिली . त्यानंतर बाहेर जाऊन या विषयाच्या संदर्भात माहिती मागवली. आत्महत्या करण्याच्या आधी या तरुणाने एक पत्र लिहून ठेवले होते ते पत्र मी आपल्याला देणार आहे. रोहयो जलपुर्ती सिंचन विहीर या कार्यक्रमांतर्गत श्री. महादेव दगडू ठाकरे यांनी त्यांच्या वडिलांना दारिद्रय रेषेचे कार्ड, घरकुल व जलपुर्ती योजनेतून वडिलांना डावलल्यामुळे हतबल होऊन आत्महत्या केलेली आहे. दिवाळी व ईद निमित्त एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्या कार्यक्रमात त्यांने त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या आमदारांना सांगितले की, मला या या योजनेपासून डावलण्यात आलेले आहे. परंतु तु देशोन्नती या वर्तमानपत्राचा वार्ताहार आहेस, तु आम्हाला मदत करीत नाहीस त्यामुळे तुला कोणतीही मदत देता येणार नाही, असे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर आमदाराच्या एका दलालाने त्याच्याकडे 10 हजार रुपयांची मागणी केली. तुला विहीर पाहिजे असेल तर असेल तर तुला 10 हजार रुपये द्यावे लागतील अन्यथा तुझे कोणतेही काम केले जाणार नाही. तु जोपर्यंत 10 हजार रुपये देत नाहीस तोपर्यंत तुझे काम होणार नाही. तु मुख्यमंत्र्यांपर्यंत जरी गेलास तरी तुझे काम होणार नाही अशा प्रकारची धमकी दिली व नंतरही वारंवार अशा प्रकारच्या धमक्या दिल्यामुळे त्याने आत्महत्या केलेली

....4

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

आहे. आत्महत्या करण्याच्या अगोदर त्यांने यासंदर्भात एक पत्र लिहिले व त्यांनतर त्याने आत्महत्या केली. असे अनेक लोक त्या भागामध्ये आहेत. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, त्याने जे पत्र लिहिले आहे त्यासंदर्भात त्याच्या वडीलांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती परंतु धमक्यांच्या जाचामुळे सदर पत्राची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी स्पेशल अधिका-याची नेमणूक करुन त्याची चौकशी करण्यात यावी. ज्या लोकप्रतिनिधीने अशा प्रकारची धमकी दिली, पैसे मागितले त्या लोकप्रतिनिधीवर सावकारकीच्या 35 केसेस आहेत परंतु दबावामुळे, पैशाच्या जोरामुळे संबंधितांवर रकोणतीही कारवाई होऊ शकली नाही.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर............

म्हणून श्री.महादेव ठाकरे या 21 वर्षीय तरुणाने आत्महत्या केलेली आहे. या तरुणाचे शिक्षण 12 वी पर्यंत झाले होते. या तरुण शेतकऱ्याच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्यांवर कलम 304 चा गुन्हा दाखल करुन एका स्पेशल अधिकाऱ्यामार्फत चौकशी करावी अशाप्रकारचे निदेश आपण संबंधितांना द्यावेत अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे आपणास विनंती करीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मराठीत एक म्हण आहे " म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो". अशा प्रकरणामुळे ही म्हण सत्यात उतरते अशाप्रकारची प्रचिती वारंवार येत आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी राज्यात शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या याबाबत कालच सविस्तर सांगितलेले आहे. या विधिमंडळाच्या माध्यमातून देशोन्नतीच्या लढाईला एक वेगळा आयाम देण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. राज्यात शेतकऱ्यांची होणारी कुचंबणा, सावकरांकडून होणारे शोषण याबाबत सविस्तर सांगितलेले आहे. तरी देखील त्याची शासनाकडून दखल घेतली जात नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या शब्दाला काहीच किंमत नाही अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे निर्ढावलेल्या सावकरांनी शेतकऱ्यांचे बळी घेण्याचे सत्र सुरु ठेवले आहे. पोलीस स्टेशनमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी फोन केल्याची नोंद स्टेशन डायरीमध्येमध्ये आली. ती बाब सभागृहा पुढे आली. आपली नाचक्की होत आहे हे कागदोपत्री आल्यानंतर सुध्दा शासनाच्या वतीने त्याची गंभीर दखल घेतली गेली नाही. परिणामी सोकावलेल्या सावकरांनी आपले कार्य सुरु ठेवले. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरु आहे. श्री.महादेव ठाकरे या तरुण शेतकऱ्याने आत्महत्या करताना लिहिलेले मृत्युपत्र अतिशय गंभीर आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्याची प्रत आपणाकडे दिलेली आहे. त्याने पत्रात म्हटले आहे की, "दिनांक 14 नोव्हेंबर या दिवशी खामगाव येथील संत तुकाराम समाधी येथे दिवाळी व ईद स्नेह मिलन तसेच रोहयोच्या जलपूर्ती सिंचन विहिरी या विषयी कार्यक्रम घेण्यात आला होता. म्हणजे ईद आणि दिवाळीच्या निमित्ताने गरीब लोकांना शासनातर्फे काहीतरी देत आहोत अशाप्रकारचा कार्यक्रम सन्माननीय आमदार महोदयांनी घेतला. श्री.ठाकरे त्यांनी आमदार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.............

महोदयांना सांगितले की, मी, खरोखर खूप गरीब आहे. आपण मला या योजनेचा लाभ द्यावा. मी काँग्रेस पक्षाला मत देतो. त्यावेळी आमदार महोदयांच्या बाजूला त्यांचा श्री.श्याम जाधव नावाचा पी.ए. होता. त्यांनी सांगितले की, हा दैनिक देशोन्नतीचा वार्ताहार आहे. ज्या दैनिक देशोन्नतीने सावकारांविरुध्द लढा उभारला त्या दैनिकाचा हा वार्ताहार आहे. हे ऐकल्यानंतर आमदार महोदयांनी त्यांना मदत करण्याचे नाकारले आणि सांगितले की, "देशोन्नतीचा वार्ताहर हा माझा जावई असला तरी तो मला चालत नाही आणि त्यास बाहेर हाकलून दिले" मला हे समजत नाही की, एखाद्या वृत्तपत्राच्या वार्ताहाराने एखाद्या चांगल्या गोष्टीचा पर्दाफाश केल्यानंतर त्यास अशाप्रकारची वागणूक मिळू शकते हा वेगळा विषय होऊ शकतो. परंतु तो देशोन्नतीचा वार्ताहार आहे म्हणून त्यास मी कोणत्याही प्रकारचा लाभ देणार नाही. त्या शेतकऱ्याकडे विहिरीसाठी पैशांची मागणी केली हे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितलेले आहेच. त्या शेतकऱ्याने मृत्युपूर्वी लिहिले आहे की, सावकाराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करण्याच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. आपण त्यांना 1 लाख रुपये देऊन हा प्रश्न सुटणार नाही तर अशा प्रवृत्तींना ठेचणे फार गरजेचे आहे.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ पूर्वी श्री.अजित.... 12:15

श्री.दिवाकर रावते....

खामगांवच्या शेतक-याने सावकारांविरुध्द सुप्रीम कोर्टात पत्र पाठविले. तसेच, मुंबई व नागपूर हायकोर्टातही सुमोटो केस दाखल केली व कोर्टानेही त्याबाबतीत शासनास आदेश दिले. परंतु अजूनही त्याबाबतीत कोणत्याही प्रकारचा बंदोबस्त झालेला नाही, ही व्यथा आहे. खामगांवची व्यथा मी याठिकाणी सतत आणि सातत्याने मांडलेली आहे. ही व्यथा शासन दरबारी रुजू का होत नाही, ही आमची व्यथा असून कृपया आपणही याबाबतीत लक्ष द्यावे व या या वर्तमानपत्राचा वार्ताहर आहे म्हणून मी त्याचा बदला घेईन, अशाप्रकारची भूमिका जर भविष्यात पुढे जाणार असेल तर वार्ताहर म्हणून नोकरी करणे राजकीय ठोकशाहीपुढे फारच अवघड होईल, असे मला वाटते. औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनाच्या हे निदर्शनास आणून देतो व याबाबतीत तातडीने कारवाई करुन आमदारांचा राजीनामा माननीय मुख्यमंत्र्यांनी घेण्याच्या दृष्टीने पहावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी माननीय गृहमंत्री उपस्थित असणे आवश्यक आहे. ते ज्यावेळी सभागृहात उपस्थित होते त्यावेळी आम्ही त्यांना सांगितले होते की, आमचा औचित्याचा मुद्दा आहे, आपण थांबा, परंतु ते थांबले नाहीत. आपण त्यांना सभागृहात बोलवावे. सभापती महोदय, तो 21 वर्षांचा मुलगा असून आज वर्तमानपत्रामध्ये हेडलाईन आलेली आहे, त्यामुळे आपण त्यांना बोलवावे व ते याप्रकरणी कशा पध्दतीने चौकशी करणार आहेत, हेही कळू द्यावे.

**सभापती** : मी असे ठरवले आहे की, याबाबतीत मी स्वत: एक डी.ओ. लेटर माननीय गृहमंत्री,श्री.आर.आर.पाटील साहेबांना, आपण दिलेल्या पत्रासोबत देणार आहे. ही अत्यंत गंभीर बाब असून पत्रकारांचे संरक्षण करण्याच्यादृष्टीने गंभीर दखल घेतली पाहिजे. एक असहाय्य तरुण दुर्दैवाने याबाबतीतील एक व्यथा लिहतो व त्यानंतर आत्महत्या करतो, ही बाब अत्यंत लांच्छनास्पद आहे. यामध्ये कोणीही असले तरी त्यांच्यावर कठोर कारवाई होईल यादृष्टीने आपण गृह विभागाला सांगू. तसेच याबाबतीत मी स्वत: माननीय गृहमंत्र्यांनाही डी.ओ. लेटर लिहणारच आहे. यासंबंधी मी माननीय गृहमंत्र्यांना माझ्या दालनात घेईन, त्याचबरोबर माननीय विरोधी पक्षनेत्यांना व माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांनाही बोलावून घेईन.

------

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, नागपूरच्या गोवारी हत्याकांडास 13 वर्षे पूर्ण झालेली असून मी आताच तेथे श्रध्दांजली अर्पण करण्याकरिता गेलो होतो. तेथे काही लोक अक्षरश: टाहो फोडून रडत होती. आमच्याकडे "गोंड गोवारी" अशी म्हणण्याची प्रथाच झालेली आहे. गोवारी समाजाच्या बाबतीत स्वल्पविराम लावल्यामुळे अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. यामध्ये दोन मार्ग आहेत. एक तर न्यायालयात जाऊन त्यांच्या बाजूने निर्णय मिळवणे आवश्यक आहे. "माना" समाजाच्या बाबतीत जसा न्याय मिळाला तसा येथेही मिळणे आवश्यक आहे. परंतु गोवारी समाजाच्या बाबतीत अजून निर्णय लागलेला नाही. दुसरा मार्ग म्हणजे, महाराष्ट्र शासनाने जर केंद्र शासनाकडे शिफारस केली तर त्या आधारे केंद्र सरकारला घटना दुरुस्ती करावी लागेल व त्यानंतर शेडयूल ट्राईबच्या शेडयूलमध्ये त्यांच्या जातीचा उल्लेख करता येऊ शकेल व त्याप्रमाणे त्यांना सवलती मिळू शकतील. या दोन्ही बाबतीत गोवारी हत्याकांडास 13 वर्षे होऊनही अजूनपर्यंत निर्णय होऊ शकलेला नाही. आज हा गोवारी समाज रस्त्यावर आला असून त्यांची अवस्था फारच वाईट झालेली आहे. हा समाज आर्थिकदृष्टया, सामाजिकदृष्टया, शैक्षणिकदृष्टया मागासलेला आहे. ज्यावेळी या जातीचा समावेश विशेष प्रवर्गात करावा म्हणून प्रयत्न केला, परंतु त्यावेळीही स्वाभाविकपणे न्यायालयातून स्टे आला. त्यामुळे या औचित्याच्या माध्यमातून माझी शासनास व माननीय मुख्यमंत्र्यास विनंती आहे की, आपण जवळपास 13 वर्षापासून टाहो फोडत असलेल्या गोवारी समाजाला न्याय देण्याच्या दृष्टीने या अधिवेशनामध्ये विरोधी पक्षासकट सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावावी व यातून एकदिलाने निर्णय करावा. तसेच केंद्र सरकारकडे त्या जातीची नोंद शेडयूल ट्राईबमध्ये करण्याच्या दृष्टीने शिफारस करावी, अशी विनंती मी औचित्याच्या मुद्याद्वारे करत आहे. माननीय सभापती महोदय, आपणही याबाबत सरकारकडे शिफारस करावी. आज त्यांची अवस्था पाहण्यासारखी नाही. माझी याठिकाणी पुन्हा एकदा विनंती आहे की, अधिवेशन संपण्याच्या आधी यावर निर्णय घ्यावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गोवारी स्मारकास मीही भेट देऊन आले. ज्या दिवशी हत्याकांड घडले, त्यादिवशी योगायोगाने मी नागपुरात होते, ते दृश्य माझ्या डोळयासमोर अजूनही उभे राहते.

(नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.निलम गो-हे.........

सभापती महोदय, आपण असे म्हणतो की, महाभारतातील अश्वत्थाम्याची जखम अजूनही भरलेली नाही, ती भळभळत राहिली आहे. त्याप्रमाणेच 113 लोक मृत्युमुखी पडतात, नि:शस्त्र माणसांचे अशाप्रकारे धिंडवडे काढले जातात त्यामुळे महाराष्ट्राच्या लोकशाहीमध्ये जोपर्यन्त हे शासन आहे तोपर्यन्त गोवारी हत्याकांडाची जखम अश्वत्थामासारखी महाराष्ट्राच्या लोकशाहीला झाली आहे. मी आज त्या ठिकाणी गेले होते, मलाही अश्रु आवरले नाहीत. आज सुध्दा पोलिसांनी सुरक्षिततेच्या नावाखाली सर्व रस्ते बंद करुन कमीतकमी लोक तेथे पोहोचू शकतील, अशी व्यवस्था करुन ठेवली आहे. कोणत्या मंत्र्याने सामारे जायचे, तत्कालिन मंत्री, श्री.मधुकरराव पिचड यांनी जायचे की तत्कालिन मंत्री श्री.मारोतराव कोवासे यांनी जायचे की तत्कालिन मंत्री श्री.सुरुपसिंग नाईक यांनी जायचे या वादामध्ये सन 1994 मध्ये शेवटी उशिर होत होत मोर्चेक-यांचा दम सुटत गेला आणि गोवारी हत्याकांडाची घटना घडली. त्यावेळी शासनाने असे आश्वासन दिलेले आहे की, मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक माणसाच्या एका वारसाला नोकरी देण्यात येईल परंतु अद्यापपर्यन्त एकाही परिवारातील माणसाला नोकरी मिळालेली नाही. मला सभागृहाचा वेळ घ्यायचा नाही. संपूर्ण महाराष्ट्रातून या मृतात्म्यांना श्रद्धाजली अर्पण केली जात असतांना त्या कुटुंबियांची अशी परवड होत असेल तर आपली सदसद्विवेकबुध्दी जागृत आहे हे सिध्द करण्यासाठी, आपण जीवंत आहोत, भावना आणि जबाबदारी आपाल्यावर आहे यादृष्टीने शासनाने या कुटुंबियांच्या पुनर्वसनासंबंधी आणि त्यांच्या मागण्यांसंबंधी न्याय देण्याच्यासंदर्भात लक्ष घालावे, असे मी या औचित्याच्या मुद्याव्दारे सरकारचे लक्ष वेधू इच्छित आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ज्यावेळी गोवारी हत्याकांड झाले त्यादिवशी मी नागपूर येथील अधिवेशनासाठी आलो होतो व सदनात उपस्थित होतो. प्रत्यक्ष रुग्णालयाला आणि घटनास्थळाला भेट देऊन पहाणी करण्यासाठीही मी गेलो होतो. तेव्हापासून हा सिलसिला तसाच सुरु आहे. या मागासवर्गीय समाजाने ज्या गोष्टीसाठी मोर्चा काढला, एवढे हत्याकांड घडले, आज तेरा वर्षानंतरही आज ते त्याच मागण्यांसाठी मोर्चा घेऊन आलेले आहेत. रहदारीची अवस्था तर पोलिसांनी कशी केली आहे हे पहावयाचे असेल तर आपण साध्या गाडीतून त्या ठिकाणी फेरफटका मारावा तरच आपल्याला कल्पना येईल, एवढी नाकेबंदी पोलिसांनी केली आहे. गरीब जनतेला,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...........

न्याय मागणा-या जनतेला पोलीस अशा अत्याचाराने थोपवू पहात असतील तर ते अधिक जोमाने प्रतिवाद करण्याची शक्यता आहे व त्यामुळे पुन्हा हत्याकांड घडण्याची दाट शक्यता आहे. हत्याकांडाचे समर्थन करता येत नसले तरी 'व्यर्थ न हो बलिदान' यादृष्टीने त्याकडे पाहिले गेले पाहिजे. पोलिसांना घेऊन, छायाचित्रकारांना बरोबर घेऊन रुग्णालयामध्ये फिरणा-या मंत्र्यांनाही आम्ही पाहिलेले आहे. कोणाची तरी हत्या आणि कोणाची तरी प्रसिध्दी होते, नंतर आपुलकी दाखवायची, प्रेम दाखवायचे, नक्राश्रु ढाळायचे, प्रत्यक्षात कारवाई काही करायची नाही हा धर्म, अधर्म होऊन पाळला जात आहे. म्हणून मला विनंती करावयाची आहे की, आपण पीठासीन अधिकारी आहात, आपल्या हातामध्ये अधिकार आहेत, कमीतकमी या समाजाला न्याय देण्याच्या दृष्टीने आपण या शासनाला सल्ला तरी द्यावा, निदेश द्यावेत, त्यांना सांगावे, गोवारींच्या प्रश्नामध्ये लक्ष द्या. 113 लोक मृत्युमुखी पडले, किती परिवारांना नोकरी, व्यवसाय मिळवून दिला त्याचा शोध घ्यावा, झाले नसेल तर मदत करावी. शेवटी माणुसकी नावाचे नाते सर्व नात्यांमध्ये श्रेष्ठ नाते आहे, त्या नात्याची जपणूक शासनाने करावी, अशाप्रकारची मागणी या औचित्याच्या मुद्याला पाठिंबा देत असतांना मी करतो.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, आज 23 नोव्हेबर हा विधानभवनाच्या इतिहासातील काळा दिवस आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही.

**सभापती** : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर खरे तर आपण पुन्हा त्यावर बोलणे बरोबर नाही. परंतु, मी आपल्याला परवानगी दिली आहे, कृपया कमीतकमी वेळात आपले म्हणणे मांडावे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये गोवारी हत्याकांडाएवढे क्रुर हत्याकांड यापूर्वी घडलेले नाही. मी आपल्याजवळ माझ्या भावना व्यक्त केल्या होत्या की, अधिवेशन सुरु झाल्यानंतर सर्व मंत्र्यांनी आणि सर्व आमदारांनी मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करावी.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर ......... 12:25

श्री.प्रकाश शेंडगे ........

आज 23 नोव्हेंबर रोजी नागपूर येथे अधिवेशन सुरु आहे. नेहमी अधिवेशन डिसेंबर महिन्यामध्ये होत असते. औचित्याच्या मुद्याद्वारे ही भावना आपण अजूनही व्यक्त करीत आहोत. गोवारी समाजाच्या 113 हुतात्म्यांनी बलिदान देऊन 13 वर्षे झाली. परंतु अद्याप त्यांना न्याय मिळालेला नाही. 113 हुतात्म्यांनी बलिदान देऊन सुध्दा या समाजाला न्याय मिळत नसेल तर शासनाला हे शोभत नाही. हा छोटासा समाज आहे. त्या समाजाच्या मागण्या शासनाने सहानुभूतीपूर्वक मान्य कराव्यात, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून गोवारी हत्याकांडाच्या बाबतीतील अत्यंत गंभीर भावना व्यक्त केल्या. त्या समाजाचे जे मुलभूत प्रश्न आहेत ते प्रश्न 13 वर्षापासून सातत्याने प्रयत्नांची पराकाष्ठा करुन सुध्दा अद्यापि सुटलेले नाहीत, अशी या ठिकाणी त्यांनी व्यथा मांडली. या हुतात्म्यांना मी वंदन करतो. माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी याबाबतीत लक्ष घालावे आणि माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांच्या बरोबर याबाबत चर्चा करावी. आदिवासी विकास विभागाच्या मंत्री महोदयांनी देखील यामध्ये लक्ष घालावे. मी स्वत: मुख्यमंत्री आणि अन्य मंत्री महोदयांना याबाबतीत सांगेन की, ही अत्यंत गंभीर बाब आहे. दुर्दैवाने शेकडो गोवारी कार्यकर्त्यांना मृत्युला सामोरे जावे लागले. म्हणून मला असे वाटते की, अधिवेशन संपण्यापूर्वी आपण याबाबतीत विचारविनिमय करण्यासाठी एखादी बैठक घ्यावी. मी सुध्दा माझ्या दालनात बैठक घेण्याचा प्रयत्न करतो. आपण सुध्दा माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना याची कल्पना द्यावी.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याला धन्यवाद देतो, आपले अभिनंदन करतो. या महत्वाच्या विषयावर आपण संवेदनशीलतेचा परिचय दिला आणि निर्णय घेतला, त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि आपल्या बैठकीतून मार्ग निघेल अशी आशा व्यक्त करतो.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आपल्या परवानगीने मी एका अत्यंत महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत आहे. उत्तरेकडील राज्यांनी आपल्या कोट्यापेक्षा जास्त वीज खेचल्यामुळे महाराष्ट्रात नियमित वेळापत्रकापेक्षा अधिक विजेचे भारनियमन करावे लागत आहे. राष्ट्रीय पातळीवर विजेची देवाण-घेवाण करण्यासाठी राष्ट्रीय ग्रीड तयार करण्यात आले आहे. उत्तरेकडील राज्यांनी आपल्या कोट्यापेक्षा जास्त वीज खेचल्याने आपल्या राज्यातील वीज यंत्रणा बंद पडून राज्यात अंधार होण्याची स्थिती कधीही निर्माण होऊ शकते. परिणामी मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. उत्तरेकडील राज्य शिस्त पाळत नसल्याने महाराष्ट्रात मागच्या सोमवारी 11 वेळा, मंगळवारी 26 वेळा, बुधवारी 24 वेळा, गुरुवारी 17 वेळा आणि शुक्रवारी 6 वेळा भारनियमनाव्यतिरिक्त वीज पुरवठा खंडीत होण्याच्या घटना घडल्या. भारनियमनामुळे राज्यातील जनता अतिशय त्रस्त झालेली आहे. संबंधित विभागाचे मंत्री कार्यक्षम आहेत, सभागृहामध्ये उपस्थित आहेत. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, याबाबतीत त्यांनी पुढाकार घेऊन सविस्तर निवेदन करावे.

यानंतर कु.जयश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ KTG/D प्रथम श्री.बोरले..... 12:30

**सभापती** : माननीय ऊर्जामंत्री श्री.दिलीप वळसे पाटील सभागृहामध्ये उपस्थित आहेत, विजेचे भारनियमन,वीजटंचाई या अत्यंत महत्वाच्या विषयावर सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी औचित्याच्या मुद्यांच्या माध्यमातून लक्ष वेधलेले आहे, याविषयी सन्माननीय मंत्रिमहोदयांना जर काही सांगावयाचे असेल तर त्यांनी दोन ते तीन मिनिटांमध्ये सांगावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या या संबंधीच्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सांगितले की, महाराष्ट्रमध्ये एकूण 4,462 मेगावॅट विजेची टंचाई आहे, ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांचा असा समज व्हायला नको की, राज्यामध्ये फक्त 100 ते 150 मेगावॅट विजेचा तुटवडा आहे तरी फक्त इतर राज्यांनी वीज खेचल्यामुळे विजेची कमतरता भासत आहे.

श्री.संजय दत्त : राज्यात विजेची टंचाई आहे, हे मान्य आहे म्हणून विजेचे भारनियमन करावे लागते,हेही मान्य आहे परंतु इतर राज्यांनी गरजेपेक्षा जास्त वीज खेचल्यामुळे डेफिशिट वाढतो. तो डेफिशिट का वाढतो ? याचा खुलासा व्हावयाला पाहिजे.

श्री.दिलीप वळसे पाटील : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी औचित्याच्या मुद्यांच्या माध्यमातून जो विषय सभागृहामध्ये मांडलेला आहे,त्याला उत्तर देण्यासाठी मी उभा आहे. हा विषय भारनियमनाशी संबंधित नाही. आपल्या सर्वांना हे विदितच आहे की, पूर्वी विजेची ग्रीड फक्त एका राज्यापुरतीच मर्यादित असायची. परंतु आता साऊथची काही राज्य सोडली तर संपूर्ण एकच विजेची देशाची ग्रीड निर्माण केली गेली आहे. उत्तरेमध्ये असा अनुभव येत आहे की, त्या राज्यांमध्ये ग्रीडची फ्रिक्वेन्सी 49 च्या खाली जात आहे. त्यामुळे आपल्या राज्यामध्ये अनेक वेळेला अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, आपल्याकडे 700 मेगावॅट वीज उपलब्ध असतांना देखील केवळ केंद्राच्या ग्रीडची फ्रिक्वेन्सी खाली गेल्यामुळे युनायटेड फ्रिक्वेन्सी रिले ऑपरेट झाले होते,त्याच्यामुळे इतर राज्यांमध्ये भारनियमनाच्या व्यतिरिक्त देखील वीजप्रवाह खंडित होतो. ही परिस्थिती आपल्या राज्यांप्रमाणे इतर राज्यांमध्येही निर्माण होते. सभापती महोदय, गेल्या 15 दिवसांमध्ये काही वेळेला 25 -25 वेळा फ्रिक्वेन्सी रिले ऑपरेट झालेले होते. भारनियमनाचा 12 तासाचा कालावधी असेल तर, त्या 12 तासाच्या व्यतिरिक्त नॅशनल ग्रीडची फ्रिक्वेन्सी खाली गेल्यामुळे तेथे फ्रिक्वेन्सी रिले ऑपरेट झालेले आहे. महाराष्ट्राची वीजटंचाई

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील.......

किती आहे आणि त्यापमाणे आपले भारनियमन किती आहे, हे आपल्याला माहितच आहे परंतु गेल्या काही दिवसांमध्ये नॉर्थकडील काही राज्ये त्यांच्या कोटयापेक्षा जास्त वीज राष्ट्रीय ग्रीडमधून खेचत आहेत. आणि त्यामुळे देशाच्या संपूर्ण वीजेच्या सिस्टमवर वाईट परिणाम होत आहे. वेस्टर्न रिजन रोड कॉर्पोरेशनने सी.ई.आर.सी.कडे यासंदर्भात एक पिटिशन फाईल केलेले आहे. मधल्या काळामध्ये मी स्वत: केंद्रीय ऊर्जामंत्री यांना दिल्लीमध्ये जाऊन भेटलो होतो माझ्याबरोबर माझे अधिकारीही होते मी त्यांच्या ही बाब लक्षात आणून दिली की, महाराष्ट्रामध्ये वीजटंचाई असतांना देखील महाराष्ट्र राज्य डिसिप्लिन फॉलो करीत आहे. बाकीची राज्ये कोटयापेक्षा जास्त वीज खेचत आहेत, त्या राज्यांना नॅशनल ग्रीडमधील काही गोष्टींवर अंमल करण्यास सांगून डिसिप्लीन फॉलो करण्यास सांगावे. पॉवर ग्रीड कॉर्पोरेशनने देखील यासंदर्भात सी.ई.आर.सी.कडे पिटिशन दाखल केले. यासंदर्भामध्ये देशामध्ये आणखी काही अडचणी निर्माण होऊ नये म्हणून सरकारच्या बाजूने संपूर्ण सतर्कता ठेवण्यात आलेली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यशासनाने जुन्या पिढीतील नामवंत,वयोवृध्द कलावंतांना मदत करण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. श्री.गजानन वाटवे,कै.सुधीर फडके, श्रीमती. आशा भोसले यांच्यापासून वैशाली सामंत यांच्या पर्यंत एकूण तीन पिढयातील गायकांनी ज्यांच्या तालावर गाणी म्हटली असे बुजूर्ग संगीतकार आणि गायक श्री.विठ्ठल शिंदे यांना मात्र शासनाने अडगळीत टाकलेले आहे. त्यांची अनेक गीते महाराष्ट्रामध्ये आज अजरामर झालेली आहेत. " खेळतांना रंग बाई होळीचा,नवा नवीन पोपट हा, लागला मिठू मिठू बोलायला,माझ्या नव-याने दारु सोडली,नेहमीच राया तुमची घाई."अशा प्रकारची अनेक अजरामर गीते त्यांनी मराठी रंगभूमीला,चित्रपटसृष्टीला दिलेली आहेत. हे ज्येष्ठ संगीतकार,गायक 77 वर्षांचे आहेत. मुंबईमध्ये कन्नमवार नगर येथे ते एका 10 X 10 च्या खोलीमध्ये आपल्या आठ कुटुंबियांसमवेत राहत आहेत. श्री.विठ्ठल शिंदे यांनी त्यांना सांस्कृतिक पुरस्कार मिळावे यासाठी प्रयत्न केले परंतु त्यांना तो मिळाला नाही. त्यांच्या शिष्या श्रीमती रोशन सातारकर रोशन सातारकर यांना सांस्कृतिक पुरस्कार मिळाले पण गुरुला मात्र अद्यापही तो पुरस्कार मिळालेला नाही.

यानंतर श्री.गागरे.....

अशुध्दित प्रत/ प्रसिध्दीसाठी नाही

PNG/ KTG/ D/ पूर्वी कु.खर्चे 12:35

श्री.रामनाथ मोते .....

श्री.विठ्ठल शिंदे यांना मुंबईतील त्यांच्या 10 x 10 च्या खोलीमध्ये 8 सदस्यांचे कुटुंब राहात असल्याने व तेथे राहणे मुश्किल झाल्यामुळे त्यांनी शासनाकडून सदनिका मिळावी म्हणून अर्ज दाखल केलेला आहे. शासनाने अद्याप त्याचा विचार केलेला नाही. अशा दयनीय अवस्थेत श्री.विठ्ठल शिंदे असाध्य रोगाने आजारी आहेत. इकडे अधिवेशनासाठी येण्यापूर्वी मी स्वत: त्यांच्याकडे जाऊन भेटलो. माझ्या ऐपतीप्रमाणे मी त्यांना मदत केली आहे. मी मुद्दाम सभागृहाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की, 77 वर्षाचे वय असलेल्या मराठी भाषेला वरदान देणाऱ्या श्री.विठ्ठल शिंदे या गीत व संगीतकाराकडे शासनाने लक्ष द्यावे. त्यांना योग्य ती मदत करावी म्हणून मी आज हा औचित्याचा मुद्दा मांडला आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, श्री.रामनाथ मोते यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत निश्चितपणे आज किंवा उद्या श्री.विठ्ठल शिंदे यांच्या घरी संपर्क साधण्यात येईल. माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत, त्यामुळे शासनातर्फे श्री.विठ्ठल शिंदे यांच्या अडचणी समजून घेतल्या जातील. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या लक्षात ही बाब आणून दिली जाईल व शासनाकडून तसेच वैयक्तिक स्वरुपात त्यांना योग्य ती मदत करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एक औचित्याचा मुद्दा मांडणार आहे. आबासाहेब मराठे आर्टस्, न्यू कॉमर्स व सायन्स कॉलेज राजापूर जि.रत्नागिरी येथील मार्च 2007 मध्ये झालेल्या तृतीय वर्ष कला या वर्गात 11 विद्यार्थी परीक्षार्थी होते, त्यापैकी 9 विद्यार्थ्यांना पेपर क्र.5 मध्ये 2 ते 5 गुण मिळाले आहेत. उत्तर पत्रिकेच्या नक्कल प्रती विद्यालयाने मागवून तज्ज्ञ प्राध्यापकांकडून तपासणी केली असता विद्यापीठाने सदोष परीक्षण केल्याचे आढळून आले. विद्यापीठाने चुकीचे मुल्यांकन केल्याचे महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठ परीक्षा विभागास लेखी कळविले आहे. परंतु यामुळे पर्यायाने विद्यार्थ्यांचे वर्ष केवळ चुकीच्या मुल्यांकनामुळे वाया जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. किमान 8 गुण असतील असतील तर चेक अँड फाऊंड करेक्ट अशा प्रकारचे उत्तर विद्यापीठाकडून दिले जाते. प्रत्यक्ष उत्तरपत्रिका तपासणी केल्यानंतर असे लक्षात आहे म्हणून या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून विद्यापीठाने

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर .....

याचे पुर्नमुल्यांकन करावे. या विद्यार्थ्यांची पेपर तपासणी करुन त्यांना न्याय द्यावा. सदरची गंभीर बाब औचित्याच्या मुद्दयाद्वारे सभागृहात उपस्थित करीत आहे. शासनाने त्वावर कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे, त्याबाबत मी सांगू इच्छितो की, प्रचलित नियमानुसार एखाद्या पेपरचे पुर्नमुल्यांकन करावयाचे असेल तर आज ती सोय आपल्या कायद्यात किंवा नियमात नाही. तरीसुध्दा माननीय सदस्यांनी ज्या भावना मांडल्या आहेत, त्या संदर्भात मी विद्यापीठाचे प्रतिनिधी व संबंधित विद्यार्थी, महाविद्यालयाचे प्रतिनिधी यांची एकत्र बैठक पुढच्या आठवडयात घेईन व याबाबत विद्यापीठाने लक्ष घालण्याबाबत आदेश देण्यात येतील.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, सध्या आम्ही टी.व्ही.समोर बसावे की नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. AXE डी-ओडोरंटच्या जाहिरातीमध्ये अतिशय अश्लिल चित्र दाखविले जात आहे. बिकीनी घातलेल्या 100-200 मुली पाण्यातून धावत बाहेर येतात आणि तो एकच पुरुष असे म्हणतो की, मी या स्प्रे मुळे काहीही मिळवू शकतो. स्त्री आणि पुरुषांच्या संबंधीविषयीचे अत्यंत अश्लिल चित्रण दाखविले जाते. स्त्री ही काही एका स्प्रे वर मिळविण्याची वस्तू आहे का ? तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे. तिची स्वत:ची प्रतिष्ठा आहे. अशा प्रकारच्या जाहिराती आम्ही का बघायच्या की, जिच्यामुळे पूर्ण स्त्री जातीच्या अस्तित्वाचा अवमान होतो. या जाहिरातीवर बंधन घालण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत. मला माहिती आहे की, हा प्रश्न आपल्या राज्याच्या अखत्यारित नसून केंद्राकडे आहे. परंतु मागील वर्षी आपण एक पायंडा पाडला आहे. ज्यावेळी स्त्री अधिकाऱ्यांच्या मासिक पाळीचा अहवाल केंद्र सरकार मागत होते. त्यावर या सभागृहाने निषेधाचा ठराव केला व केंद्र शासनाला कळविला. केंद्र शासनाने त्याची दखल घेतली. आणि अहवालातील तो कॉलम काढून टाकण्यात आला. सनदी अधिकाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी हे सभागृह यशस्वी ठरले आहे. आपण शाहू, फुले, आंबेडकर यांची पुरोगामी परंपरा चालविण्यामध्ये एक मोठे पुढचे पाऊल टाकलेले आहे. यावेळी मला सभागृहाला विनंती करावयाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

श्रीमती उषाताई दराडे .....

आहे की, अर्जुनाला माशाचा डोळा भेदावा लागला, रामाला धनुष्य तोडावे लागले. पण आजकालच्या तरुणांना फक्त डीओ मारला तर दोन-दोनशे बायका मिळतात. कोणी चार-चार बायका करतात म्हणून आपण सभागृहात कॉमेंट का करतो ? कशासाठी द्विभार्या प्रतिबंधक कायदा करतो ?. म्हणून माझी या सभागृहाला विनंती आहे की, या प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यावी. ज्याच्यामध्ये स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो अशा जाहिराती दाखवू नयेत. याकरिता या सभागृहाने प्रयत्न करावेत. या बाबीची गंभीर दखल घ्यावी.

यानंतर कु.धनश्री.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील : सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना याठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत, त्यासंदर्भामध्ये गृह विभागाला व माननीय उपमुख्यमुत्र्यांच्या मदतीने, केंद्रीय नभोवाणी मंत्र्यांना पत्र लिहून, अधिक लक्ष देण्याची विनंती करण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, दिनांक 19 नोव्हेंबर 2007 रोजी हिवाळी अधिवेशन सुरु झाले आहे. दिनांक 20 नोव्हेंबर रोजी मी औचित्याचा मुद्दा मांडणार होतो. पण काही कारणाने ते शक्य झाले नाही. हा आठवडा देखील आज संपत आहे. या अधिवेशनाकरिता येणारे विधानपरिषदेतील व विधानसभेतील जे सन्माननीय सदस्य आहेत, त्यांची राहण्याची व्यवस्था आमदार निवास क्रमांक 1,2,3 येथे करण्यात आलेली आहे. या आमदार निवासामध्ये एकच भोजनगृह आहे. तेथील भोजन व्यवस्था चांगली नाही. तेथे अतिशय अस्वच्छता असते. आमदारांसाठी भोजनगृह असा फलक ज्या ठिकाणी लावलेला आहे,त्या कक्षामध्ये इतर लोक बसलेले असतात. तेथे माननीय आमदार येताना लोकांशी धक्काबुक्की होते. अशाप्रकारे प्रचंड गर्दी त्याठिकाणी असते. अजून पुढील आठवडयामध्ये देखील अधिवेशन सुरु राहणार आहे. तेथे दिले जाणारे जेवण हे अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. म्हणून आमची आपणास अशी विनंती आहे की, यासंदर्भात आपण तातडीने कारवाई करावी. याठिकाणी केवळ सन्माननीय आमदारांकरिता आणखी एक भोजनगृह तातडीने सुरु करावे अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

**सभापती** : विधानसभेचे माननीय अध्यक्ष व मी तेथील भोजनगृहामध्ये गेलो होतो. त्यावेळी आम्ही तेथे काही सूचना दिल्या होत्या.

श्री. अरविंद सावंत : पिण्याच्या पाण्याकरिता कोणतीही व्यवस्था येथे नाही. फिल्टर नाही. ॲक्वागार्ड नाही. मुंबई येथील विधानमंडळामध्ये तशीच परिस्थिती आहे. त्यामुळे तेथे आपण कृपया पिण्याच्या पाण्याकरिता ॲक्वागार्ड लावण्याची व्यवस्था करावी.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, येथील लिफ्टस् देखील अनेक वेळा बंद पडत असतात. यामुळे बऱ्याच वेळा सन्माननीय सदस्य लिफटमध्ये अडकून पडतात.

**सभापती** : 18 तारखेला विधानसभेचे माननीय अध्यक्ष, मी व विधानमंडळ सचिवालयाचे अधिकारी आम्ही भोजनगृहामध्ये व लिफटमध्ये गेलो होतो. मला त्यावेळी असे सांगण्यात आले की,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ D/ KTG/ 12:40

**सभापती**.......

आता नवीन लिफ्ट लावण्यात आलेल्या आहेत. मला वाटते, मी ज्यावेळी नवीन आमदार होतो त्या वेळच्या देखील दोन- चार लिफ्टस् असतील. यासंदर्भात मी यापूर्वी देखील लक्ष दिलेले आहेत. आताही जरुर लक्ष देण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण व सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्याशी या संदर्भात चर्चा करुन उर्वरित अधिवेशन काळाकरिता, सन्माननीय आमदारांकरिता कोणती व्यवस्था आपल्याला करता येईल यावर विचार करण्यात येईल. अत्यंत स्वस्त दरामध्ये जेवण मिळाले पाहिजे असा जो समज इ ाालेला आहे, तो समज आपण काढून टाकला पाहिजे. स्वच्छतेची आपण काळजी घेतली पाहिजे. पिण्याचे स्वच्छ पाणी मिळण्याकरिता ॲक्वागार्ड बसविले पाहिजे. यासर्व गोष्टींच्या संदर्भात मी स्वत: लक्ष घालेन. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे आपण याठिकाणी ही सूचना मांडली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

...............

यानंतर श्री. सुंबरे.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ कु. गायकवाड नंतर --- 12:45

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, नियम 93 अन्वये ज्या सूचना गेल्या तीन दिवसात माझ्याकडे आलेल्या आहेत त्या त्या त्यादिवशी सभागृहात मांडता आलेल्या नाहीत. म्हणून मी असा निर्णय घेतला आहे की, 20 तारखेपासून आज पर्यंतच्या ज्या सूचना नियम 93 अन्वये माझ्याकडे आलेल्यो आहेत त्यातील निवडक सूचना मी येथे वाचणार आहे आणि त्यावर शासनाकडून निवेदन केली जावीत. आता येथे उपस्थित असलेल्या मंत्री महोदयांना मी सांगेन की, दिनांक 20, 21 आणि 22 नोव्हेंबर 2007 या तीन दिवसांतील नियम 93 खाली आलेल्या सूचनांतील निवडक सूचना मी येथे वाचून दाखविणार आहे आणि त्यावर शासनाकडून निवेदने केली जावीत तसेच त्याबाबत आपण ही काळजी घ्यावी की, ही निवेदने सभागृहात लवकरात लवकर कशी येतील या दृष्टीने प्रयत्न करावा.

श्री. दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा आणि वैद्यकीय, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : ठीक आहे.

**सभापती** : आता सर्वप्रथम मी दिनांक 20-11-2007 रोजी नियम 93 खाली आलेल्या सूचना येथे वाचून दाखवितो. ..

सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण, संजय केळकर यांनी "एमएमआरडीए ने 900 कोटी रूपये कर्ज अनुदानापोटी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला देणे, सदर निधी वांद्रा, वरळी सी-लिंक तसेच मुंबई, ठाणे येथील प्रकल्पां व्यतिरिक्त राज्यातील अन्य प्रकल्पासाठी वापरण्याची शक्यता" या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी "महालक्ष्मी कृषी वीज भांडार, अंजयनगाव-सुर्जी, जिल्हा अमरावती यांनी गेल्या 1 महिन्यात सिंगल सुपर फास्टेड हे खत विकत घेणाऱ्या अनेक शेतकऱ्यांना त्या खताऐवजी जिप्सम देऊन राजरोसपणे फसवणूक करणे" या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..... व्ही 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 16 नोव्हेंबर 2007 रोजी वर्धा येथील मुख्य रोडवर गांधी सीटी कलर लॅबमध्ये भीषण स्फोट होऊन लॅची इमारत हादरून त्यात लॅबचे मालक गंभीर जखमी होणे." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी "स्वातंत्र्य सैनिकांच्या घरासाठी रास्त दरात जागा मिळण्यासाठी अहमदनगर येथील सुमारे 50 स्वातंत्र्य सैनिकांनी सामूहिक आत्मदहनाचा इशारा देऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अंगावर रॉकेल ओतून आग लावण्याचा प्रयत्न करणे." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी "दिनांक 7 नोव्हेंबर 2007 रोजी मंत्रालयातील राज्यमंत्र्यांच्या दालनात एका अनाहूत व्यक्तीने प्रवेश करून तेथील कर्मचाऱ्याने हटकताच पळून जाणे." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधूदुर्ग जिल्ह्यातील केसरी, फणरावणे, दाभेड, नांगरतारा, कोणी इत्यादी ठिकाणी वनसंज्ञा नोंद असलेली व आरक्षित वन अनिर्णित असलेल्या जागेत वन खात्याची परवानगी न घेता मायनिंग व्यवसायासाठी बोटींग चौक्या व विविध कामांचे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करून वन संरक्षण कायद्याचा भंग करून मोठ्या प्रमाणात काम चालू असणे." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, वसंतराव खोटरे यांनी "शासन निर्णय दिनांक 30 जून 2006 अन्वये राज्यातील आदिवासी उपयोजन क्षेत्रातील 51 माध्यमिक शाळा पात्र ठरल्या असूनही अनुदान मंजूर न होणे, शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ न करणे, मूळ वेतनात महागाई भत्याचा समावेश न करणे." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली

...... व्ही 3 ...





**सभापती** ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, गजेंद्र ऐनापुरे, कपिल पाटील यांनी "कायम अनुदान तत्त्वावर मायता असा शब्द परवानगी पत्रात वापरल्यामुळे कधीच अनुदान देणार नाही असा त्यातून अर्थ काढणे बरोबर नाही, असा माननीय उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय निश्चित योजना ठरवून टप्प्याटप्प्याने कायम विना अनुदानित शाळांना अनुदानित तत्त्वावर आणले जाईल असे शासनाने प्रतिज्ञापत्रात नमूद करून देखील त्याबाबत कोणताही निर्णय न घेणे." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण आम्ही नियम 93 खाली दिलेल्या या सूचनेवर शासनाला निवेदन करण्याचे आदेश दिले आहेत त्याबद्दल मी आपला आभारी आहे. माझे या बाबत एवढेच म्हणणे आहे की, या लोकांचा 22 तारखेला येथे मोर्चा येऊन गेला. त्यातील काही लोक आमरण उपोषणाला बसले असून त्यांचे उपोषण सुरू आहे आणि त्याचा आज पाचवा दिवस आहे. हायकोर्टाने निर्णय या बाबत दिलेला आहे. मी त्याची तारीख आणि केस नंबर देखील मुद्दाम माझ्या सूचनेमध्ये नमूद करून दिला आहे. हायकोर्टाने आपल्या निर्णयात स्पष्टपणे म्हटले आहे की, कायम विनाअनुदान तत्त्वावर मान्यता असा शब्द परवानगी पत्रात वापरला असला तरी त्यातून या शाळांना कधीच अनुदान देणार नाही असा अर्थ काढणे बरोबर होणार नाही. दुसऱ्यामध्ये असे म्हटले आहे की, कायम विनाअनुदान तत्त्वावर याचा अर्थ विनाअनुदान तत्त्वावर असे वाचले पाहिजे. सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये या संदर्भात एक बैठक देखील झाली आहे. परंतु शासनाने या बाबत प्रतिज्ञापत्र करून देखील कोणताही निर्णय आजवर घेतलेला नाही. तेव्हा या सूचनेवर शासनाकडून करण्यात येणारे निवेदन हे किमान सोमवार वा मंगळवार पर्यंत सभागृहात यावे या दृष्टीने आपण आदेश द्यावेत ही विनंती.

**सभापती** : मी या बाबत शालेय शिक्षणमंत्र्यांना सांगेन, आपणही बोला. चार हजारा मार्चेकरी येथे आलेले आहत आणि त्यातील काही आमरण उपोषणाला बसले आहेत याची दखल घेऊन शासनाने देखील सोमवार-मंगळवार पर्यंत हे निवेदन सभागृहात करावे. माननीय उच्च शिक्षणमंत्री येथे उपस्थित आहेत, त्यांनी शालेय शिक्षण मंत्र्यांना याबाबत सांगावे.





श्री. दिलीप वळसे-पाटील : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, सुरेश जेथलिया, किशनचंद तनवाणी यांनी "राज्यातील ग्रामपंचायत सदस्यांना एका बैठकीचा भत्ता 10 रूपये मिळत असून बैठकीसाठी त्यांना दूरवरून यावे लागत असल्याने सदरचा भत्ता अपुरा असल्याने त्यात वाढ करण्याची आवश्यकता." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

( यानंतर श्री.सरफरे .... डब्ल्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

सन्माननीय सदस्य सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, यांनी "भिवंडी शहराच्या क्वॉर्टर गेट मस्जिद भागात नवीन पोलीस ठाण्याच्या बांधकामास मुंबई उच्च न्यायालयाने परवानगी देऊनही शासनाने असामाजिक व जातीवादी तत्वाच्या धमकीला बळी पडून सदर पोलीस ठाण्याचे बांधकाम सुरु न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. सूचनेतील विषयावर तारांकित प्रश्नोत्तराच्या तासामध्ये चर्चा झाली असल्यामुळे मी सदर सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "वाशिम कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांचा माल खरेदी करीत नसल्याने व माल कमी भावाने विकत घेत असल्याने शेतकऱ्यांनी या विरोधात तेथे ठिय्या आंदोलन सुरु केले असून त्यांच्यावर पोलिसांनी लाठीमार केल्याने त्यात अनेक शेतकरी जखमी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-ो, मी सूच-ोस अ-ुमती -ा□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा □रावे.

सन्मा-ा-ीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यां-ी "राज्यातील शासकीय व निमशासकीय महाविद्यालयामध्ये दिनांक 19 सप्टेंबर, 1991 ते एप्रिल, 2004 या कालावधीत अधिव्याख्याता म्हणून नियुक्ती झालेल्या उमेदवारांना शासनाच्या धोरणानुसार वरिष्ठ श्रेणी लागू करण्यासंदर्भात विद्यापीठांकडून वेळोवेळी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-ो, मी सूच-ोस अ-ुमती -ा□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा □रावे.

सन्मा-ा-ीय सदस्य सर्वश्री. जयंत पाटील, शरद पाटील, कपिल पाटील यां-ी "विदर्भातील उप जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसिलदार इत्यादींनी सुमारे दीड महिन्यांपासून नागरिकांना सर्व प्रकारचे दाखले देणे बंद केल्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जाण्याबाबत" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-ो, मी सूच-ोस अ-ुमती -ा□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा □रावे.

सन्मा-ा-ीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यां-ी "अहमदाबाद येथील झेन टोबॅको प्रा. लि. या कंपनीमार्फत झेन मजा जाफराणी जर्दा 108 या उत्पादनाच्या जाहिरातीवर गौतम बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा ठळक स्वरुपात प्रकाशित करुन त्यावर दिवाळीचा शुभ संदेश

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

देणेबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत -नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी "कुपोषण टाळण्यासाठी शासनाने राजमाता जिजाऊ बाल आरोग्य व कुपोषण मिशन या सारख्या योजना सुरु करुनही सुमारे 11 हजारापेक्षा जास्त बालके कुपोषित असून त्यात 550 बालकांचा व 33 मातांचा मृत्यू होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "गोदावरी नदीचे 7.3 टीएमसी पाणी अडविण्याकरिता सुरु असलेल्या बांधकामाची ट्रायल बोअर घेण्यात आली असता 5 ते 7 मीटर खोलीवर कठीण खडक लागल्याने ट्रायल बोअर करणाऱ्या एजन्सीने आपल्या अहवालात नमूद करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री. प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "वर्धा नगरपरिषदेने बांधलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारकाचे विरुध्द श्री. अशोक मोहोड यांचे अपिल न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतरही शासनाने सदर स्मारक उद्ध्वस्त केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "पाटबंधारे मन प्रकल्प खामगांव जि. बुलढाणा येथील सावरखेड मायनरचे काम गेल्या 8-10 वर्षापासून अपूर्ण असल्यामुळे या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांची अंदाजे 700 एकर शेती ओलिताखाली न येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सिंदखेड राजा या बँकेने सन 2006-07 या वर्षात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/

**सभापती...**

पंतप्रधान पॅकेज अंतर्गत पीक कर्ज वाटपात केलेल्या गैरप्रकाराविरुध्द सहाय्यक निबंधकाकडे तक्रार दाखल करुनही या गैरप्रकाराची चौकशी न होणेबाबत" या विषयावर -नियम 93 अ-वये सूच-ना दिली आहे. तो -नियम 93 चा विषय होत -नसल्या-ने, मी सूच-नेस अ-नुमती -ना□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -निवेद-न □रावे.

सन्मा-ा-नीय सदस्य सर्वश्री. सागर मेघे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यां-नी "राज्य शासनाने नागपूर महानगरपालिकेचे 30 कोटी रुपयांचे अनुदान रोखले असल्याचे नोव्हेंबर, 2007 च्या तिसऱ्या आठवडयात उघडकीस आलेली घटना" या विषयावर -नियम 93 अ-वये सूच-ना दिली आहे. तो -नियम 93 चा विषय होत -नसल्या-ने, मी सूच-नेस अ-नुमती -ना□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -निवेद-न □रावे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नागपूर येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पूर्ण न होणे

**मु.शी.**: नागपूर येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पूर्ण न होणे यासंबंधी सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, वसंत पवार, जितेंद्र आव्हाड, गिरीश गांधी,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. गिरीश गांधी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" नागपूर येथील गरीब रुग्णांना अत्याधुनिक औषधोपचार मिळणेच्या हेतूने सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अद्यापी पूर्ण न होणे, 350 खाटांची क्षमता असताना देखील 120 खाटा उपलब्ध असणे, त्यामुळे रुग्णांची मोठया प्रमाणात होत असलेली गैरसोय, डॉक्टर्स, परिचारिका व कर्मचारी यांची अपुरी संख्या, आधुनिक चिकित्सा यंत्रांची असलेली कमतरता या सर्वांमुळे सामान्य नागरिकांना रोगनिदान व उपचार वेळेवर न मिळणे, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग, अत्याधुनिक चिकित्सा संयंत्रे पुरविणेसाठी शासनाने तात्काळ मदत उपलब्ध करुन देण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना".

श्री.दिलीप वळसे पाटील (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/ KTG/

श्री. गिरीश गांधी : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी याठिकाणी निवेदन सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी वेगवेगळया पध्दतीने तरतूद करण्यासंबंधी सांगितले आहे. मी आपणामार्फत अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, नागपूर शहरामध्ये 1981 साली सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करण्याची घोषणा करण्यात आली.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गिरीश गांधी ....

प्रत्यक्षात कामाची सुरुवात 1993 साली झाली. दोन तपाचा कालखंड पूर्ण होऊन सुध्दा अजूनही त्यासंदर्भात बऱ्याच उणिवा कायम आहेत. असे म्हटले जाते की, "दर्द जब हद से गुजर जाता है तो वही दवा बन जाता है." टप्प्या टप्प्याने जर सर्व होयी होत असतील तर ज्या रुग्णांच्या सोयीसाठी आपण हे सर्व करण्याचे ठरविले होते आणि त्या रुग्णांना जी सेवा मिळावयास पाहिजे होती त्या पध्दतीची सेवा मिळू शकणार नाही. म्हणून माझी अशी विनंती आहे की, याकडे माननीय मंत्रिमहोदयांनी लक्ष पुरविण्याची गरज आहे. माझी अशी माहिती आहे की, कार्डियॉलॉजी निदान यंत्र बरेच जुने झालेले असून ते पूर्णपणे बंद पडलेले आहे. शस्त्रक्रियेसाठी डॉक्टर्स नाहीत, परिचारिका नाहीत, इतर स्टाफ नाही तसेच वैद्यकीय विद्यार्थी नाहीत. मी या सभागृहाचा सदस्य नसताना या सभागृहाचे सदस्य असलेले सन्माननीय श्री. नितीन गडकरी आणि आम्ही काही लोकांनी विनंती करुन ...

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. गिरीश गांधी : त्या ठिकाणी 24 तास डॉक्टर्स नसतात. न्युरॉलॉजी, किडनी, एन्डोक्रायनोलॉजीचे तज्ज्ञ डॉक्टर्स नाहीत ही वस्तुस्थिती आहे काय ? जर ती वस्तुस्थिती असेल तर त्यादृष्टीकोनातून त्वरित पावले उचलण्यात येतील काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर याला जोडून अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर, ज्याला आपण सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल म्हणतो ते स्थापन करण्याच्या संदर्भातील निर्णय 1981 साली घेतला गेला. 1983 साली त्याचे भूमिपूजन झाले. 1995 साली तत्कालीन माननीय राष्ट्रपती डॉ.शंकरदयाल शर्मा यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा संपन्न झाला. ही गोष्ट खरी आहे की, एका बाजूला नागपूर शहरामध्ये असलेले मेडिकल हॉस्पिटल आणि त्याला जोडून असलेले कॉलेज त्याचबरोबर हे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि पोस्ट ग्रॅज्युएशन इन्स्टिटट्यूट स्थापन करण्याच्या संदर्भात निर्णय घेतलेला होता. परंतु गेल्या काही वर्षामध्ये त्यासाठी जो निधी उपलब्ध व्हावयास पाहिजे होता तो आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध झालेला नाही. सन्माननीय सदस्य श्री. गिरीश गांधी यांनी ज्या भावना मांडल्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ MMP

श्री. दिलीप वळसे-पाटील ......

तशाच प्रकारच्या भावना यापूर्वीच्या काळात सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी या सभागृहात मांडलेल्या होत्या. मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, शासकीय मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये असणाऱ्या त्रुटी आणि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये असणाऱ्या त्रुटी यासंदर्भामध्ये काही तरी निर्णय घेऊन सर्व सुविधांनी युक्त असे मेडिकल हॉस्पिटल आणि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन आहे. ज्यावेळी केंद्र शासनाने पंतप्रधान स्वास्थ्य योजना जाहीर केली त्याच्या अंतर्गत देशातील अनेक राज्यांमध्ये एक एम्सच्या दर्जाची इन्स्टिटयूट देण्यात येईल अशी भूमिका त्यांनी घेतली. यामध्ये अशी अपेक्षा होती की, एम्सच्या दर्जाची संस्था स्थापन करताना सगळा सपोर्ट केंद्र सरकार देईल. पण नंतर केंद्र शासनाने जाहीर केले की, एकदाच 100 कोटी रुपये ग्रँट देण्यात यईल आणि 20 कोटी रुपये राज्य सरकारने घालावेत. आपल्या राज्यामध्ये असलेल्या सर्व संस्थांपैकी पाच संस्था यासंदर्भामध्ये विचाराधीन होत्या. दरम्यानच्या काळामध्ये सगळ्यात जुनी असलेली संस्था म्हणजे जे.जे.वैद्यकीय रुग्णालय आणि त्याला जोडून असलेले हॉस्पिटल याचा त्यामध्ये समावेश केला. परंतु अलीकडच्या काळात केंद्र सरकारचे माननीय आरोग्य मंत्री श्री. अंबुमणी रामदास यांच्याशी माननीय मुख्यमंत्री आणि बाकीचे सर्व संबंधित यांची 20.10.2007 रोजी मुंबईमध्ये चर्चा झाली. केंद्रीय आरोग्य मंत्री श्री. अंबुमणी रामदास यांनी महाराष्ट्र सरकारला आणि महाराष्ट्रातील जनतेला आश्वासित केलेले आहे की, ज्याप्रमाणे अन्य 2 राज्यांमध्ये 100-100 कोटी रुपये देऊन 2 संस्था डेव्हलप करण्याची भूमिका घेतलेली आहे त्याप्रमाणे

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील...)

महाराष्ट्रामध्ये सुध्दा अशा प्रकारची भूमिका घेऊन 100 कोटी रुपये उपलब्ध करुन देतो. मी एका कार्यक्रमामध्ये हे जाहीरपणे बोललो देखील आहे. याबाबतीत केन्द्र सरकारशी आमचे संबंध प्रस्थापित झालेले आहेत. श्री. अंबुमणी रामदास यांनी असे सांगितले की, मी माननीय पंतप्रधानांकडे जाऊन आणखी एका संस्थेला 100 कोटी रुपये देण्याची व्यवस्था करतो. याबाबतीत केन्द्र सरकारकडून कम्युनिकेशन प्राप्त झालेले आहे. राज्य सरकारने तत्वत: निर्णय घेतलेला आहे. केन्द्र सरकार आणखी एका संस्थेचा समावेश करील त्यावेळेला नागपूरच्या हॉस्पिटलचा, सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटलचा समावेश त्यामध्ये करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. तरी देखील राज्य सरकारच्या वतीने वेगवेगळया निधीच्या माध्यमातून, मग वैधानिक विकास महामंडळे असतील किंवा अन्य निधी असेल, त्यामधून 16 कोटी 60 लाख रुपये उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतलेला आहे. 13 कोटी 78 लाख रुपये यंत्रसामग्री खरेदीसाठी आहेत. नागपूरचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असेल, आयजीएमसी असेल किंवा बाकीची हॉस्पिटल्स असतील, त्या सर्व हॉस्पिटल्स मधे सुधारणा करण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करणार आहोत. वैद्यकीय शिक्षण किंवा उच्च शिक्षण या बाबतीत केन्द्र आणि राज्य सरकारच्या स्तरावर पाहिजे त्या प्रमाणात प्राधान्य मिळत नाही. तरी सुध्दा या संस्थामध्ये आवश्यक तेवढी यंत्रसामग्री तसेच आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग इत्यादी गोष्टी उपलब्ध करुन देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न राज्य शासनाच्या माध्यमातून सुरु आहेत. या सर्व गोष्टी ठराविक वेळेमध्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न राज्य सरकारच्या माध्यमातून केला जाईल.

श्री. नितीन गडकरी : मागच्या वेळी दिलेला निधी हा नागपूरसाठी अभिप्रेत होता. परंतु तो निधी जे.जे.हॉस्पिटलसाठी वापरण्यात आला. त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. सन्माननीय केन्द्रीय मंत्री श्री. विलासराव मुत्तेमवार यांनी असे सांगितलेले आहे की, नागपूरसाठी 100 कोटी रुपये पाहिजे अशा प्रकारचे माननीय मुख्यमंत्र्यांचे शिफारस पत्र दिले तर 100 कोटी रुपये द्यायला ते तयार आहेत. अजूनपर्यन्त अशा प्रकारचे शिफारसपत्र माननीय मुख्यमंत्र्यांकडून गेलेले नाही. ते पत्र हे अधिवेशन संपण्यापूर्वी पाठविण्यात येईल काय ? मी माननीय केन्द्रीय मंत्र्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर बोलत आहे. त्यामुळे यावेळी नागपूरला 100 कोटी रुपये मिळतील.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी मंत्री महोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांचा कार्यक्षम मंत्री असा उल्लेख केला. माझा देखील आधी तसा समज होता. परंतु आता त्याचे गैरसमजामध्ये रुपांतर होत आहे. तुमच्या संचालकांनी सर्व अधिकार स्वत:कडे ठेवलेले आहेत. खरेदीचे दर मुंबईत ठरतात. मेण्टेनन्सवाल्यांना पैसे दिले जात नाहीत म्हणून मशिनचे मेण्टेनन्स होत नाही. स्टेन्ससाठी पैसे नाहीत. एमपीएससीकडून उमेदवार मिळत नाहीत. एमपीएससी म्हणजे काही गॉडफादर नाही. एमपीएससी कडून उमेदवार मिळत नसतील तर आपण स्वतंत्र्यपणे परीक्षा घेऊन रिक्त जागा भरल्या पाहिजेत. आज परिस्थिती अशी आहे की, मशिन आहे पण ऑपरेटर नाही, ऑपरेटर असला तर मशिन नाही, डॉक्टर नाही. आपण ही सर्व प्रक्रिया गुंतागुंतीची करुन ठेवलेली आहे. डीनला 50 हजारापेक्षा जास्त खरेदीचे अधिकार नाहीत. सभापती महोदय, मी हृदयाच्या जीवनदायी योजनेचा मनपूर्वक फॉलोअप करतो. त्याबाबत मला आपण सहकार्य करता. त्याबद्दल माझी काही तक्रार नाही. पण पैस दिले जात नाहीत म्हणून स्टेन्स घेता येत नाहीत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ 13:05

लक्षवेधी सूचना क्र.1............ श्री.नितीन गडकरी....

ट्रेझरीचे अधिकारी म्हणतात डीनला अधिकार 50 हजार रुपयांपर्यंत आहेत. त्यामुळे त्यांना अधिक पैसा विथड्रॉ करता येत नाही. त्यामुळे मेंटेनन्सच्या बाबतीत अडचणी निर्माण झाल्या आहेत. मंत्रीमहोदय, आपण नागपूरला आहात, त्यामुळे किमान 5-6 गोष्टी कराव्यात. पदे किती रिक्त आहेत, मशिनरी किती आहे आणि त्यापैकी किती सुरु आहे, मेंटेनन्ससाठी पैसे किती दिले, किती आवश्यक आहेत, आवश्यक असणारी औषधी कोणती आहेत, ती औषधी पुरवठा करणारे उपलब्ध आहेत किंवा नाही याचा सविस्तर अहवाल घेऊन आढावा घ्यावा आणि अडचणी दूर कराव्यात. निधीची अडचण आहे, काही प्रशासनाच्या अडचणी आहेत. तेव्हा नागपूरच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या अडचणी दूर करण्याकरिता आपण आठवडाभरात बैठक घेऊन या संदर्भातील अहवाल मागवून घ्यावा आणि तपासणी करावी. मंत्रीमहोदय आपल्या येण्यामुळे कमीत कमी त्या रुग्णालयाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा होईल. या संदर्भात आपण कारवाई करावी आणि ती आपण कराल का? औषधे उपलब्ध नाहीत. आम्ही काय करायचे? गरीब माणसे आमच्याकडे येतात. दरवेळी 500 रुपये, 1000 रुपये आम्ही देतो. औषधे उपलब्ध नाहीत असे सांगितले जाते. महाराष्ट्र सरकारची काय स्थिती आहे? अतिशय वाईट वाटते. सर्व अधिकारांचे मुंबईत केंद्रीकरण करण्यात आले आहे. डीनचे अधिकार वाढवावेत. त्यांना खर्च करण्याचा अधिकार द्यावा. खरे म्हणजे संगणक युगात डायरेक्टर, डेप्युटी डायरेक्टर, ॲडिशनल डायरेक्टर या पदांची काय आवश्यकता आहे? एखादे सॉफ्टवेअर तयार करुन एकाच ठिकाणी ॲप्रूव्हल द्यावी. ॲडमिनिस्ट्रेशन लॅप्सेस दूर करणार का? औषधे नसल्यामुळे रुग्ण परत जातात. एक्सरे मशिनचा वापर बंद आहे. खरे म्हणजे जनता अदालत घेऊन तक्रारी ऐकून प्रश्न सोडविणार आहात का? हार्ट ऑपरेशन आणि बायपास सर्जरीची वेटिंग लिस्ट दोन-दोन महिन्यापासून पडून आहे. मी हात जोडून विनंती करतो. दोन-दोन वर्षे वयाची गरिबांची मुले, त्यांना खायला अन्न नाही, त्यांची वेटिंग लिस्ट करता? गंभीर पेशंट आहेत. महाराष्ट्रातील जीवनदायी योजनेचा आम्हाला अभिमान आहे. या योजनेचा फायदा घेऊन 750 पेक्षा जास्त शस्त्रक्रिया मी करुन दिल्या आहेत. ही योजना युती सरकारचे मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी आणली होती. आपल्या सरकारने ती पुढे चालविली. परंतु या संदर्भात शासनाने जाहिरात केली पाहिजे. या योजनेतून गरीब माणसांचे कल्याण झाले आहे. लोक आमच्या घरी येऊन डोळ्यातून पाणी काढतात. दोन-दोन महिने ऑपरेशन होत नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1............ श्री.नितीन गडकरी....

एक 8 महिन्याचा मुलगा याठिकाणी बायपास होत नाही म्हणून मी मुंबईला पाठविला. काटोल तालुक्यातील एका मुलाला विमानातून मुंबईला नेले आणि तेथे त्याची शस्त्रक्रिया करण्यात आली. परंतु तो मृत्युमुखी पडला. ही योजना सुंदर आहे. परंतु दोन-दोन महिने वेटिंग लिस्ट आहे ती कमी करणार का? ज्याचे हार्ट ऑपरेशन करावयाचे आहे तो थांबू शकतो का? या संदर्भात काहीतरी निर्णय घ्यावा.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी अनेक प्रश्न याठिकाणी उपस्थित केलेले आहेत. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलला केंद्र सरकारकडून 100 कोटी रुपये मिळावयाचे आहेत त्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. या संदर्भात राज्य सरकार केंद्र सरकारच्या पत्राची वाट पहात आहे. त्यांना राज्याची आणखी एक संस्था ॲड करावयाची आहे. मागील वेळी सुध्दा तुमच्या राज्यातील आणखी एक संस्था ॲड करु इच्छितो, तुम्ही सिलेक्ट करुन कळवा असे त्यांनी सांगितले होते. आम्ही या संदर्भात एक पत्र पाठविले असून दुसरे एक पत्र माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीने पाठवावयास कोणतीही अडचण आहे असे वाटत नाही. त्यामधून निश्चित मार्ग निघू शकतो. प्रशासनाशी संबंधित इतर काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. स्टाफ रिक्रूटमेंटच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, गेल्या आठवड्यात मी दोन बैठका घेतल्या. त्यामध्ये काय काय अडचणी आहेत, त्रुटी आहेत या संदर्भातील अहवाल माझ्याकडे उपलब्ध आहे. पोस्ट रिक्रूट करण्याच्या संदर्भात लोकसेवा आयोगाकडून जरुर त्यामध्ये विलंब झाला. परंतु राज्य सरकारने त्यामध्ये भूमिका घेतली आणि लोकसेवा आयोगाकडे मागणी पाठविली आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

त्यांनी यासंर्भात जाहिरात काढली असून जाहिराती काढून रिक्रुटमेंटची प्रोसेस आता सुरु देखील केलेली आहे. आरोग्य विभागाचा विषय मंत्रीमंडळाच्या बैठकीत ऑलरेडी मंजूर झालेला आहे. त्यामुळे यापुढच्या काळात डॉक्टर्स किंवा मेडीकल कॉलेजमध्ये टिचींगच्या ज्या पोस्ट आहेत त्यांना रिक्रुट करण्याच्या संदर्भात विलंब लागत असेल तर एम.पी.एस.सी.च्या कार्यकक्षेतून ही पदे वगळण्याच्या संदर्भात एक तात्वीक निर्णय मंत्रीमंडळाने घेतलेला असून आता या विषयाच्या संदर्भात काही अडचण राहिलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी दुरुस्ती आणि पैशाच्या संदर्भात जो प्रश्न विचारलेला आहे त्यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी या विभागाची सुत्रे हातामध्ये घेतल्यानंतर राज्याच्या प्रत्येंक मेडीकल कॉलेजच्या डीनला 3 लाख रुपयांपर्यंत खर्च करण्याचे अधिकार दिलेले असून डायरेक्टरला 10 लक्ष रुपयांपर्यंत खर्च करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत तसेच कोणत्याही खर्चाची परवानगी मागण्याची फाईल माझ्यापर्यंत येतच नाही. बाकीचे सर्व अधिकार त्या त्या ठिकाणच्या कमिटयांना देण्यात आलेले आहेत. त्या ठिकाणी मेन्टेंनसचे पैसे देण्याचे राहिले असेल तर त्यासंदर्भात जरुर चौकशी करेल. सरकारच्या बाजूने यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा अडथळा नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. मेडीसीनच्या संदर्भात या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मी जरुर आजच माहिती घईन. सभागृहामध्ये येईपर्यंत येथील कॅथलॅब सुरु आहे किंवा नाही, हार्टचे ऑपरेशन होतात किंवा नाही याबाबत माहिती घेऊन आलेलो आहे. आता मी यासंदर्भातही चौकशी करेन . सभागृहामध्ये येईपर्यंत यासंदर्भात जी माहिती घेतली आहे त्यामध्ये मेजर कोणतीही मशिनरी फल्युअर नाही अशाच प्रकारचे ब्रिफींग करण्यात आलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सकदेव मॅडम असतांना हार्ट डिपार्टमेंटच्या प्रमुखांना मी विनंती केल्यानंतर त्यानी मला हात जोडून असमर्थता व्यक्त केली की, मशिन बंद असल्यामुळे मी ऑपरेशन करु शकत नाही. कोणत्या मशीन्स बंद आहेत याबाबत खोलात जाऊन चौकशी करा. माझी आजची माहिती अशी आहे की, आज देखील हार्टचे ऑपरेशन्स या ठिकाणी केले जात नाही. हार्ट ऑपरेशनची वेटींग फार मोठी आहे. त्यामुळे यासंर्भातील कारणे शोधा व त्यातून मार्ग काढून द्या. गरीब लोकांचे ऑपरेशन झाले पाहिजे एवढीच माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, नागपूरला असलेली जी कॅथलॅब आहे ती बरीच जुनी आहे. त्यामुळे ही बाब जरुर तपासून घेण्यात येईल. हार्टच्या रिलेटेड ॲक्टीव्हीटी थांबल्या असतील तर त्या ॲक्टीव्हीटी सुरु करण्याच्या दृष्टिकोनातून काय काय करावयास लागेल यासंदर्भात जरुर कार्यवाही केली जाईल. या हॉस्पीटलला लागणा-या ज्या मशिनरीज आहेत त्या देण्याच्या संदर्भात आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले आहेत. यामध्ये सगळयांचा एकत्रित एफर्ट असला पाहिजे. डे टू डे मॅन अँड मॅनेजमेंटचे प्रश्न असूही शकतात. यासंदर्भात मी पुन्हा एकदा मिटींग घेईन कारण, "मशिनरी बंद असल्यामुळे रुग्णांचे होत असलेले हाल." हाच या लक्षवेधी सूचनेचा मुख्य विषय आहे. या लक्षेवधी सूचनेला उत्तर देण्याच्या आधी मी जेव्हा विभागाकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला होता तेव्हा मला असे ब्रिफ करण्यात आले होते की, आजच्या तारखेला कोणतीही मेजर इक्वीपमेंट बंद नाहीत तसेच हार्टचे ऑपरेशन करण्याचे थांबलेले आहे असा त्यामध्ये कोठेही उल्लेख झालेला नाही. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य आहेत, आपण जी माहिती दिलेली आहे ती पुन्हा एकदा तपासून घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असेल तर ती नक्की करण्यात येईल.

सभापती महोदय, हार्टच्या ऑपरेशनच्या संदर्भात वेटींग लिस्ट असू शकेत. वेटींग लिस्ट नाही असे म्हणण्याचे मला काही कारण नाही कारण इंग्लडसारख्या प्रगत राष्ट्रामध्ये सुध्दा हार्टच्या ऑपरेशन्सची वेटींग लिस्ट आहे. तिकडे वेटींग लिस्ट आहे म्हणून आपल्याकडे सुध्दा हार्टच्या ऑपरेशनची वेटींग लिस्ट असलीच पाहिजे असे काही नाही. वेटींग लिस्टच्या संदर्भात अडचणी काय काय आहेत त्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टिकोनातून याचा निश्चित विचार केला जाईल.

तसेच सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केला आहे की, मोठया प्रमाणात पोस्ट ठेवण्याच्या ऐवजी हॉस्पीटलच्या मॅनेजमेंटसाठी काही तरी सिस्टीम तयार केली पाहिजे त्यामुळे मी आपल्याला सांगू इच्छितो की, यासंदर्भात राज्यसरकारने याआधीच निर्णय घेतलेला आहे. जवळपास 180 कोटी रुपये खर्च करुन हॉस्पीटल मॅनेजमेंट आणि इन्फॉर्मेशन सर्व्हीसेस नावाचे पॅकेज मंत्रीमंडळाने बी.ओ.टी. तत्वावर तयार केलेले आहे. या पॅकेजची सुरुवात मुंबईतील

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

जे.जे. रुग्णालयात प्रायोगिक तत्तवावर केलेली आहे. या ठिकाणी सक्सेसफूल ट्रायल झाल्यानंतर राज्यातील सर्व मेडीकल कॉलेजमध्ये व हॉस्पीटल्समध्ये हे सॉफट्‌वेअर वापरले जाणार आहे. यामधून हॉस्पीटल मॅनेजमेंट, टिचींगचा विभाग आणि बाकीच्या सर्व गोष्टी करण्याचा आपला प्रयत्न आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील................

सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, नवीन टेक्नॉलॉजी वापरुन काम केले पाहिजे. मी याबाबत त्यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात शासनाने एका वर्षापूर्वीच कामास सुरुवात केलेली आहे.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, मी नागपूर मेडिकल कॉलेजचा विद्यार्थी असल्यामुळे त्या कॉलेजबद्दल माझ्या भावना तीव्र स्वरुपाच्या आहेत. याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर वाचल्यानंतर अशी भावना होते की, या कॉलेजबद्दल विशेष करुन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलकडे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. सन्माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील जेव्हा मंत्री झाले तेव्हा त्यांच्याबद्दलच्या अपेक्षा खूप वाढल्या होत्या. मी तोंडावर स्तुती करीत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी ज्या ज्या खात्यांचा कारभार पाहिला त्या त्या खात्याचे त्यांनी सोनं केलेले आहे. तेव्हा माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, त्यांनी या दुर्लक्षित झालेल्या हॉस्पिटलकडे जातीने लक्ष घालावे. सभापती महोदय, या हॉस्पिटलची घोषणा तत्कालीन माननीय मुख्यमंत्री यांनी 1.12.1981 रोजी हिवाळी अधिवेशनात केली. कोनशीला समारंभ 9.12.1983 रोजी झाला. 1985 मध्ये महामहीम राष्ट्रपती डॉ.शंकर दयाल शर्मा यांच्या हस्ते पहिल्या टप्प्याचे उद्‌घाटन झाले. त्यावेळी एकूण 2.67 कोटी रुपये खर्च झाला. दुसरा टप्पा करण्यासाठी 13-14 वर्षांचा कालावधी लागला. मागील वर्षात तो पूर्ण झाला. विटा, सिमेंट, दगड इत्यादींनी इमारत तयार झालेली आहे खरी पण त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची सुविधा नाही. त्याठिकाणी डॉक्टर्स नाहीत. सन्माननीय सदस्य नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे तेथे कोणत्याही प्रकारची यंत्र सामुग्री नाही. त्याठिकाणी पोस्ट ग्रॅज्युएट ट्रेनिंग इन्स्टिटयूटचा पत्ता नाही. विदर्भाकडे पूर्णत: दुर्लक्ष केले जात आहे. दिल्लीतील ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायसेन्सने भारतातील सर्व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी निधी जाहीर केला. आम्हाला वाटले की, हा निधी नागपूर मेडिकल कॉलेजला मिळेल, परंतु तो निधी मुंबईतील जे.जे. व के.ई.एम. रुग्णालयास मिळाला. मुंबईत अनेक सुपर स्पेशालिटी हॉस्टिपल्स आहेत. त्याठिकाणी रुग्णांवर चांगल्या प्रकारचे उपचार होतात. तेव्हा तो निधी नागपूर मेडिकल कॉलेजला मिळावयास पाहिजे होता. पण विदर्भास याही ठिकाणी न्याय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी................

मिळाला नाही. पुढील वेळस हा निधी मिळेल अशी आम्ही आशा करतो. सभापती महोदय, या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कार्डिॲक सर्जरी नाही. न्युरॉलॉजी विभाग आहे. न्युरॉलॉजी सर्जरी होते पण न्युरॉलॉजीची मेडिकल ट्रीटमेंट नाही. किडनी हा खर्चिक आजार आहे. याठिकाणी किडनीचा विभाग आहे, पण त्याठिकाणी फक्त डायलेसीस होते. ट्रान्सप्लान्टची सोय नाही. या सर्व गोष्टींवरुन असे दिसून येते की, या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलकडे शासनाचे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष झालेले आहे. दुसऱ्या टप्प्याचे काम दीड वर्षापूर्वी पूर्ण झाले. इमारत पूर्ण झालेली आहे. पण त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची यंत्रसामुग्री नाही. डॉक्टर्स नाहीत, कॉटस् नाहीत....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य जी माहिती देत आहेत ती माहिती मंत्रिमहोदयांकडून कशी येईल असे प्रश्न त्यांनी विचारावेत जेणेकरुन आपला उद्देश सफल होईल.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी : तालिका सभापती श्रीमती ऊषाताई दराडे)**

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदया, मी याठिकाणी जी माहिती दिली, त्या सुविधा तेथे नाहीत. माझा याठिकाणी प्रश्न आहे की, आपण या सगळया सोयी-सुविधा कधी तयार करणार आहात ? गेल्या 27 वर्षापासून आपण दुसरा टप्पा पूर्ण करीत आहात आणि आता तिसऱ्या टप्प्याचे बांधकाम सुरु होणार आहे. ते बांधकाम आपण किती वर्षात पूर्ण करणार ? गेल्या 27 वर्षांमध्ये फक्त 5 कोटी 39 लाख रुपये या इतक्या मोठया प्रोजेक्ट वर खर्च झालेले आहे. हे अक्षम्य दुर्लक्ष आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, याठिकाणी थोडीशी गल्लत होत आहे. एक तर येथील मेडिकल कॉलेज हे 1947 सालामध्ये स्थापन करण्यात आलेले असून त्याला अटॅच असेलेले हॉस्पिटलही 1947 सालामध्येच स्थापन करण्यात आलेले आहे. तसेच सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल हे 1995 मध्ये स्थापन करण्यात आले. नागपूर येथे जे हॉस्पिटल आहे, त्यामध्ये 1400 बेडस् आहेत, त्याची आपण येथे चर्चा करीत नसून सन 1995 सालामध्ये स्थापन झालेल्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसंबंधी याठिकाणी चर्चा करीत आहोत. तेथे 120 बेडस् आहेत. याठिकाणी असा मुद्दा मांडण्यात आला की, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे काम सुरु नाही. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. माननीय गडकरी साहेबांना याची माहिती आहे की नाही हे मला माहीत नाही. परंतु यासाठी एक कमिशन नेमले होते व त्या कमिशनने त्यांचा रिपोर्टही दिलेला होता की, या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची आवश्यकता नसून ते बंद करण्यात यावे. अशाप्रकारचा रिपोर्ट त्या कमिशनने दिला होता. तरीसुध्दा तशाप्रकारचा बंद करण्याचा निर्णय तुमच्याही सरकारने घेतला नाही व आमच्याही सरकारने घेतलेला नाही. याठिकाणी प्रश्न असा आहे की, मेडिकल कॉलेजच्या, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या माध्यमातून पोस्ट ग्रॅज्यूएट कोर्सेस सुरु करण्यास उशीर झालेला आहे. याठिकाणी मी सांगू इच्छितो की, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कार्डिऑलॉजी, सी.टी.एस., नेफ्रोलॉजी व न्यूरो सर्जरी हे सर्व विभाग व त्याचे सहाय्यक विभाग सुरु केलेले आहेत. ते सुरु करीत असताना या 120 बेडस्च्या हॉस्पिटलमध्ये आजच्याघडीला जवळपास 149 पदांची कमतरता आहे. त्यामध्ये आणखी वर्ग-3 व 4 च्या पदांचा समावेश केला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

तर तो आकडा आणखी मोठा होईल. ही सगळी पदे मंजूर करावयाची म्हटली तर त्यासाठी जवळपास 9 कोटी 36 लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. तसेच, रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्यामुळे 120 बेडस्‌चे हॉस्पिटल 180 बेडस्‌चे करण्याच्या दृष्टीनेही त्याबाबत राज्य सरकारने विचारविनिमय सुरु केलेला आहे. विभिन्न विषयाचे कोर्सेस सुरु करण्यासाठी जी अधिकची पदे निर्माण करणे आवश्यक आहेत, त्यासंबंधीची ही चर्चा आहे. याठिकाणी मेडिकल कॉलेजला अटॅच असलेल्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसंबंधी चर्चा करण्याचे सोडून आपण एखाद्या जनरल हॉस्पिटलसंबंधी चर्चा करीत आहोत. त्याठिकाणी मेडिकल एज्यूकेशनचे जे काम आहे, ते काम चालू आहे. पण हे दोन वेगळे विषय आहेत. दुर्दैवाने नागपूरसारख्या शहरामध्ये आय.जी.एम.सी., डॉ.आंबेडकर मेडिकल कॉलेज अशी दोन कॉलेजस्‌ आहेत. महापालिकेचे जे हॉस्पिटल्स्‌ आहेत, त्याठिकाणी सुविधा करण्याच्या बाबतीत त्या हॉस्पिटल्स्‌नी व नागपूर महानगरपालिकेने जशी काळजी घ्यावयास पाहिजे, तशी ती घेतली जात नाही. त्यामुळे त्याचा परिणाम गर्व्हन्मेंट हॉस्पिटलवर पडतो. त्यामुळे आपल्याला या हॉस्पिटल्समध्ये सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यासाठी उशीर जरुर झालेला आहे. त्यावेळी सन 2004 मध्ये काय झाले, याचे उत्तर मी देऊ शकणार नाही परंतु 2004 नंतर विदर्भातील हे हॉस्पिटल, मुंबई, पुणे येथील हॉस्पिटलसारखे चांगल्या दर्जाचे करण्याच्या दृष्टीने विभागाने जरुर प्रयत्न केलेले आहेत. त्यासंदर्भात आम्ही आराखडाही तयार केला आहे. नागपूर गर्व्हन्मेंट हॉस्पिटलमध्ये, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये व अन्य हॉस्पिटलमध्ये सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी 120-127 कोटी रुपयांचा आराखडा तयार केलेला आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील......

केंद्र सरकारकडून यासंदर्भामध्ये इंडिकेशन आल्यानंतर 100 कोटी रुपये केंद्र सरकारचे आणि 20 कोटी रुपये राज्य सरकारचे असा निधी उपलब्ध करुन देऊन ठराविक कालावधीमध्ये यंत्रसामुग्री घेण्याबाबतचा कार्यक्रम पूर्ण करण्यात येईल. सद्य:स्थितीत त्या ठिकाणी यंत्रसामुग्री काहीच नाही, अशी परिस्थिती नाही. त्या ठिकाणी यंत्रसामुग्री आहे, काही अडचणी येतात, वैद्यकीय क्षेत्रामध्ये किती अडचणी आहेत हे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांना माहित आहे. विभागाविभागांमध्ये काय चाललेले असते, डॉक्टर-डॉक्टर यांच्यामध्ये काय चाललेले असते, या सगळया सिस्टिमची माहिती आपल्याला आहे, त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. परवा स्वातंत्र्याला साठ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने नागपूर येथे कार्यक्रम होता त्यावेळी हे जाहीर करण्यात आले होते की, 120 कोटी रुपये मिळवून देऊन विदर्भातील सर्वसामान्य लोकांना सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून, दर्जेदार वैद्यकीय सुविधा देण्याच्या दृष्टीकोनातून सरकारने जाणीवपूर्वक पावले टाकण्यास सुरवात केली आहे. ठराविक वेळात ही कामे पूर्ण केली जातील.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, काही पावले तातडीने उचलण्याची गरज आहे. एन्जीओग्राफी आणि एन्जीओप्लास्टीची यंत्रणा आऊटडेटेड झालेली आहे, ती बदलणे आवश्यक आहे. येथे बोलणे बरोबर होणार नाही पण मी सांगू इच्छितो की, आमच्या गावातील एक पेशंट हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाला, त्याच्यावर एन्जीओग्राफी करण्याऐवजी एन्जीओप्लास्टी करण्यात आली, टेक्नॉलॉजी अपुरी असल्यामुळे दुर्देवाने तो जीवानिशी गेला. अशी अनेक उदाहरणे आहेत. आज बाजारात सर्व अद्ययावत मशिनरी उपलब्ध आहे. त्यामुळे ताबडतोब ही मशिनरी त्या ठिकाणी बसविण्यात यावी.

सभापती महोदय, किडनी ट्रान्सप्लांटची सोय नागपूरमध्ये उपलब्ध नाही. सध्या किडनीच्या रोग्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करुन घेण्यात येते, त्यांच्यावर औषधोपचार करण्यात येतात, डायलेसिस करण्यात येते, परंतु जर आजार बळावला आणि किडनी ट्रान्सप्लांट करण्याची वेळ आली तर त्या पेशंटला मुंबईला जाण्याचा सल्ला देण्यात येतो. अगोदरच किडनीचा औषधोपचार हा खर्चिक असतो, गरीब रुग्णांना मुंबईला जाऊन औषधोपचार घेणे आणखी जिकरीचे होते.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी........

त्यामुळे किडनी ट्रान्सप्लांटची सुविधा नागपूरमध्ये उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी यांनी सूचविलेल्या सुविधांचा समावेश जो कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे त्यामध्ये करण्यात येईल.

श्री.सागर मेघे : सभापती महोदय, 120 कोटी रुपये केंद्र शासनाकडून प्राप्त झाले. मागच्या अधिवेशनामध्ये माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, जुने हॉस्पिटल असल्यामुळे मुंबईच्या हॉस्पिटलला पैसे दिलेले आहेत, आता पेट्रोलियम मिनिस्टर माननीय श्री.मुरली देवरा यांच्याशी चर्चा करुन निधी उपलब्ध करुन घेऊन नागपूरला कॉलेज देऊ. या पैशांचे काय झाले, याची माहिती अद्याप मिळालेली नाही. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलबद्दल आपण बोलत आहोत. हे हॉस्पिटल गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजला ॲटॅच आहे. गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज हे टिचिंग हॉस्पिटल आहे, असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. अद्याप या कॉलेजने यु.जी.कोर्स रिकग्नेशनसाठी ॲप्लाय केलेला नाही. मधल्या कालावधीत मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियाचे पी.जी.ऑर्थोपेडिक्ससाठी इन्स्पेक्शन झाले. पण पी.जी.ऑर्थोपेडिक्सचे रिकग्नेशन मिळालेले नाही. मला वाटते आता जर मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियाला कळविले तर पी.जी.ची डिग्री रिकग्नाईज होऊ शकते.

सभापती महोदय, माझा पुढचा विषय असा आहे की, प्रायव्हेट मेडिकल कॉलेजेसना पोस्टमार्टेमची परमिशन नसल्यामुळे फोरॅन्सिक मेडिसिनचा पी.जी.चा कोर्स कोणतेही प्रायव्हेट कॉलेज उघडू शकत नाही. आज शासकीय मेडिकल कॉलेज 1947 पासून सुरु झाले आहे. त्या ठिकाणी फोरॅन्सिक मेडिसिनचा पी.जी.चा कोर्स नाही. पोस्टमार्टेम करण्यासाठी संपूर्ण भारतात डॉक्टरांची कमतरता भासत आहे. म्हणून शासन फोरॅन्सिक मेडिसिन पी.जी.कोर्ससाठी अर्ज करणार काय ?

सभापती महोदय, माझा शेवटचा विषय असा आहे की, जीवनदायी योजनेची वेटिंग लिस्ट मोठी आहे. नागपूरमध्ये चार/पाच खाजगी हॉस्पिटल्स आहेत. व्होकार्ट आहे, डॉ.कर्णिकांचे हॉस्पिटल आहे, डॉ.माहुरकरांचे आहे, डॉ.देशपांडेचे आहे. या खाजगी हॉस्पिटल्सकडे जीवनदायी

...3.....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सागर मेघे...........

योजनेचे पैसे वळते केले आणि त्यांच्याकडे रुग्ण पाठविले तर ही वेटिंग लिस्ट कमी होऊ शकेल. यादृष्टीने शासन विचार करणार काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सागर मेघे यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केल्या. 100 कोटी रुपये मुंबईला देतांना एक जनरल चर्चा विदर्भामध्ये होत होती व त्याचे खंडन करण्याचा मी प्रयत्न केला आहे. असे नाही की, त्यामध्ये केंद्र शासनाने एखाद्या विशिष्ट संस्थेसाठी हे पैसे दिले आहेत.

यानंतर श्री.बोरले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील ........

त्याचा निर्णय राज्य सरकारने घ्यावयाचा होता आणि राज्य सरकारने तो निर्णय घेतलेला आहे. जे.जे. सारख्या 160 वर्षे पूर्ण झालेल्या संस्थेला प्रायॉरिटी देण्याचे आपण ठरविले. पेट्रालियम मिनिस्ट्रीच्या माध्यमातून निधी मिळण्यासंदर्भात आपण त्यांच्याकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. सदर प्रस्ताव त्यांच्याकडे पाठवित असतांना त्यांनी डोनेशन द्यावयाचे आहे. दॅट इज नॉट ग्रॅंट. ज्यांनी डोनेशन द्यायचे आहे त्यांच्या सुध्दा काही गोष्टी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. त्यांनी आपल्याला पैसे देण्याचे मान्य केलेले आहे. राज्य सरकारचा असा आग्रह आहे की, हे पैसे विदर्भातील हॉस्पिटला मिळाले पाहिजेत. मी आपल्या सांगू इच्छितो की, आवश्यकता असेल तर येत्या सोमवारी मी या सभागृहातील नागपूरच्या स्थानिक आमदारांची बैठक बोलावितो. तुमच्या सूचना तुम्ही त्या बैठकीमध्ये मांडा. 10 वर्षे जुनी कॅथलॅब आहे. कार्डियाकची ऑपरेशन्स आपण त्या लॅबमध्ये करतो. 10 वर्षाचा कालावधी झाल्यानंतर 8-10 कोटी रुपये खर्च करुन नवीन कॅथलॅब सुरु करावयाची म्हटले तर सरकारला ते लगेच शक्य होत नाही. राज्य सरकारने मागील तीन वर्षामध्ये जवळ जवळ 16 कोटी रुपये वेगवेगळी यंत्रणा उपलब्ध करुन देण्यासाठी या रुग्णालयाला दिलेले आहेत. जीवनदायी योजना राबवित असतांना त्यामध्ये मेडिकल एज्युकेशनचा किती रोल आणि आणि पब्लिक हेल्थचा किती रोल आहे ही बाब मला तपासून घ्यावी लागेल. सार्वजनिक आरोग्य विभागाबरोबर आणि इतर विभागांबरोबर यासंदर्भात चर्चा करुन तशी सिस्टीम तयार करता आली तर राज्य शासन त्याचा जरुर विचार करेल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या भागातील हा प्रकल्प जे.जे. येथे गेला. विदर्भामध्ये असे म्हटले जात असे की, तुम्हाला पाठवू का मेडिकलला. सांगायचे तात्पर्य असे की, मेडिकल कॉलेज ही संपूर्ण विदर्भासाठी उत्तम अशा प्रकारची व्यवस्था होती. आपण म्हणाला ते बरोबर आहे की, कोणा एका कॉलेजसाठी 100 कोटी रुपये देण्यात आले नव्हते. राज्य शासनाने जे.जे. हॉस्पिटलकडे जाण्याचा निर्णय घेतला. मुंबईला जे.जे. हॉस्पिटलशिवाय इतर अनेक उत्तम फॅसिलीटी देणारी हॉस्पिटल्स आहेत. माननीय मंत्री महोदयांनी समाधानकारक उत्तर दिलेले आहे. मी आता लहान-सहान प्रश्न विचारत नाही. ते प्रश्न सुध्दा महत्वाचेच आहेत. 120 कोटींचा प्रकल्प

प्रा.बी.टी.देशमुख ........

येथे सुरु केला जाईल, असे मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. त्यासाठी निश्चित असा कालावधी आपण दिलेला नाही. माझे असे म्हणणे आहे की, या राज्याची विशेष परिस्थिती त्यांच्या लक्षात आणून देऊन महाराष्ट्रातील सर्व मंत्री महोदयांना सोबत घेऊन माझी खात्री आहे की, आपण मनात घेतले तर आपण ते करु शकता. 120 कोटी विषयी आपण ठामपणे सांगितले. प्रकल्प पूर्ण होणे ही वेगळी गोष्ट आहे. हा 120 कोटींचा प्रकल्प दोन-चार महिन्यात किंवा निदान पुढच्या अधिवेशनाच्या आधी कार्यान्वित होईल, असे आपण सभागृहाला ठामपणे सांगाल काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, मंत्र्यांना घेऊन किंवा एखादे डेलिगेशन घेऊन जाण्याची आवश्यकता नाही. कारण केंद्रीय आरोग्य मंत्र्यांनी स्वत: मुंबईमध्ये येऊन यासंदर्भात घोषणा केलेली आहे. मुंबईतील कार्यक्रम संपल्यानंतर मी ज्यावेळी नागपूरला आलो त्यावेळी मी माननीय मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करुनच नागपूरला आलो होतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, आपण यासंदर्भातील औपचारिक घोषणा त्या ठिकाणी करु. केंद्रीय आरोग्य मंत्र्यांनी पैसे देण्याचे कबूल केलेले आहे. यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्र्यांच्या त्यांच्या मंत्रिमंडळासमोर जावे लागेल. मंत्रिमंडळाने 100 कोटी रुपये मंजूर केल्यानंतर ते पैसे आपल्याकडे येतील. त्यानंतर हे पैसे नागपूरच्या मेडिकल कॉलेजसाठी किंवा हॉस्पिटलसाठी खर्च करण्यात येतील. राज्य शासन यासाठी स्वत:चे 120 कोटी रुपये देणार आहे.

यानंतर कु.जयश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील......

आता हा जो 120 कोटी रुपयांची तरतूद आहे, त्याच्याव्यतिरिक्त आपले जे बजेट असते, त्यामधून दरवर्षी म्हणजे गेली काही वर्षे सगळयाच हॉस्पिटल्संना पैसे उपलब्ध करुन दिले जातात, त्याच पध्दतीने या हॉस्पिटलला देखील पैसे उपलबध करुन देण्यात येणार आहेत. फक्त त्याकरिता दोन,तीन किंवा सहा महिन्याची मर्यादा ठरविता येणार नाही, कारण हे पैसे कसे खर्च करावयाचे याचा डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट केंद्राकडे पाठविल्यानंतर त्याची स्क्रुटिनी केंद्राच्या माध्यमातून होत असतांना ते त्यांची कमिटी आपल्या राज्यामध्ये पाठवितात आणि त्या कमिटीच्या माध्यमातून काय घ्यावयाचे आणि काय नाही घ्यावयाचे याचे प्लॅनिंग केंद्रसरकारच्या माध्यमातून केले जाते. जे.जे.चा प्रकल्प ज्या पध्दतीने पुढे नेण्यासाठी प्रयत्न केला गेला, त्याच पध्दतीने हा प्रकल्प देखील पुढे नेण्यासाठी प्रयत्न केले जातील. यामध्ये पॉलिटिकल माईंड ॲप्लिकेशन वगैरे असे काहीही नाही कारण असे जर असते, तर हा प्रकल्प मी पुण्याला ससून रुग्णालयामध्ये सुध्दा नेऊ शकलो असतो परंतु मी तसे केलेले नाही. महाराष्ट्राच्या गोरगरिबांची, मुंबईत स्थलांतरित होणा-या पेशंट्सची संख्या लक्षात घेता जे.जे.चा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केला गेला. त्याचप्रमाणे या प्रकल्पासाठी सुध्दा राज्यसरकार प्रयत्नशील राहील. हे सर्व पैसे या प्रकल्पावर खर्च करण्याच्या दृष्टीकोनातून आणि तो लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून राज्यसरकार प्रयत्नशील राहील.

श्री.रमेश निकोसे : वैद्यकीय अभियांत्रिकी तंत्रनिकेतन, शासकीय महाविद्यालयातील शिक्षकांची पदे भरण्यासाठी सुध्दा एक प्राधिकरण स्थापन करण्याची आवश्यकता आहे त्याची स्थापना कधी होईल ? आणि माझा आणखी दुसरा प्रश्न असा आहे की, डॉ.चौबे,वैद्यकीय अधिष्ठाता यांचा मुलगा श्री.समीर चौबे याने ऑनररी सेवा देण्याचे कबूल करुन त्यासाठी पाच वर्षापूर्वी अर्ज देखील सादर केलेला आहे, त्याचा मी पाठपुरावा करीत असतांना मला विभागातर्फे असे सांगितले जाते की,हे प्रकरण अजून कन्सिडरेशनखाली आहे. सदर व्यक्ती मोफत सेवा देण्यासाठी तयार आहे, तो डीनचा मुलगा असल्यामुळे त्याला पैशाचा प्रश्न नाही तरीदेखील त्याच्या प्रकरणाचा निकाल लावला जात नाही, ही खेदाची बाब आहे. नागपूरच्या सर्व स्थानिक लोकप्रतिनिधींची बैठक बोलावून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची स्थापना हा प्रश्न तातडीने निकालात काढण्यात येईल का ?

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील : सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे आता ज्या प्रकरणावर बोलले, त्याविषयी मी असे सांगू इच्छितो की, शिक्षकांची पदे भरण्याच्या संदर्भातील एक प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय राज्यशासनाने तत्वत: घेतलेला आहे,फक्त मंत्रिमंडळामध्ये जाऊन त्याचा निर्णय घ्यावयाचा नाही. सदर श्री.चौबे या ऑनररी सेवा देऊ इच्छिणा-या व्यक्तीची फाईल का अडली आहे,याबद्दल मला माहिती नाही परंतु ताबडतोबीने नियुक्ती देण्याच्या संदर्भाने प्रयत्न केला जाईल. आणि यासंदर्भात नागपूर येथील स्थानिक आमदारांची बैठक सोमवारी बोलाविली जाईल.

श्री.सय्यद कमरुझ जामा :नागपुर के गवर्नमेंट मेडिकल कॉलेज, इंदिरा गांधी मेडिकल हॉस्पिटल और सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल में स्टाफ की नियुक्ति के संबंध में अलग से प्राधिकरण स्थापित करने के बारे में अभी यहां कहा गया है. लेकिन वह सिर्फ इन कॉलेजों में प्रोफेसर्स की नियुक्ति के संबंध में कहा गया है. लेकिन मैं यह जानना चाहता हूं कि इन हॉस्पिटलों में तृतीय श्रेणी और चतुर्थ श्रेणी के कर्मचारियों की भरती के संबंध में क्या योजना बनाई गई है ?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय,टिचिंग आणि नॉन टिचिंग पोस्ट्स या सगळया पोस्ट्स 100 टक्के भरण्याच्या संदर्भाने राज्यसरकारचे प्रयत्न सुरु आहेत. सदर प्रस्ताव घेऊन मी ज्यावेळी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये गेलो त्यावेळी नियोजन आणि वित्त विभागाच्या माध्यमातून जसजशी निधीची तरतूद व उपलब्धता होईल तसतसा राज्यसरकारच्या वतीने प्रयत्न केला जाईल.

श्री.केशवराव मानकर : सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये अतिदक्षता विभाग स्थापन करण्याकरिता परवानगी आणि एक्स्टेन्शन मिळाल्यानंतर त्याचे सर्व काम देखील पूर्ण झालेले आहे. त्या हॉस्पीटलमध्ये ऑपरेशन झाल्यानंतर दोन रुग्ण अद्यापही त्या अतिदक्षत विभागामध्ये ठेवण्याच्या सेवेपासून वंचित राहिलेले आहेत. सर्व काम पूर्ण झालेले असतांनाही तो अतिदक्षता विभाग सुरु केलेला नाही.

....यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, हे का सुरु झाले हे मला माहिती नाही. परंतु माझ्याकडून काही काम थांबलेले नाही. सुरु झाले नसेल तर ताबडतोब सुरु करण्यासाठी सूचना देण्यात येतील. याबाबत सोमवारी आयोजित केलेल्या बैठकीस संबंधित सदस्यांनी उपस्थित राहावे ही माझी आग्रहाची विनंती आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.** : अमरावती जिल्हयातील अचलपूर येथे वीज वितरण कंपनीने अचानक दंडनीय शुल्काची रक्कम भरण्याची केलेली मागणी.

**मु.शी.** : अमरावती जिल्हयातील अचलपूर येथे वीज वितरण कंपनीने अचानक दंडनीय शुल्काची रक्कम भरण्याची केलेली मागणी या संबंधी सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, रमेश निकोसे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"स्वाभिमान योजनेअंतर्गत अतिरिक्त विद्युत भार नियमित करण्यासाठी अमरावती जिल्हयातील अचलपूर येथील राज्य वितरण कंपनीने दिनांक 25 आक्टोबर, 2007 रोजी वा त्या सुमारास अचानक दंडनीय शुल्काची रक्कम भरण्याची केलेली मागणी. शेतीचे उत्पन्न वाढ, विंधन विहीरी, शेततळे, कालव्यातील पाणी उपसण्यासाठी विजेची गरज असताना खरीप व रब्बी हंगामात विजेचा अनियमित होणारा वीज पुरवठा, शेतीच्या उत्पन्नावर त्याचा झालेला परिणाम, शेती हा व्यवसाय राष्ट्रीय उत्पन्नाचा एक भाग असल्याने शेतीसाठी वीज माफक दरात आणि नियमित पुरविण्याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न पुरविल्यामुळे शेतकरी वर्गात निर्माण झालेली चिडीची, असंतोषाची व नैराशाची भावना व या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया"

श्री.दिलीप वळसे-पाटील (उर्जामंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, राज्य सरकारने 15 वर्षापासून याबाबत स्थगिती दिलेली आहे ती रक्कम दंड व व्याजासह भरा, अन्यथा लाईन तोडू असा इशारा विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना दिलेला आहे हे खरे आहे काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, अमरावती परिमंडळात 16568 कृषी पंपधारकांनी वीज जोडणी मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे, त्यापैकी किती पंपाना नियमित वीज पुरवठा सुरु करण्यात आला आहे ? याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ही लक्षवेधी कृषी स्वाभीमान योजना राबविण्याबाबत या लिमिटेड विषयावर आहे. संपूर्ण वीज मंडळाची चर्चा येथे करावयाची म्हटले तर थोडसे अवघड जाईल. त्यामुळे कृषी स्वाभीमान योजना काय आहे, ही कधी व का सुरु केली, कधी बंद केली, त्याचे फलित काय ? यासंदर्भात लिमिटेड चर्चा झाली तर बरे होईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आम्ही 3 एच.पी. पंप बसविला तर तुम्ही लोडशेडींग करता. 16 ते 18 तास लोडशेडींग केले जाते. उरलेल्या चार तासात आम्ही शेतीला पाणी देऊ शकत नाही. म्हणून आम्ही 3 एच.पी. ऐवजी 5 एच.पी. चा पंप लावला. 5 एच.पी. चा पंप तुमच्यामुळे लावला आहे. तुम्ही लोडशेडींग केले नसते तर 3 एच.पी.वर आमचे काम झाले असते. मग 5 एच.पी. पंप वापरले तर तुम्ही आम्हाला चोर ठरविता. सभापती महोदय, हा कोणता न्याय आहे ?. मागे वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी एक बील आणले होते. तुम्ही असेच त्यांचे ऐकणार असाल तर ते तुमची वाट लावणार आहेत. त्यातील काही अधिकारी तसेच आहेत. ते त्याकरिता बसले आहेत. त्यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी पाठविले असेल तर मला माहिती नाही. स्वाभीमान योजना का सुरु करु देत नाही ?. याबाबत ग्राहक न्यायालयात केस टाकली तर तुमची योजना टिकेल का ? तुम्ही आम्हाला 24 तास वीज द्यायचे कबूल केले आहे, ती देत नाही. तुम्ही 16 तास लोडशेडींग करता म्हणून 3 एच.पी. ऐवजी 5 एच.पी. मोटार वापरली जाते. तुम्ही आम्हाला चोर ठरविता. दंड सुरु करता. हे तुमच्या मनाला पटते का ? हे काय चालू आहे. शेतकऱ्याला केवळ मळणी यंत्र लावायचे असेल तर वेगळे पैसे तुम्ही घेता. आधीच शेतकरी नागवला जात आहे. आत्महत्या करत आहे. एकीकडे शेतकरी सर्व बाजूने संकटात आहे

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

आणि सरकार करीत असलेली कृती अमानवी आहे. याबाबत तुम्ही फेरविचार करावा. नाही तर मानवाधिकार आयोगाकडे आम्हाला दाद मागावी लागेल. याबाबत मी नम्रतापूर्वक सांगतो की, आम्ही शासन व अधिकाऱ्यांच्याविरुध्द मानवाधिकार आयोगाकडे जाणार आहोत. तुम्ही शेतकऱ्यांना चोर ठरविता. मी सांगतो की, शेतकरी चोर नसून स्वाभीमानी आहेत. तुमच्या नाकर्तेपणामुळे 16 तास लोडशेडींग केल्यामुळे हे होत आहे. लोडशेडींगमुळे मी माझ्या शेतातील एक हजार संत्र्याची झाडे तोडून टाकली आहेत. याबाबत विदर्भातील सर्व आमदारांना विचारा. वरुन तुम्ही आम्हाला चोर ठरवित आहात. हे तुम्हाला तरी पटते का. ही परिस्थिती तुम्ही बदलणार आहात काय ? हा माझा प्रश्न आहे.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, या राज्यामध्ये शासनाने जी कृषी स्वाभीमान योजना सुरु केलेली आहे, ती योजना 31 आक्टोबर 2007 रोजी संपुष्टात आलेली आहे. मी माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, यामध्ये आपला काहीतरी गैरसमज होत आहे. शेतकऱ्यांना चोर ठरविण्यासाठी ही योजना आणलेली नव्हती. मुळात केंद्र व राज्यसरकारने वीज चोरीचा कायदा संमत केलेला आहे. वीज चोरीच्या कायद्याच्या अंतर्गत एखादा ग्राहक त्याला मंजूर असलेल्या लोडपेक्षा जास्त वीज वापरत असेल तर त्याच्यावर कारवाई करणे, एफ.आय.आर. दाखल करणे, पोलीस कारवाई करणे आणि बाकीच्या सर्व गोष्टी ओघाने येतात. हा कायदा केंद्र व राज्यसरकारने केलेला आहे. याबाबत योजना काय होती ? आज इन्कम टॅक्स किंवा सेल्स टॅक्स डिपार्टमेंटच्या माध्यमातून अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात आपण काही स्कीम आणत असतो. शेतकऱ्यांबाबत आपणच मला सभागृहात आदेश दिलेले आहेत की, तुमचे टी. अँड डी. लॉसेस कमी करुन दाखवा. आज एवढया मोठया प्रमाणावर टी.अँड. डी. लॉसेस का जास्त होत आहेत ?. एक गोष्ट अशी लक्षात आली आहे की, ज्यावेळी एखाद्या कृषी पंपधारक शेतकऱ्याला 3 एच.पी.चे कनेक्शन मंजूर केलेले आहे व त्याने 5 किंवा 10 एच.पी. ची मोटार लावली आहे. जर त्याच्यावर रेड झाली तर 5 किंवा 10 एच.पी. ची मोटार असल्याचे उघडकीस आले तर कायद्याने कृषीपंपधारकावर कार्यवाही करावी लागली असती.

नंतर कु.धनश्री......

अधृधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील .......

म्हणून ही ॲम्नेस्ट्री स्कीम आणली आहे. जे लोक मंजूर लोडपेक्षा जास्त लोड वापरत असतील त्यांनी या योजनेनुसार तसे जाहीर करावे. असे जाहीर केल्यानंतर ही वीज किती वर्षापासून वापरत आहे, पाच वर्षापासून वापरत आहे की, दहा वर्षापासून वापरत आहे, हे विचारले जाणार नाही. एक वर्षापासून वीज वापरत आहे असे समजून दंड करण्याच्या संदर्भात किंवा वसुली करण्याच्या संदर्भात विचार करणयत येईल. शेवटी प्रश्न असा आहे की, दंड आपण लावला नाही तर काय होईल ? आपण दंड लावला नाही तर जो शेतकरी 4 वर्षापासून लाईनमध्ये कनेक्शनसाठी उभा आहे त्याला लवकर कनेक्श्न मिळणार नाही. लोड शेडींगचा विषय हा वेगळा विषय आहे. या राज्यामध्ये ही योजना लागू केल्यानंतर फारमोठया प्रमाणात या योजनेला प्रतिसाद मिळाला. जवळपास 2 लाख अश्वशक्ती इतके डिस्क्लोजर्स करुन शेतक-यांनी जवळपास 35 कोटी 73 लाख रुपये जमा केलेले आहे. या राज्यामध्ये टी.ॲंड डी. लॉसेस कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्याच योजनेचा भाग म्हणून शेतकऱ्यावर कारवाई करुन त्याच्याकडून दंड वसूल करण्याच्या ऐवजी स्वेच्छेने तसे जाहीर करणे व यामधून लोड रेग्युलराईज करणे अशी ही योजना होती. या योजनेस विभागवार प्रतिसाद कसा मिळाला हे देखील मी आपणास सांगू इच्छितो. काही भागामध्ये या योजनेची योग्य भूमिका जनतेपर्यंत पोहचविली गेली नाही त्यामुळे अकोला जिल्हा किंवा इतर परिसरामध्ये जनतेकडून वेगळी भूमिका घेतली गेली. परंतु आता ही योजना संपुष्टात आलेली आहे. या नंतर अनधिकृत लोड असेल तर त्याप्रमाणे जी कारवाई करण्यात येणार असेल, त्या कारवाईला त्यांना सामोरे जावे लागेल.

श्री नितीन गडकरी : सभापती महोदय, 3 हॉर्सपॉवर वर 24 तास वीज वापरली तर 5 हॉर्सपॉवर किती तास वीज शेतकऱ्याने वापरली पाहिजे. हजार संत्र्याच्या झाडांना पाणी देण्यासाठी 8 दिवस लागतात. दिवसाला केवळ 4 किंवा 6 तास वीज ग्रामीण भागामध्ये असते. मग शेतकऱ्याने यावर कोणता इलाज करावयाचा ? माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख आपणही शेतकरी आहात. आपण यासंदर्भात सांगावे. आपल्या जिल्हयामध्ये किती तास लोडशेडींग सुरु आहे ? मला माहीत आहे आपल्या येथे 16 तास लोडशेडींग आहे. तुम्ही आणि आम्ही एकाच तालुक्यामध्ये बाजुबाजूला आहोत. लोडपेक्षा शेतकरी किती वीज वापरत आहे, ते आपण बघा. यासाठी कायद्यात दुरुस्ती

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री नितीन गडकरी.......

करा. मला माहीत आहे आपणाला लोकांनी जबरदस्ती केली. फोटो छापले. हातकडया घातल्या, दबाव टाकला, कारवाया केल्या, लाईन तोडायचा प्रयत्न केला. सध्या शेतकऱ्याची परिस्थिती अशी आहे की, कोणीही त्याचा हात धरावा आणि त्याला ठोकावे. भूविकास बँक, सहकारी बँक शेतकऱ्यांना ठोकतात, आपणही त्याला ठोकले. त्यामुळे शेतकऱ्याने पैसे भरले. परंतु लोड ऐवजी वीजबिल वापर हे सूत्र करावे. राज्यामध्ये लोडशेडींग ज्यावेळी नव्हते त्यावेळी अशी परिस्थिती नव्हती. त्यावेळी 24 तास वीज मिळावयाची. जनतेला नियमित वीज देणं हे काम शासनाचे आहे. लोडच्या ऐवजी वीज वापर हे सूत्र ठरवून का करण्यात येत नाही ? ही गोष्ट अन्यायकारक आहे. आपण कायद्याचा आधार घेता. आपण कल्याणकारी राज्याचे मंत्री असताना खालच्या स्तरावर एखादी सुधारणा मांडली गेली असेल तर ती तशीच मंजूर करणे बरोबर नाही. आपण यावर योग्य निर्णय घेतला पाहिजे. शेतकऱ्यांचे असहय हाल होत आहेत. लोड शेडींग हे देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढण्याचे एक कारण आहे. लोड ऐवजी वीज वापर हे सूत्र ठरवावे.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय,मी आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणून देऊ इच्छितो .एखाद्या शेतकऱ्याची 3 हॉर्सपॉवरची मोटार आहे व त्याला 5 हॉर्सपॉवरचा लोड करुन हवा असेल तर त्याला नॉर्मल कोर्समध्ये अर्ज करुन 4 ते 6 महिन्याचा कालावधी लागेल. एकदा त्याने अनधिकृतपणे वीजेचा वापर सुरु केल्यानंतर ही योजना वीज रेग्युलराइज करुन देण्यासाठी होती. आपण जे सांगत आहे ते बरोबर आहे, किती वीज वापरली जात आहे हे सूत्र ठरवले पाहिजे. मी आपणास सांगू इच्छितो की, आजचे विजेचे जे दर ठरविण्यात आलेले आहेत ते 24 तासाच्या वीज वापरावर ठरविण्यात आलेले नाही.

यानंतर श्री. सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ कु. गायकवाड नंतर --- 13:50

श्री. वळसे-पाटील ....

वर्षामध्ये तो शेतकरी केवळ 13 तासच वीज वापरतो आहे एवढे गृहीत धरून हे दर ठरविले आहेत. यामध्ये आपण शेतकऱ्याकडून देखील अतिशय कमी म्हणजे एक तृतियांश इतकीच रक्क्म घेत आहोत. तेव्हा मी येथे नम्रतापूर्वक आपल्याला सांगू इच्छितो की, यामध्ये शेतकऱ्याला चोर ठरविणे वगैरेची कोणतीही भूमिका नाही. आज या राज्यात जो वीजेचा अनधिकृत वापर आहे तो अधिकृत करून तो वापर बिलिंगमध्ये आणून मंडळाचे उत्पन्न वाढविण्यासाठी जो जाणीवपूर्वक प्रयत्न आपण केला आहे त्यात आपल्याला निश्चितपणे यश मिळाले आहे. मी आपल्याला सांगेन की, या योजनेंतर्गत जवळपास 1 लाख 26 हजार 30 शेतकऱ्यांनी अधिकृत वापरासाठी अर्ज केला आहे आणि त्यातून जवळपास 2 लाखाचे वर अश्वशक्ती वीज वापर आपण अधिकृत केलेला आहे. मी आपल्याला हेही सांगू इच्छितो की, ही योजना काही दीर्घकालीन योजना नव्हती व नाही. त्यामुळे आज तारखेला ही योजना अस्तित्त्वात नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना जी भावना येथे सन्माननीय सदस्यांनी सांगितली आहे ती त्यांनी समजून घेणे आवश्यक आहे. विदर्भात आज जी काही स्थिती आहे ती आपण खरोखरी समजून घ्यावी. एका बाजूला आपल्या भागामध्ये कालव्याने पाणी आपल्या शेतात येते पण येथे म्हणजे विदर्भामध्ये तसे प्रमाण हे केवळ 10 ते 13 टक्के पर्यंतच आहे. येथील लोक बहुश: विहीर काढून सिंचन करीत आहेत. त्यामुळे येथे पंप अत्यावश्यक ठरतो. आता पंपाचीच गोष्ट घेतली तर आपल्या एका जिल्ह्यात जेवढे पंप असतील तेवढे विदर्भातील सहाही जिल्ह्यात नाहीत. मी या ठिकाणी या जिल्ह्यांची नावे सांगू इच्छित नाही. पण अशी परिस्थिती असताना त्याला वीज पुरवठा बरोबर होत नाही. मग तुमची ही सारी योजना असूनही तिचा उपयोग होऊ शकत नाही आणि मग शेतकऱ्याला आत्महत्येकडे वळावे लागते. तेव्हा आत्महत्या अधिक संख्येने असलेल्या या भागामध्ये, विदर्भामध्ये आपण असे जाहीर करा की, कृषी पंपाचा वीज पुरवठा हा सकाळी 6 वाजल्यापासून सायंकाळी 7 वाजेपर्यात बंद केला जाणार नाही. आज या भागामध्ये शेतकरी शेतीकामासाठी मजूर बोलावतो पण त्याला वीज नसल्याने दिवस दिवस काम देऊ शकत नाही. आलेली वीज केव्हा जाईल याचाही नेम नाही. म्हणून आपण असे काही पहिल्यांदा जाहीर करा. येथील शेतकऱ्यांनी कर्ज काढून विहिरी काढल्या आहेत आणि त्याद्वारे त्यांचे सिंचन चालते. म्हणून विदर्भापुरता तरी आपण ठामपणे हे जाहीर करावे. किमान विदर्भासाठी

..... आयआय 2 ..

प्रा. बी.टी.देशमुख ....

तरी आपण अशी वेगळी योजना सांगावी. आपल्या वीज नियमनामुळे खरोखरी विदर्भातील शेतकरी भयकंर त्रस्त झालेला आहे. आता आपण येथे जे काही सांगितले की, वीजेचा अनधिकृत वापर जो होतो आहे तो अधिकृत करण्यासाठी म्हणून आम्ही असे असे करतो आहोत तर ते कोणीही अमान्य करणार नाही. पण मग याबाबतीत या भागामध्ये दंडनीय कारवाई अशा प्रकरणात होणार नाही असे तरी करावे. या दोन्ही गोष्टी आपण ठामपणे करणार का ? एक म्हणजे आपण आपल्या अधिकाऱ्यांना आदेश द्या की, अमुक एका वेळेमध्ये कृषी पंपाचा वीजपुरवठा हा बंद करता कामा नये आणि दुसरे म्हणजे ज्या योजनेचे स्वरूप आपण येथे सांगितले त्यात काही बदल करू इच्छिता काय ? असल्यास, तो कराल काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, विदर्भातील ही परिस्थिती लक्षात घेऊन या परिस्थितीसंबंधात लोडशेडींगमध्ये जो काही प्रोटोकोल राबविला जातो आहे त्यात विदर्भापुरता बदल करावा अशी जी भावना समाननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, याबाबतीत हायकोर्टामध्ये काही याचिका दाखल झालेल्या आहेत. परंतु याबाबतीत जरूर आपण पुढील आठवड्यामध्ये एक बैठक घेऊन या सर्व बाबींचा विचार करू. मात्र भारनियमनामध्ये कोठल्याही बाबतीत, कोठल्याही भागासाठी म्हणून बदल करणे शक्य होणार नाही. कारण हा जो प्रोटोकोल आहे तो एमइआरसीने ठरवून दिलेला आहे आणि हायकोर्टाच्या आदेशानुसार तो ठरवून दिलेला आहे. म्हणूनच मी आपल्याला सांगतो की, सदस्यांच्या या विषयीच्या भावना लक्षात घेऊन पुढील आठवड्यामध्ये आपण एक बैठक घेऊ आणि यामध्ये काही सुधारणा करता येते काय हे पाहू. आज सगळ्याच ठिकाणी 12-12 तास वीज जाणे आणि त्या भागातील गरजेनुसार त्याबाबत काय करता येईल हे आपण तपासून पाहू. ..

( यानंतर श्री. सरफरे ..... जेजे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

व त्यासंबंधी निर्णय घेऊ. माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख म्हणाल्याप्रमाणे यामध्ये दंड करण्याची जी भावना आहे त्यासंबंधी मी मघाशी उत्तर दिले आहे. एक शेतकरी जर 5 वर्षे प्रतिक्षा सूचीवर असेल तर त्यांना विजेचे कनेक्शन न देता ज्यांनी अनधिकृतपणे कनेक्शन घेतले आहे त्यांना कोणताही दंड न लावता त्यांचे कनेक्शन रेगुलराईज करणे हे नियमाप्रमाणे बरोबर होणार नाही. त्यामुळे लोकांमध्ये अशाप्रकारचा समज निर्माण होईल की, कोणत्याही प्रकारे वीज कनेक्शन मिळविण्यासाठी अर्ज न करता अनधिकृतपणे वीज कनेक्शन घ्यावयाचे आणि नंतर ते रेगुलराईज करुन घ्यावयाचे. त्यामुळे या बाबतीत माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली भावना प्रत्यक्षात आणणे शक्य होणार नाही. त्याचबरोबर विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या आणि शेतीच्या प्रश्नासंदर्भात पुढील आठवडयात माननीय सदस्यांबरोबर चर्चा करण्यास मी तयार आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांबरोबर चर्चा नंतर होईल. परंतु सकाळी 6 पासून संध्याकाळी 7 पर्यंत वीज जात आहे. ही परिस्थिती जर पुणे जिल्हयामध्ये असती तर आपण जाहीर करुन टाकले असते. शेतामध्ये 10 ते 15 मजूर वहितीसाठी आणून बसविल्यानंतर सुध्दा त्या शेतकऱ्याला दिवसभर वीज दिली जात नाही. याकरिता आपल्याला ज्या कुणाची मान्यता घ्यावयाची असेल ती नंतर घ्या. परंतु याबाबत आपल्याला घोषणा जाहीर करण्यास अडचण काय आहे.? आपल्या मानसिक स्थितीतून सांगावे की, विदर्भामध्ये सकाळी 6 पासून संध्याकाळी 7 पर्यंत लोड शेडींग चालू रहाणार नाही. येथील शेतकरी रात्री शेती करणारे नाहीत. तेव्हा आपण अशाप्रकारे शेडयुल्ड तयार करुन विदर्भातील शेतकऱ्यांचा अवमान करु नका. आपण जर तशी घोषणा करणार नसाल तर अडचणी सांगू नका. उच्च न्यायालयाने असे म्हटलेले नाही की, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झालेल्या जिल्हयामध्ये रेगुलेटरी ॲथॉरिटीला विचारा. ज्याठिकाणी सरकारला "नाही" म्हणावयाचे असेल त्याठिकाणी आपण रेगुलेटरी ॲथॉरिटीला सांगितले आहे असे म्हणावयाचे. आणि ज्या ठिकाणी करावयाचे असेल त्याठिकाणी आपण रेगुलेटरी ॲथॉरिटीला आदेश देऊ शकता. मला एकच सांगावयाचे आहे की, आपण विदर्भातील कृषी पंपांचा वीज पुरवठा सकाळी 6 ते संध्याकाळी 7 या कालखंडामध्ये बंद रहाणार नाही असे आपण ठामपणे सांगणार काय?

श्री. दिलीप वळसे पाटील : या विषयाच्या संदर्भात आयसोलेटेड निर्णय घेता येणार नाही. राज्यामध्ये विजेची टंचाई असल्यामुळे आपल्याला भारनियम करावे लागत आहे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, विदर्भामध्ये शेतकरी रात्रीच्या वेळी शेती करावयास जात नाही, त्यांच्याकडे मोठमोठे लाईटस नाहीत...

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये उपलब्ध वीज किती आहे? हे आपल्याला तपासून बघावे लागेल. हा वेळ मारुन नेण्याचा प्रश्न नाही. उपलब्ध असलेल्या विजेचे समान वाटप करुन सर्वांना विजेचा पुरवठा करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. आजपासून एक वर्षानंतर आपल्याला वेगळी परिस्थिती दिसेल. एक वर्षानंतर म्हणजे डिसेंबर 2008 पर्यंत फिडर, सेपरेशन, सिंगल फेजिंगचा कार्यक्रम करुन राज्यातील शेतकऱ्यांना सतत 8 ते 10 तास वीज देऊ शकू अशी परिस्थिती राहील. सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारले म्हणून मी सांगतो की, एका बाजूला राज्यात वीज पुरवठा कमी आहे म्हणून आपल्याला भारनियमन करावे लागत आहे.आणि दुसऱ्या बाजूला माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विचारल्याप्रमाणे नॅशनल ग्रीडची फ्रिक्वंसी कमी झाल्यामुळे दिवसातून 20 ते 25 वेळा ट्रिपिंग करावे लागते. तरीसुध्दा जर आपण शेतकऱ्यांना वीज देत गेलो तर त्यामधून अनेक प्रश्न निर्माण होणार आहेत. उद्या जर विदर्भासाठी 12 तास वीज देण्याबाबत निर्णय जाहीर केला तर त्याचे परिणाम राज्याच्या इतर भागावर होणार आहेत. त्यामधून ही सिस्टीम सस्टेन्स होईल की नाही याचाही विचार करावा लागेल. म्हणून या संदर्भात सर्व बाबींचा अभ्यास केल्याशिवाय कोणत्याही प्रकारे मान्यता देता येणार नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, नाशिक जिल्हयामध्ये जेवढे पंप आहेत तेवढे नागपूर विभागाच्या सहा जिल्हयात नाहीत. अहमदनगर या एका जिल्हयात जेवढे पंप आहेत तेवढे अमरावती विभागाच्या 5 जिल्हयांमध्ये नाहीत. एवढे लक्षात घेऊन तरी आपण घोषणा करावी.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनांचा आदर करुन सांगू इच्छितो की, ही बाब तपासून निर्णय घ्यावा लागेल. याबाबत ऑफ-अँड घोषणा करता येणार नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, ऑफ-अँड घोषणा करता येणार नाही असे मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तराचा निषेध करुन मी सभात्याग करीत आहे.

( माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख सभात्याग करतात.)

----

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : नागपूर व इतर जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय व इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे सिकलसेल रुग्णांसाठी स्वतंत्र वॉर्ड सुरु करणे

**मु. शी**. : नागपूर व इतर जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय व इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे सिकलसेल रुग्णांसाठी स्वतंत्र वॉर्ड सुरु करणे यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, गोविंदराव आदिक, रमेश निकोसे, धनाजी साठे, राजन तेली, सय्यद जामा, प्रतापसिंह मोहिते-पाटील, रणजितसिंह मोहिते-पाटील, गिरीश गांधी, जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजीया खान ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नितीन गडकरी ( नागपूर पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर व इतर जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे व इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे सिकलसेल रुग्णांसाठी 50 खाटांचे स्वतंत्र वार्ड सुरु करण्यात येईल अशी घोषणा डिसेंबर 2000 मधील नागपूर येथील अधिवेशनात सभागृहामध्ये तत्कालीन आरोग्य मंत्री यांनी केली असणे, सिकलसेल आरोग्य समस्या राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये असून याची झळ गोरगरिबांना सर्वात जास्त पडत असणे, सिकलसेल ही बिमारी हिमोग्लोबीनशी संबंधित असून ती जेनेटीक असून रुग्णांना योग्य उपचार मिळणे आवश्यक असणे, रुग्णांना सामान्य आरोग्य लाभ प्राप्तीसाठी दरवर्षी मोठा खर्च येत असून गोरगरीब जनता एवढा पैसा यासाठी खर्च करुच शकत नसणे, तसेच सिकलसेल मृतकांची संख्या लक्षात घेता नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय व इंदिरा गांधी शासकीय महाविद्यालय व रुग्णालय

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ SBT

श्री. नितीन गडकरी .....

येथे सिकलसेल रुग्णांसाठी 50 खाटांचे स्वतंत्र वार्ड सुरु करण्याची अत्यंत आवश्यकता असणे, या कामाकरीता शासनाने सन 2006-07 मध्ये 96 लक्ष रुपये इतका निधी मंजूर करुनही अद्यापपावेतो सदर सिकलसेलच्या स्वतंत्र वार्ड संदर्भात कोणतीही कार्यवाही झाली नसणे, त्यामुळे सिकलसेलच्या रुग्णांना उपचाराअभावी परत जावे लागणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. दिलीप वळसे-पाटी ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अनुसूचित जाती आणि आदिवासी भागामध्ये सिकलसेलचे प्रमाण जास्त आढळून येते. सिकलसेलच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे. डिसेंबर, 2000 च्या नागपूर अधिवेशनामध्ये सिकलसेलकरिता इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये 50 खाटांचा विशेष वॉर्ड सुरु करण्यात येईल आणि याबाबत प्रभावी उपाययोजना करण्यात येईल असे आश्वासन माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात दिलेले होते. ते आश्वासन शासनाने का पूर्ण केले नाही ? शासनाने अजूनही हा विषय गांभीर्याने घेतलेला नाही. गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यामध्ये दलित समाजामध्ये तसेच आदिवासी समाजामध्ये या रोगाचे प्रमाण जास्त आहे. त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तरीही या ठिकाणी दिलेल्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, आमच्या उपाययोजनेमुळे त्यावर नियंत्रण आणलेले आहे. ही गोष्ट खरी नाही. शासनाने जर रेकॉर्ड तपासले तर ही संख्या वाढत आहे असे दिसेल. हा विषय गांभीर्याने घेऊन, याबाबत विशेष विचार करुन, वेगळे धोरण आखून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. या रोगामुळे मृत्यू पावणाऱ्याची संख्या जास्त आहे. हे सर्व आदिवासी विभागातील, दलित विभागातील रुग्ण आहेत. माझी शासनाला विनंती आहे की, जर आपल्या विभागाकडे पैसे नसतील तर समाजकल्याण विभागाकडून, आदिवासी विकास विभागाकडून पाच पाच कोटी रुपये असे 10 कोटी रुपये घेऊन दलित आणि आदिवासी समाजामध्ये आढळून येणाऱ्या या रोगावर उपाययोजना केली पाहिजे. अजूनही शासनाने हा विषय गांभीर्याने घेतलेला नाही. नुसती मलमपट्टी सुरु आहे. त्यामुळे हा प्रश्न सुटणार नाही. याबाबत शासनाचे काय धोरण आहे ? शासन याबाबतीत काय करणार आहे ? हा वॉर्ड केव्हा सुरु करणार ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सिकलसेलचा विषय हा या राज्याच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले त्याप्रमाणे या राज्यामध्ये या विषयाच्या संदर्भात ज्या गांभीर्याने विचार करावयास पाहिजे होता तो विचार अजूनपर्यंत झालेला नाही, ही बाब खरी आहे. मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, हा आजार मुळातच अनुवांशिक आहे. महाराष्ट्रातील 19 जिल्ह्यामध्ये हा आजार आहे. 19 जिल्ह्यामध्ये असलेल्या या आजाराचे समूळ उच्चाटन करावयाचे असेल तर केवळ या आजारावर

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ SBT

श्री. दिलीप वळसे-पाटील ......

ट्रिटमेंट करुन या आजाराचे समूळ उच्चाटन होणार नाही. त्याच्या मुळात जावे लागणार आहे. महाराष्ट्राच्या 19 जिल्ह्यांमध्ये असलेल्या या आजाराच्या बाबतीत एखाद्या हॉस्पिटलमध्ये 50 खाटांचा वॉर्ड तयार केला म्हणजे रिलिफ देता येईल अशी परिस्थिती नाही. हा अनुवांशिक आजार आहे. त्यांचा जन्म, विवाह आणि त्यांचे संपूर्ण जीवनपध्दत याचा संपूर्ण विचार करावा लागणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांना सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात आम्ही विचार करण्यास सुरुवात केल्यानंतर माझ्याकडे यासंदर्भात एक पूर्ण प्रपोजल तयार आहे. खरे तर हा विषय सार्वजनिक आरोग्य विभागाने हाताळावयास पाहिजे परंतु फक्त मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये रुग्ण येतात आणि त्यांच्यावर आम्ही ट्रिटमेंट करतो म्हणून मी या ठिकाणी उत्तर देत असलो तरी हा सार्वजनिक आरोग्य विभागाचा विषय आहे. हा क्युरेबल आजार नाही. क्युरेबल नसलेला हा आजार होऊ नये म्हणून काय काय उपाययोजना करावयास पाहिजे यासाठी आदिवासी विकास विभाग, समाजकल्याण विभाग, ओबीसींसाठी असलेला विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी ते पहावयास पाहिजे. वैद्यकीय शिक्षण विभागाचा संबंध म्हणजे आमच्याकडे असलेले सुपर स्पेशालिस्ट किंवा तज्ज्ञ डॉक्टर्सचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. परंतु तालुका पातळीवर किंवा रिमोट पातळीवर आमची यंत्रणा नाही. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय अशा स्थानिक यंत्रणेने ते पहावयास पाहिजे. यासंदर्भात आम्ही एक प्रोजेक्ट तयार केलेला आहे. या आजाराचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक काही प्रयत्न करणे गरजेचे होते. बाकीच्या जगात सुध्दा यासंदर्भामध्ये जे काही सामाजिक विषय आहेत त्याबाबत सांगावयाचे तर सायप्रस देशामध्ये विवाहपूर्ण चाचणी केली जाते. दुसऱ्या देशातील एड्‌सचे पेशन्ट्स सर्टिफाय करावयाचे, सिकलसेलचे पेशन्ट सर्टिफाय करावयाचे, असे सामाजिक प्रश्न निर्माण होऊ शकतात.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे पाटील...)

म्हणून इतक्या लहानशा चर्चेमधून या विषयाला न्याय देता येणार नाही. परंतु वैद्यकीय शिक्षण विभागाचा मंत्री म्हणून या संदर्भामध्ये अन्य विभागाशी बोलणी सुरु आहेत. सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विभाग तसेच एससीपी यांचे बजेट एकत्र करुन वैद्यकीय शिक्षण विभाग किंवा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम राज्याच्या 19 जिल्हयामध्ये राबविण्याचे ठरविलेले आहे. यामधून या रोगाचे निर्दालन करण्याचे काम करता येईल. या रोगाचे पीडित रुग्ण, रोगाचे वाहक असलेले रुग्ण यांचे आयडेंटिफिकेशन करावे लागेल. हा आजार बरा व्हावा किंवा तो होऊच नये यासाठी कॉम्प्रेहेन्सिव्ह प्लॅन तयार करावा लागेल. त्याबाबतीत ठराविक वेळेत निश्चितपणे कारवाई करु. मला वाटते मार्चच्या अधिवेशनामध्ये या संदर्भात निश्चित कोणती पावले उचललेली आहेत ते मी सांगू शकेन.

श्री. नितीन गडकरी : हा प्रश्न मी सदनामध्ये अनेक वेळा उपस्थित केलेला आहे. मी आपली क्षमा मागून सांगतो की सार्वजनिक आरोग्य खात्याचे मंत्री डॉ. विमल मुंदडा यांनी देखील हा आजर गंभीर असल्याचे सांगितले. या आजारासंबंधी ताबडतोबीने काळजी घेतली पाहिजे. कारण हा गुंतागुंतीचा असा आजार आहे. माझी माहिती अशी आहे की, मेयो हॉस्पिटलमये 70 हजार रुग्णांची तपासणी झालेली आहे. उत्तर नागपूर हा राखीव मतदारसंघ आहे. एनजीओनी त्या ठिकाणी काम केलेले आहे. तेथील दलित बौध्दांना या रोगाची मोठ्या प्रमाणावर लागण झालेली आहे. भंडारा, चंद्रपूर, गोदिया या जिल्ह्यातील आदिवासी भागामध्ये सरसकट हा प्रश्न निर्माण झालेला आहे. माझ्या अंदाजाने या रोगाची लागण झालेल्या रुग्णांची संख्या लाखाच्या घरात आहे. हा अतिशय गंभीर आजार आहे. या बाबतीत आपण एक रिपोर्ट तयार केलेले आहे ही चांगली बाब आहे. आपण सार्वजनिक आरोग्य विभागाला बाजूला ठेवा. आपल्या विभागामध्ये चांगले तज्ज्ञ लोक आहेत. सार्वजनिक आरोग्य विभाग हा खरेदीमध्ये गुंतलेला असल्यामुळे त्या विभागाला बाकीच्या विषयाकडे लक्ष देण्यासाठी कमी वेळ मिळतो. म्हणून माझी मंत्री महोदय श्री.दिलीप वळसे-पाटील यांना विनंती आहे की, आपणच तिन्ही विभागांचा समन्वय करुन 15 दिवसांच्या किंवा महिनाभराच्या आत कॅबिनेट नोट तयार करा. हा अनुवंशिक रोग आहे. तशी पोलिओची लस दिली जाते तशी या रोगाची लस असेल तर तो कार्यक्रम करावा लागेल. परंतु या रोगाची लस आहे की नाही याबाबत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ ट

(श्री. नितीन गडकरी...)

दुमत आहे. परंतु समाजकल्याण विभाग, आदिवासी विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे को-ऑर्डिनेशन करुन कॅबिनेटपुढे एक प्लॅन सादर करा. या रोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी एक वेगळा उपसंचालक करा, वेगळया डॉक्टरांची नियुक्ती करा, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यामध्ये हे काम करण्याकरिता एनजीओना प्रोत्साहन द्या. सभापती महोदय, मी जबाबदारीने सांगतो की येणा-या काळामध्ये आदिवासी समाजातील मृत्यूचे प्रमाण या रोगामुळे मोठ्या प्रमाणावर वाढेल आणि विदर्भामध्ये मोठे संकट निर्माण होईल. म्हणून युध्द पातळीवर या रोगाचे उच्चाटन करण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज आहे. या बाबतीत माननीय मंत्री महोदय पुढच्या काळात ॲक्शन प्लॅन देतील काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : या रोगाची व्याप्ती चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, बुलढाणा, धुळे, नंदूरबार, नाशिक, ठाणे, अमरावती, वाशिम, अकोला इत्यादी 19 जिल्हयामध्ये आहे. या रोगाचे कॅरिअर्स साधारणपणे 10 लाखाच्या आसपास आहेत. रोगाने पीडित असलेल्यांची संख्या 2 लाखाच्या आसपास आहे. या रोगाची लक्षणे म्हणजे हिमोग्लोबीनमधील ...

...नंतर श्री. भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.3............... श्री.दिलीप वळसे-पाटील....

नॉर्मल ब्लड सेल्स राऊंड असतात, या आजाराची लागण झालेल्या व्यक्तींच्या रक्तातील ब्लड सेल्स अर्धाकृती किंवा चंद्राकार होतात. त्यामुळे शरीरामध्ये ऑक्सीजनचे प्रमाण कमी होते. ब्लड पास होताना अडचण होते. नॉर्मल ब्लड सेलचे लाईफ 120 दिवस असून लागण झालेल्या व्यक्तीच्या ब्लड सेलचे लाईफ 30 दिवसापर्यंत खाली आलेले असते. हा अनुवंशिक आणि ब्लडपासून ट्रान्सफर होणारा आजार आहे. याची व्याप्ती एखाद्या रुग्णालयापुरती मर्यादित नाही. हा सोशल इश्यू बनू पहात आहे. या संदर्भात नव्याने ॲक्शन प्लॅन करण्याची गरज नाही. ॲक्शन प्लॅन तयार आहे. त्याची फक्त अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून काय काय करायचे, या विषयाच्या संदर्भात सर्व संबंधित विभागांशी सुध्दा बोलावे लागणार आहे. म्हणून आदिवासी कल्याण, समाजकल्याण, सार्वजनिक आरोग्य आणि इतर सर्व संबंधित विभागाशी बोलू. या संदर्भात लीड घेण्याचा आणि स्पेशल मूव्हमेंट या राज्यामध्ये सुरु करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी लागणारा पैसा कमी पडू देणार नाही. त्यासाठी मार्चच्या बजेटमध्ये तरतूद करु. आता सुध्दा सी.एफ.च्या माध्यमातून पैसा उपलब्ध करुन देता आला तर तो देऊ. परंतु सर्वांना विश्वासात घेऊन पब्लिक अवेरनेस करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करु. भामरागड येथे आपण प्रयोग केला आहे. नॉर्मल पेशंट असेल, व्यक्ती असेल त्याला वेगळ्या रंगाचे कार्ड, पिडित असेल त्याला वेगळ्या रंगाचे कार्ड, वाहक असेल त्याला वेगळया रंगाचे कार्ड देऊन कोणी कोणाशी लग्न करायचे या संदर्भात सिस्टीम ठरविणे गरजेचे आहे. एक प्रयोग यामध्ये झाला आहे. अन्य देशामध्ये सुध्दा प्रयोग सुरु झालेले आहेत. 19 जिल्हयांमध्ये ज्यावेळी कार्यक्रम राबवावयाचा आहे त्यावेळी मेडिकल एज्युकेशन विभागामध्ये तालुका पातळीवर जी यंत्रणा राबवावयास पाहिजे ती यंत्रणा नाही. म्हणून इतर विभागांशी चर्चा करावी लागेल. ती चर्चा करुन हा प्लॅन या राज्यामध्ये निश्चित राबविण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, ज्यांना ज्यांना यामध्ये सहभागी व्हायचे आहे त्या सर्वांचा सहभाग घेण्यात येईल. एड्स किंवा इतर ट्रान्सफरेबल डिसीजच्या दृष्टीने सहभागी करुन आपण उपाययोजना करीत आहोत. त्याचप्रमाणे सिकलसेलचे उच्चाटन करण्याच्या दृष्टीने लवकरात लवकर प्रयत्न सुरु केले जातील आणि त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

...2

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सय्यद कमरुझ जामा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने यह मान लिया है कि इस पर ज्यादा ध्यान नहीं दिया गया है. अब सरकार ने जो योजना बनायी है उस पर कार्रवाई होगी. लेकिन मेरा कहना है कि अब यह बीमारी सिर्फ आदिवासी और एस.सी. बहुल एरिया में ही नहीं बल्कि दूसरी जगहों पर भी फैलने लगी है. चंद्रपुर जिले में जो कोल माइन्स हैं या दूसरी कोल माइन्स हैं उमरेड और सावनेर में जो माइन्स हैं वहां पर भी खदान मजदूरों में यह बीमारी फैलने लगी है. मेरा कहना है कि आपने जो प्लान बनाया है उस बारे में माननीय गडकरी साहब से परामर्श करके तथा इंदिरा गांधी मेडिकल कालेज ने और श्री रामटेके ने जो रिसर्च किया है और जो विदर्भ सिकलसेल सोसायटी बनायी है उनसे मदद ली जा सकती है. साथ ही वेस्टर्न कोल फील्ड लिमिटेड जो कि पब्लिक सेक्टर अंडरटेकिंग है उनके डाक्टर्स और एक्सपर्ट की मदद लेकर यह काम किया जा सकता है. वे भी फंड दे सकते हैं और आपका जो प्रोग्राम है वह अच्छी तरह से कार्यान्वित हो सकता है.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी सिकलसेल या रोगा बद्दल पुष्कळ माहिती दिलेली आहे. या रोगाचा प्रादुर्भाव 1991 मध्ये आढळून आल्यानंतर या रोगावर उपचार होण्यास सुरुवात झालेली आहे. सिकलसेल रोग निर्माण होऊन 13-14 वर्षे होऊन गेलेली आहेत. इतका गंभीर आजार असतांना या रोगावर प्रतिबंधात्मक उपाय काय याचे निश्चित संशोधन झालेले नाही असे माननीय मंत्रीमहोदयांच्या उत्तरातून दिसून येते. सिकलसेल रोगाला प्रतिबंधात्मक उपाय म्हणून आपण कोणते पाऊल उचलणार आहात ? सिकलसेलच्या संदर्भात अवेरनेस निर्माण केला नाही तर भविष्यामध्ये फार मोठया भागामध्ये हा रोग पसरण्याची शक्यता आहे. सिकलसेल रोग हा आता 19 जिल्यापर्यंत पोहचला असून भविष्यात या रोगावर उपचार झाले नाही तर 33 जिल्हयांमध्ये हा रोग पसरण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे सिकलसेलला आळा बसावा यासाठी आपण काय प्रयत्न करीत आहात? सिकलसेल रोग हा अनुवंशिकतेमुळे होतो याबाबत शिक्कामोर्तब झालेला आहे काय? अनुवंशिकतेच्या कोणत्या कारणामुळे सिकलसेल रोग होतो? हा रोग दूर करण्याच्या संदर्भात शासनाने आतापर्यंत कोणती उपाययोजना केलेली आहे? जसे एड्स रोगाच्या संदर्भात आपण अवेरनेस घेतो तसा अवेरनेस सिकलसेलच्या संदर्भात आणला जाणार आहे काय? सिकलसेल हा रोग वाढणार नाही याबाबत शासन कोणते पाऊल उचलणार आहे?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सिकलसेलच्या संदर्भात मी अगोदर बरीच माहिती दिलेली आहे. या प्रश्नाकडे या अगोदर ज्या पध्दतीने लक्ष द्यावयास पाहिजे होते त्या पध्दतीने सिकलसेलकडे यापूर्वी लक्ष दिले गेले नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून सिकलसेल रोगाला आळा बसण्यासाठी प्रयत्न चालूही असतील. या रोगाविरुध्द जागृती होऊन सर्वांनी या रोगाबाबत काळजी घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भात कॉंक्रिट प्लॅन तयार करुन त्यावर उपाययोजना करण्यात येईल. यासंदर्भात सभागृहाला माहिती दिली जाईल तसेच सन्माननीय सदस्यांच्या यासंदर्भात काही सूचना असल्या तर त्या सूचना निश्चित ॲक्सेप्ट करण्यात येईल. सिकलसेल हा रोग अनुवंशिकतेमुळेच होतो यावर शिक्कामोर्तब झालेला आहे.

श्री राजेंद्र जैन : माननीय सभापति जी, माननीय गडकरी साहब ने यहां पर सिकलसेल बीमारी के बारे में बताया. मेरा कहना है कि इस बीमारी का फैलाव अब भंडारा और गडचिरोली जैसे नक्सलग्रस्त क्षेत्रों में भी बड़े पैमाने पर हो रहा है. यहां पर माननीय मंत्री महोदय ने बताया कि अब इस बीमारी पर काबू पाने के लिए एक एक्शन प्लान तैयार कर रहे हैं. मुझे मंत्री महोदय से पूछना है कि क्या आप इस एक्शन प्लान में नक्सलग्रस्त इलाके में इस बीमारी से प्रभावित लोगों के लिए भी कुछ प्रावधान करने वाले है ? मैं बताना चाहूंगा कि दरेकसा एरिया में यह समस्या बहुत बड़े पैमाने पर है. वहां पर डाक्टरों की एक टीम, सेवा भावना के साथ काम कर रही है. वहां पर आमदार फंड और खासदार फंड से बांधकाम करके उस टीम को दिया गया है. मैं जानना चाहता हूं कि इस तरह की जो टीम है या सेवा भावी ऑरगेनाइजेशन हैं क्या आप अपने एक्शन प्लान के माध्यम से उनको सहयोग कर सकते हैं ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर मी अगोदरच दिलेले आहे. या सिकलसेलच्या संदर्भात ॲक्शन प्लॅन तयार झालेला नाही परंतु नक्षलग्रस्त भाग, आदिवासी तसेच दुर्गम भागात या रोगाचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. त्यामुळे सिकलसेलच्या संदर्भात मायक्रो प्लॅनिंग तयार केले जाणार असून डॉक्टर्स, स्वयंसेवी संस्थांचे यासंदर्भात सहकार्य घेण्याची गरज पडली तर तीही घेण्यात येईल. सिकलसेलच्या संदर्भात सर्व वर्गाला बरोबर घेऊन हा कार्यक्रम पार पाडण्यात येईल.

-----------------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात रक्त, मुत्र आदिंचे नमुने तपासण्यासाठी डी.एम.एल.टी व एम.डी. पॅथॉलॉजी सुरु ठेवण्याची नितांत आवश्यकता.

**मु. शी.** : राज्यात रक्त, मुत्र आदिंचे नमुने तपासण्यासाठी डी.एम.एल.टी व एम.डी. पॅथॉलॉजी सुरु ठेवण्याची नितांत आवश्यकता यासंबंधी सर्वश्री दीपक सावंत, दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, अनिल परब, श्रीमती नीलम गो-हे, सर्वश्री सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर, किशनचंद तनवाणी वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई-पुणे, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर, औरंगाबाद व राज्याच्या अन्य शहरातील रक्त, मूत्र आदिचे नमूने यापुढे तपासण्यासाठी फक्त एम.डी पॅथलॉजी यांनाच शासनाने आता प्राधिकृत केल्याने सध्या राज्यातील हीच कामे करणारे हजारो डी.एम.एल.टी धारकाची होत असलेली उपासमार, शासनाच्या सदर निर्णयामुळे एमडी पॅथॉलॉजी हे आपले नाव वापरु देण्यासाठी डी.एम.एल.टी लॅब धारकांना हजारो रुपयांची द्यावी लागत असलेली रॉयल्टी, शासनाच्या या निर्णयामुळे सध्या राज्याच्या शासकीय रुग्णालयात डी.एम.एल.टी कार्यरत असून त्याठीकाणी एम.डी.पॅथॉलॉजीस नेमणे सक्तीचे असणे, राज्यात एम.डी पॅथॉलॉजीचा होणारा परिणाम, रक्त आदि तपासण्यासाठी फक्त डी.एम.एल.टी कांही प्रमाणात उपलब्ध असून यापुढे एम.डी.पॅथोलॉजीना शासनाने अधिकृत केल्याने शासनाच्या या अव्यवहार्य निर्णयामुळे रुग्णसेवेवर होणारा अनिष्ट परिणाम लक्षात घेता पूर्वीची प्रचलित पध्दती म्हणजे डी.एम.एल.टी व एम.डी.पॅथॉलॉजी सुरु ठेवण्याची नितांत आवश्यकता, शासनाने डी.एम.एल.टी वर बंदी घातल्याने जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने आपल्या निर्णयाचा फेरविचार करण्याची नितांत आवश्यकता."

श्री. दिलीप वळसे पाटील ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

......................

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही जी लक्षवेधी सूचना दिलेली आहे त्यास निवेदनामध्ये विस्तृतपणे उत्तर दिलेले आहे. परंतु प्रश्न असा आहे की, शासनाने केलेल्या उपाययोजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचावयास पाहिजे होती, ती पोहोचलेली नाही त्यामुळे पॅथालॉजीमध्ये प्रॅक्टीस करणाऱ्यांमध्ये एकप्रकारचे भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. आज आपण कोणत्याही डॉक्टरकडे औषधोपचार करण्यासाठी गेल्यावर डॉक्टर प्रथम लघवी व रक्त तपासण्यास सांगतात व ते रिपोर्ट आल्यानंतर पुढील औषधोपचार करतात. या पार्श्वभूमीवर पॅथॉलॉजी लॅब चालविणाऱ्यानी त्यांचा व्यवसाय बंद करु नये अशाप्रकारची सूचना का देत नाही. पॅथॉलॉजी लॅब चालविणाऱ्यांमध्ये जे घबराटीचे आणि भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे ते दूर करण्यासाठी शासन कोणत्या उपाय योजना करणार आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मेडिकल एज्युकेशन व तंत्र शिक्षण विभाग या दोन विभागांच्या माध्यमातून डीएमएलटी कोर्सला मान्यता देण्यात येते. डीएमएलटीचे पदवीधारक पॅथॉलॉजी लॅब चालवितात. मी या संदर्भात सभागृहाला थोडी पार्श्वभूमी सांगतो. नागपूर येथील इंडियन मेडिकल असोसिएशनने दिनांक 30.8.2001 रोजी डी.एम.एल.टी कोर्स पूर्ण केलेल्या व्यक्तींना स्वतंत्रपणे पॅथॉलॉजी लॅबोरोटरी चालविण्यास हरकत घेतली. या संदर्भात राज्य सरकारने केंद्र सरकारला पत्र पाठविले. परंतु त्या पत्राचे उत्तर केंद्र सरकारकडून आलेले नाही. या संदर्भात जोपर्यंत केंद्र सरकार निर्णय घेत नाही तोपर्यंत पोलिसांनी डीएमएलटीधारकांवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करू नये अशाप्रकारच्या सूचना राज्य सरकारमार्फत देण्यात आलेल्या आहेत. पुन: या संदर्भात दिनांक फेब्रुवारी 2005 रोजी मुंबई उच्च न्यायालयात पाच जणांनी एक याचिका दाखल करुन लॅबोरो टरीज बंद करण्याची मागणी केली. या संदर्भात न्यायालयाने राज्य सरकारची भूमिका विचारुन एक प्रतिज्ञापत्र फाईल करण्यास सांगितले. राज्य सरकारने प्रतिज्ञापत्र फाईल करताना डीएमएलटीधारकांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक दृष्टीकोन दाखविलेला आहे. या प्रकरणा संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने अंतरिम निर्णय दिलेला आहे त्यामध्ये म्हटलेले आहे की, " लॅबोरेटरीज टेक्निशियन यांना स्वतंत्रपणे लॅबोरेटरी चालवून अहवालावर सही करता येणार नाही. तसेच त्यांना पॅथॉलॉजिस्टकडे काम करावे लागेल. अन्यथा त्यांच्या अहवालावर पॅथॉलिजिस्टची सही घ्यावी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील..........

लागेल." मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, सरकारने डीएमएलटीधारकांच्या बाजूने भूमिका घेतलेली आहे. या प्रकरणासंदर्भात अजून न्यायालयाचा अंतिम निर्णय यावयाचा आहे तोपर्यंत आपल्याला वाट पहावी लागेल.

यानंतर श्री.पुरी......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अतिशय गंभीर विषयावरील असून या क्षेत्रामध्ये काम करणा-या जास्तीत जास्त महिला हया ग्रामीण, शहरी व दुर्बल घटकातील आहेत. सगळीकडे 33 टक्क्यांचे रिझर्व्हेशन असते, परंतु या व्यवसायात 50 टक्यांपेक्षा जास्त महिला काम करीत आहेत. आज या महिला स्वाभिमानाने आपला उदरनिर्वाह करीत असताना डीएमएलटी पदवीधारकांना व्यवसाय करण्यापासून मनाई करणे, म्हणजे भारतीय संविधानाने प्रदान केलेल्या मुलभूत हक्कांचे हनन करणे असे शासनास वाटत नाही का ? याबाबतची सर्व वस्तुस्थिती शासनाने माननीय उच्च न्यायालयासमोर ठेऊन डीएमएलटी पदवीधारकांना न्याय देण्याच्या दृष्टीने या प्रकरणाची सोडवणूक तातडीने होण्याच्या दृष्टीने ॲडव्होकेट जनरल यांना सूचना देण्यात याव्यात, त्या दिल्या जातील का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या, महिलांच्या मुलभूत हक्कासंबंधी बोलल्या, परंतु राज्य सरकारने त्यांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा अडथळा आणलेला नाही. यासंदर्भातील कोर्टाची ऑर्डर माझ्याकडे आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "...if the persons holding DMLT or other equivalent qualification are running a Pathological Laboratory they should appoint a qualified Pathologists, to carry their report for want of which they cannot be permitted a practice as such" आता ही कोर्टाची ऑर्डर आलेली आहे, "So this matter is now sub-judice so, there is limited scope to discuss this matter," तरीही यासंदर्भात जी केस न्यायालयात चालू आहे ती चालविण्याच्या दृष्टीने राज्य सरकारच्या वतीने ॲडव्होकेट जनरल यांना पुढाकार घेऊन बाजू मांडण्यास सांगण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, यासंदर्भात महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या नागपूर शाखेने जे आक्षेप घेतले त्या आक्षेपांचे स्वरुप काय ? यामध्ये डीएमएलटी पदवीधारकांचा महत्वाचा रोल असतो तो परिक्षणाचा. रुग्णांचे रक्त, लघवी घेण्याचे व ते तपासण्याचे काम पॅथॉलॉजिस्टचे असते, परंतु प्रत्यक्षात ते कधीही तपासणीसाठी जात नाहीत. त्यामुळे डीएमएलटी लॅबधारकांनी सर्व परिक्षण करायचे आणि रॉयल्टी मात्र पॅथॅलॉजिस्ट घेणार, हे योग्य आहे का ? रोगाचे निदान डॉक्टरांनी करावयाचे असते, हे मान्य आहे, तो अधिकार डीएमएलटी पदवीधरांना नाही. परंतु,

डॉ. नीलम गोऱ्हे....

अनेक निदान असे असतात की जे पॅथॉलॉजिस्टकडून रुलआऊट झाल्यानंतर डॉक्टर पुढील औषधांसाठी उपाययोजना करु शकतात. माझा प्रश्न असा आहे की, नागपूर मेडिकल कौन्सिलने कोणते आक्षेप घेतले आहेत व त्यावर शासनाने कोणते उत्तर दिले आहे ? आज डीएमएलटी पदवीधारकांचा प्रश्न अतिशय जटिल होत चालला आहे. त्यामुळे मंत्रिमहोदयांनी यावर प्रकाश टाकावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, त्यांनी असा आक्षेप घेतला आहे की, डीएमएलटी पदवीधारकांना स्वतंत्रपणे प्रॅक्टिस करता येणार नाही. इंडियन मेडिकल ॲक्ट आणि महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर ॲक्टच्या तरतुदींमध्ये वैद्यकीय प्रॅक्टिस कोणी करावी, हे डिफाईन केलेले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, डीएमएलटी पदवीधारक प्रॅक्टिस करीत नाहीत ते फक्त तपासणी करतात, त्यामुळे त्याला प्रॅक्टिस म्हणता येणार नाही. त्यामुळे ॲक्टमध्ये जर 'प्रॅक्टिस' असा शब्द वापरला असेल तर त्याबाबत विचार करावा लागेल.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, प्रॅक्टिशनर म्हणजे जे एम.डी.झालेले पॅथॉलॉजिस्ट आहेत त्यांच्याबाबतीत मी बोलत आहे. कोर्टाची ऑर्डर अशी आहे की, या डीएमएलटी पदवीधारकांना स्वतंत्रपणाने व्यवसाय करायचा असेल तर त्यांनी पॅथॉलॉजिस्टकडून सर्टिफाय करुन घेतले पाहिजे किंवा पॅथॉलॉजिस्टकडे काम केले पाहिजे.

नंतर श्री.रोझेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील........

आज जरी न्यायालयाने अंतरिम स्वरुपाची भूमिका घेतली असली तरी राज्य सरकारने दरवेळी डीएमएलटी पदवीधारकांची भूमिका मान्य करुन त्यांच्या बाजूने आपले मत मांडलेले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जस्टिस सय्यद व जस्टिस पटेल यांनी इंडियन मेडिकल कॉन्सिल व महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल यांनी सादर केलेल्या ॲफेडेव्हिटच्या आधारे निर्णय दिला आहे. अशाप्रकारे डीएमएलटीच्या लोकांना प्रॅक्टिस करण्यास त्यांचा आक्षेप आहे. महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिलच्या नागपूर शाखेने याप्रकरणी न्यायालयात दावा दाखल केला व तेव्हापासून हे प्रकरण सुरु झाले आहे. जजमेंटमध्ये असे म्हटले आहे की, इंडियन मेडिकल कॉन्सिल आणि महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिलची परवानगी घ्यायची असेल तर ती परस्पर घेण्यास हरकत नाही. महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिलवर डॉ.पवार आहेत, त्यांच्याशी चर्चा करण्यास काही हरकत नाही. राज्य सरकारने केवळ भूमिका मांडून उपयोगी नाही. उद्या जर न्यायालयाने विरुध्द निर्णय दिला तर दापोलीतील एका खेडयातील डीएमएलटी लॅबधारकाला एम.डी.पॅथॉलॉजिस्टची सही घेण्यासाठी प्रत्येक वेळी शहरात जावे लागेल आणि तो काही फुकत सही देणार नाही तर त्यासाठी पैसे घेणार. म्हणून माझे म्हणणे आहे की, केवळ भूमिका मांडून उपयोग नाही. न्यायालयाने दिलेल्या इंटेरिम ऑर्डरविरुध्द स्टे घेतला पाहिजे. तसेच, महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल आणि इंडियन मेडिकल कॉन्सिल यांच्याबरोबर चर्चा केली पाहिजे, कदाचित ते मान्यही करतील. त्यांनी जर ते मान्य केले तर फायनल हेअरिंगनंतर न्यायालयाचा निर्णय आपल्या बाजुने लागू शकतो. कारण, Court interprit the rules. त्यात बदल करण्याचा प्रयत्न राज्य सरकार करणार काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी भूमिका मांडली आहे त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, इंडियन मेडिकल कॉन्सिल आणि महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल या दोघांबरोबर जरुर चर्चा करण्यात येईल. आज डीएमएलटी विद्यार्थ्यांची अशी अपेक्षा आहे की, न्यायालयाच्या अंतरिम आदेशाविरुध्द वरच्या कोर्टात शासनाने गेले पाहिजे. परंतु, मला याबाबत असे सांगावयाचे आहे की, स्टुडंटस् ॲफेक्टेड आहेत त्यामुळे राज्य सरकारने वरच्या कोर्टात जाण्याची आवश्यकता नाही. यासंदर्भामध्ये त्यांनी जी भूमिका घेतली आहे त्याच्याशी

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील.........

संयुक्तिक भूमिका आजपर्यन्त राज्यसरकारने घेतली आहे, त्यांच्या म्हणण्याला दुजोरा दिलेला आहे. आता त्यांची मागणी अशी आहे की, डॉक्टरांना ज्याप्रमाणे प्रॅक्टिस करण्याची मुभा आहे तशी त्यांनाही द्या आणि आवश्यकता वाटली तर कायद्यात दुरुस्ती करा. यासंदर्भामध्ये मी सांगू इच्छितो की, डीएमएलटीची जी संघटना आहे त्यांच्याबरोबर मी चर्चा केलेली आहे. महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिलच्या नागपूर शाखेशी मी चर्चा केलेली आहे, दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेंतले आहे. या संदर्भामध्ये आता न्यायालयामध्ये निर्णय होईल, आतापर्यन्त डीएमएलटी यांच्या बाजुनेच शासनाने स्टँड घेतला आहे त्यापासून शासन दूर जाणार नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, उत्तरामध्ये सरकारची भूमिका अशी स्पष्ट होते की, ते प्रॅक्टिशनर आहेत. पण महाराष्ट्रभर ते एक आरोग्य सेवा चालवित आहेत. It is public concern. राज्य सरकारला आरोग्य सेवा सुरळित ठेवायची असेल तर त्यांच्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. केवळ त्यांना पाठिंबा देऊन चालणार नाही. कारण ती आपली एक पॅरलल व्यवस्था आहे. शासनानेच यामध्ये इनिशिएटिव घेतला पाहिजे, असे माझे मत आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, यासंदर्भामध्ये जी काळजी घेणे आवश्यक होते ती सर्व काळजी शासनाने घेतली आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना आणि राज्य सरकारला धन्यवाद देतो. प्रश्न असा आहे की, कोकणातील रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्हयामध्ये साधारणत: 400 लॅब आहेत आणि 12 एम.डी.पॅथॉलॉजी लॅब आहेत. आज आपण ग्रामीण भागातील भौगोलिक परिस्थिती बघितली तर प्रत्येक ठिकाणी एम.डी.पॅथॉजिस्टकडे जाणे शक्य नाही. म्हणून यासंदर्भात जो अंतरिम आदेश मिळालेला आहे त्यासंदर्भात राज्य सरकारने कोर्टात जाणे आवश्यक आहे, तर राज्य सरकार कोर्टात जाईल काय ? दुसरे म्हणजे राज्य सरकारने पोलिसांना सूचना दिल्या होत्या. परंतु अजूनही पोलीस लोकांना त्रास देत आहेत. म्हणून राज्य सरकार पोलिसांना पुन्हा सूचना देईल काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, यामध्ये जी ॲफेक्टेड पार्टी आहे त्या ॲफेक्टेड पार्टीनेच कोर्टामध्ये गेले पाहिजे असे आम्ही त्यांना चर्चेमध्ये सांगितलेले आहे. सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात भावना व्यक्त केलेल्या आहेत. ही कायदेशीर बाब आम्ही तपासून घेऊ. यामध्ये काय करणे शक्य आहे, याबाबत मला आता काही माहिती नाही. पूर्वी पोलिसांना सूचना दिल्या होत्या. त्यावेळी हा विषय पेंडिंग होता. परंतु आता यासंदर्भातील अंतरिम आदेश हायकोर्टाने दिलेला आहे. पोलिसांना अशा सूचना देणे शक्य आहे किंवा नाही ही बाब कायदेशीररित्या तपासून घेतली जाईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, डी.एम.एल.टी.च्या विषयामध्ये टेक्नीकल बोर्डाने जो करिक्युलम दिलेला आहे त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की, "after passing this post graduate Diploma in Medical Laboratory the fresh diploma holders may accept the job opportunity in various Pathology Laboratory or they may start their own pathology laboratory after completion of 5 year internship" तुम्ही करिक्युलममध्ये जे म्हटलेले आहे त्याप्रमाणे ही मुले डिप्लोमा कोर्सला गेलेली आहेत. नाही तर त्यांनी हा कोर्स केलाच नसता. या अनुषंगाने जे सपोर्ट करीत आहेत त्यांच्यासाठी शासनाने कायदा केला पाहिजे नाही तर ते कोर्टाच्या निर्णयामुळे अडचणीत येतील. तुम्ही जी मूळ भुमिका मांडलेली आहे त्या भुमिकेला अनुसरुन शासनाने यासंदर्भात कायदा करावा. शासन तसा कायदा करणार आहे काय ?

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, त्याची आवश्यकता आहे किंवा नाही ही बाब शासन तपासून घेईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील सर्व गावांमध्ये पॅथॉलॉजी लॅब नाहीत आणि एम.डी. पॅथॉलॉजिस्ट हे शहरी भागात आहेत. खेडयापाडयामध्ये, आदिवासी भागामध्ये ज्या डिप्लोमाधारकांच्या लॅब आहेत त्यांच्याकडून रिपोर्ट घेऊन पुढील उपचार करता येतात. मंत्री महोदय या केसमध्ये वराती मागून घोडे झालं. म्हणजे हायकोर्टाने जो निर्णय द्यायचा होता तो दिलेला आहे आणि आता ॲडव्होकेट जनरल बोलणार आहेत. कोर्टाने दिलेला निर्णय बदलणे कठीण आहे. तुम्ही ज्यावेळी हा कोर्स तयार केला त्यावेळी महाराष्ट्र सरकारने त्याला मान्यता देत असतांना तुम्हाला अशा प्रकारे पॅथॉलॉजी लॅबकडून सर्टिफिकेट देण्याचा अधिकार त्यांना दिलेला आहे. माझी अशी विनंती आहे की, न्यायालयाने आपला निर्णय दिलेला आहे. आता यावर एकच उपाय आहे. कितीही म्हटले तरी एकदा दिलेला निर्णय वापस घेतला जाईल असे मला वाटत नाही. त्यामुळे आपल्याला सुप्रिम कोर्टात जावे लागेल. त्यापेक्षा तुम्ही जो कोर्स निर्माण केलेला आहे, त्यावेळी ज्या गोष्टी मान्य केलेल्या आहेत त्या आधारावर पुढच्या अधिवेशनामध्ये यासंदर्भात एक कायदा तयार करा आणि त्या कायद्याप्रमाणे त्यांना संरक्षण द्या. कायदा करण्याचा आपला अधिकार आहे. त्यानंतर कोणाला कोर्टात जायचे असेल तर त्यांना जाऊ द्या. त्यावेळी आपण काय होते ते बघू. परंतु या लोकांना संरक्षण मिळेल. अन्यथा तुम्ही कितीही म्हणत असला तरी हायकोर्टाचा निर्णय आहे, त्यावेळी महाराष्ट्राच्या मेडिकल कौन्सिलने ॲफिडेव्हिट केले, देशाच्या इंडियन कौन्सिलने ॲफिडेव्हिट केले. त्यावेळी नीट काळजी घेतली गेली नाही. त्यावेळी आपले सरकारी वकील तेथे होते. त्यावेळी जर ॲडव्होकेट जनरल सारखा मोठा माणूस आला असता तर ही केस नीट आर्ग्यू झाली असती तर त्याचवेळी हा प्रश्न सुटला असता. परतु जो निर्णय व्हायचा होता तो होऊन गेला. अंडयाचे ऑमलेट होते, ऑमलेटचे अंडे होत नाही. हायकोर्टाने ऑलरेडी निर्णय दिलेला आहे. हा निर्णय त्यांच्या विरोधातला आहे. ठीक आहे, तुम्ही पोलिसांना सांगितले वगैरे याचा थोडा फार फायदा होईल. पण मला असे वाटते की, याबाबतीत दोनच ऑप्शन्स आहेत. एक म्हणजे सुप्रिम कोर्टात अपिल करणे आणि दुसरे म्हणजे

..3..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

याचे कायद्यात रुपांतर करणे. तुम्ही याचे कायद्यात रुपांतर केले तर हा विषय संपेल. मला असे वाटते की, हाच यातील कायदेशीर मार्ग राहील. आता ॲडव्होकेट जनरलकडे जाऊन काय होणार आहे. जे व्हायचे ते होऊन गेलेले आहे.

यानंतर कु.जयश्री.........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MMP/ D/ प्रथम श्री.बोरले..... 14:40

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, ही बाब तपासून घ्यावी लागेल. मी आपल्याला सांगतो की, यासंदर्भात एक नवीन कायदा करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट,1961मधील कलम 2/2 याच्यामध्ये जी काही सुधारणा केलेली आहे, त्याचा आधार घेऊन आपल्याला लॅबधारक आणि टेक्निशियन्स यांना प्रोटेक्शन देता येणे शक्य आहे. पुन्हा पुन्हा मी सभागृहामध्ये हे सांगत आहे की, हे जे सगळे लॅबधारक,टेक्निशियन्स आहेत या सगळयांना प्रोटेक्शन देण्यासंदर्भात सरकार सर्वतोपरी प्रयत्न करील. तसेच, त्यांच्याकरिता जे जे काही करता येऊ शकते, ते ते सर्व काही करण्यास सरकार मागे पुढे राहणार नाही.

श्री.नितीन गडकरी : सरकारला आता त्यांच्या बाबतीमध्ये जे जे काही करता येणे शक्य आहे,ते ते करावेच लागेल. कारण आपण ही केस उच्च न्यायालयामध्ये हरलेलो आहे. उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक 10ऑक्टोबर,2007 रोजीच्या इंटेरिम ऑर्डरमध्ये असे नमूद केलेले आहे की, लॅबधारक आणि टेक्निशियन्स यांना त्यांची लॅब स्वतंत्रपणे चालविता येणे शक्य नाही, त्यांनी तयार केलेल्या वैद्यकीय अहवालावर त्यांना स्वत:ला सही करता येणार नाही तर त्या अहवालावर पॅथॉलॉजिस्टची सही घ्यावी लागेल. यावर आता एकच मार्ग आहे,तो म्हणजे याविरुध्द सुप्रिम कोर्टमध्ये अपिल करणे. उच्च न्यायायालयाचा याविषयीचा आदेश आपल्या विरोधातच गेलेला आहे. सभापती महोदय, या डॉक्टर्सचे आणि पॅथॉलॉजिस्टचे एक रॅकेटच आहे, असे मला वाटते. कारण डॉक्टर्स कधी कधी गरज नसतांनाही अमुक टेस्ट करा,तमुक टेस्ट करा असे सांगतात आणि पॅथॉलॉजिस्ट त्या टेस्टचा 200 -200 रुपये चार्ज लावतात. या परिस्थितीमध्ये गरीब माणसाने जगावयाचे की मरावयाचे ? काही लोकांचा आता हा धंदाच होऊन गेला आहे.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, याविषयी मी सुरुवातीलाच असे स्पष्ट सांगितले की, इंडियन मेडिकल कौन्सिल आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे जे कायदे आहेत,त्या कायद्यामधील तरतुदींप्रमाणे जर न्यायालयाने यासंदर्भामध्ये लॅबधारक आणि टेक्निशियन्स यांना प्रोटेक्ट करण्यासाठी प्रतिबंध केलेला असला तरी या दोन्ही बॉडींशी चर्चा करुन त्यातून काही मार्ग

....2

श्री.दिलीप वळसे पाटील.....

काढता येतो का ते आधी पाहू. जर त्यातून काही मार्ग निघत असेल तर ठीक आहे,नाहीतर सुप्रिम कोर्टात याविषयी अपिल करण्याचे एक ऑप्शन आपल्याकडे आहे. प्रचलित कायद्यामध्ये अमेंडमेंट करणे किंवा नवीन कायदा करण्याविषयी लिगली कन्सल्ट केल्याशिवाय या सभागृहामध्ये काही उत्तर देणे उचित होणार नाही.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3



JPK/ MMP/ D/ प्रथम श्री.बोरले..... 14:40

**<u>लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे</u>.**

प्रा.वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : अध्यक्ष महोदय,मी आपल्या अनुमतीने "वस्तीशाळांबाबतच्या अभ्यासगटाचा अहवाल " या विषयावरील सर्वश्री कपिल पाटील व इतर वि.प.स.यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक 25 जुलै,2007 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली माहिती कृपया छापावी.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......4



**<u>विशेष उल्लेख</u>.**

**पृ.शी.**: सिंधुदूर्ग जिल्हयातील संपूर्ण रोजगार योजनेअंतर्गत झालेल्या धान्य घोटाळयाबाबत.

**मु.शी.**:सिंधुदूर्ग जिल्हयातील संपूर्ण रोजगार योजनेअंतर्गत झालेला धान्य घोटाळा याबाबत श्री. परशुराम उपरकर,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" सिंधुदूर्ग जिल्हयातील संपूर्ण रोजगार योजनेअंतर्गत झालेल्या धान्य घोटाळयात अटक केलेले अधिकारी कर्मचारी 48 तास तुरुंगात असलेल्या अधिकारी कर्मचा-यांवर निलंबनाची कारवाई होऊन महसूल अधिका-यांचे निलंबन झालेले नाही. सभागृहातील चर्चेप्रमाणे आयुक्तांनी केलेल्या चौकशी अहवालाची माहिती घेऊन धान्य घोटाळयात अडकलेले रेशन धान्य दुकानांचे परवाने रद्द करण्याची कारवाई झालेली नसून सदर घोटाळयामुळे राज्यातील शाखा अभियंता संपूर्ण रोजगार योजनेचे देखरेख व नियंत्रण ठेवण्यास नकार दिल्याने राज्यातील केंद्राकडून आलेला निधी अखर्चित राहिल्याने अधिका-यांवरती दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याचा शासन घेत असलेल्या निर्णयामुळे भ्रष्ट अधिका-यांना पाठीशी घातल्याचा प्रयत्न होत आहे,याबाबत शासनाने त्वरित कारवाई करण्याची आवश्यकता असल्याकडे मी शासनाचे लक्ष वेधित आहे."

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा विशेष उल्लेख मी ऐकला असून तो फार गंभीर स्वरुपाचा आहे. पिठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहात निदेश दिल्यानंतरही ते अधिकाऱ्यांनी पाळले नाहीत. याबाबत नियमात तरतूद आहे की, संबंधित व्यक्ती 24 तास कोठडीत राहिला तर ताबडतोब त्याचे निलंबन केले जाते. हे तर 48 तास कोठडीत राहिले आहेत. मंत्री महोदयांनी याबाबत आताच्या आता निवेदन केले पाहिजे की, उद्यापर्यत या अधिकाऱ्यांना निलंबीत करण्यात येईल.

**उपसभापती** : याबाबत मंत्री महोदयांनी सोमवारी सांयकाळपर्यत निवेदन करावे, असे मी निदेश देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुणे शहर विद्युत भारनियमनमुक्त करण्याकरिता "पुणे मॉडेल"चा आढावा घेणे.

**मु.शी.**: पुणे शहर विद्युत भारनियमनमुक्त करण्याकरिता "पुणे मॉडेल"चा आढावा घेण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

विद्युत भारनियमनयुक्त करण्याकरिता "पुणे मॉडेल" तयार करण्यात आले आहे. पुणे मॉडेलनुसार सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील 27 कंपन्या एकत्र येऊन रोज 2 ते 16 तास त्या आपापल्या कॅप्टिव्ह पॉवर प्लँटचा वापर करुन 90 मेगावॅट अतिरिक्त वीज निर्माण करुन यातील वीज नागरिकांना सरकारी दराने देण्यात येते. हे अतिशय प्रशंसनीय अशा प्रकारचे कार्य आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये त्यांच्या प्रयोगाला सुरुवात झालेली आहे. नागपूरचा देखील त्यांनी यामध्ये समावेश केलेला आहे. असे असले तरी या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते की, पुणे शहराला अजूनही विजेची आवश्यकता निर्माण होत आहे. त्यामध्ये अधिक कंपन्यांना गरज भासत आहे. त्यामुळे पुन्हा विजेचा तुटवडा निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर वीजविरहीत दिवसाचे संकटही येऊ घातलेले आहे. म्हणून मला असे सूचवायचे आहे की, पुणे भागापुरते बोलायचे झाले तर शहरी भागात 835 मेगावॅट विजेची कमाल मागणी आहे. उर्जा मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. पुणे मॉडेलप्रमाणे इतर ठिकाणी उद्योजक काम करीत असतील तर याबाबत शासनाची जास्तीत जास्त सकारात्मक भूमिका कशी राहील याकडे मी या विशेष उल्लेखाद्वारे लक्ष वेधीत आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या बाबत मी जाहीरपणे सर्व उद्योजकांना आवाहन केलेले आहे की, या राज्यात विजेची मागणीची कमतरता साधारणत: 4000 मेगावॅटच्या आसपास आहे. पुणे मॉडेलमध्ये विजेची किंमत 11-12 रुपये प्रती युनिटनुसार घेतली जाते.

.....3

श्री.दिलीप वळसे-पाटील .....

याबाबत उपसमिती स्थापन करण्यात आलेली आहे व परवाच समितीची बैठक झालेली असून माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर चर्चा झाली आहे. या राज्याचा विजेचा तुटवडा कमी करण्यासाठी या वर्षामध्ये जेथून वीज मिळेल तेथून मिळविण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. अन्य राज्यामधून आपणास 450 ते 450 मेगावॅट वीज मिळू शकते. राज्यामधील युनिटमधून 400 ते 450 मेगावॅट वीज मिळू शकते. परंतु ही महागडी वीज घेत असताना आज पुणे मॉडेल विचारपूर्वक स्वीकारावे लागेल. पुणे मॉडेल म्हणजे काय ते सांगतो. समजा पुण्याची मागणी 500 मेगावॅटची आहे. आज आम्ही 400 मेगावॅट उपलब्ध करुन देऊ शकतो. 100 मेगावॅटचे लोडशेडींग करावे लागणार होते. पुण्यातील उद्योजक पुढे आले व त्यांनी सांगितले की, ही 100 मेगावॅट वीज आम्ही देतो. याचे पैसे सरकारने भरावेत. सरकारने सांगितले की, आम्ही भरणार नाही. पुणे शहरातील नागरिक भरणार असेल तर भरा. आज पुणे शहरातील नागरिक महाराष्ट्रातील कोणत्याही नागरिकापेक्षा 42 पैसे जास्त प्रती युनिट पैसे भरत आहेत. म्हणून त्यांच्या वाटयाची तेवढी वीज पुण्याला मिळते नाहीतर तेथे भारनियमन करावे लागले असते. तेथील भारनियमन नागरिक भरुन काढतात. त्यामुळे पुणे शहर भारनियमनमुक्त झालेले आहे हा देशातील पहिला प्रयोग आहे. मी बाकीच्या शहरांना सांगू इच्छितो की, कोणत्याही शहरामधून अशा प्रकारचा प्रस्ताव पुढे आला तर त्याबाबत राज्यसरकार जरुर सकारात्मक भूमिका घेईल. फक्त त्याचा भार कोणी सहन करावयाचा या संदर्भात चर्चा व निर्णय करावा लागेल. आवश्यकता वाटली तर एखाद्या शहरासाठी विशेषकरुन ठाणे, मुलुंड, भांडूप, नवी मुंबई व अन्य ठिकाणासाठीसुध्दा जर तेथील नागरिकांनी थोडीसी जास्त पैसे देण्याची तयारी दाखविली तर निश्चितप्रकारे त्यातून मार्ग काढता येऊ शकतो.

-------

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी वाशिम याठिकाणी सुरु करणे

**मु. शी.** : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी वाशिम याठिकाणी सुरु करण्याबाबत श्री. रामनाथ मोते वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच-ना दिलेली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र वाशिम येथे सुरु करण्याच्या संदर्भात मी आपल्यासमोर विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

सभापती महोदय, अकोला, बुलढाणा, वाशिम अमरावती व यवतमाळ या पाच जिल्हयांकरिता अमरावती पासून 150 कि.मी अंतरावर वाशिम हा जिल्हा आहे. विद्यापीठाशी संबंधित कामासाठी प्रत्येक वेळी अमरावतीला जाणे सर्वसामान्य जनतेला अडचणीचे होते. या विद्यापीठाचे उपकेंद्र वाशिम येथे स्थापन व्हावे यासाठी गेल्या 12 वर्षापासून प्रयत्न सुरु आहे. 25 नोव्हेंबर 1995 रोजी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, कलम 5 (8) नुसार याबाबत चर्चा होउन प्रस्ताव एक्झि ाक्युटीव्ह काउन्सिलकडे पाठविण्यात आला आहे. 21 ऑगस्ट 1996 रोजी कॉलेज व विद्यापीठ डेव्हलपमेंट समितीने हा ठराव मंजूर केला. वाशिम येथे विद्यापीठ उपकेंद्र सुरु करण्याबाबतचा ठराव दिनांक 22 डिसेंबर 1996 रोजीच्या विद्यापीठाच्या एक्झिक्युटीव्ह कौन्सिलमध्ये झाला आणि तो 7 मे 1997 रोजी शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला. म्हणजे हा ठराव पाठवून आता साधारण 10 वर्षे झालेली आहेत अद्यापी शासनाने यासंदर्भात कोणताही निर्णय घेतलेला नाही. म्हणून विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे की, वाशिम येथे विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्यासाठी विद्यार्थ्यांची जी मागणी आहे त्याकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.........

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे, वि.प.स. व सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यु.जमा, वि.प.स. यांनी येथे विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे. परंतु आता ते सभा ृहात उपस्थित नसल्याने सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी त्यांची विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

...............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

**पृ. शी**. : खारघर (नवी मुंबई ) येथील टाटा मेमोरियल रिसर्च सेंटरच्या 32 प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना व्यवस्थापनाने सेवेतून बडतर्फ करणे.

**मु.शी** : खारघर (नवी मुंबई ) येथील टाटा मेमोरियल रिसर्च सेंटरच्या 32 प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना व्यवस्थापनाने सेवेतून बडतर्फ करणे, याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स.

यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, यांनी ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधानसभा सदस्यांद्वारा नियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

खारघर ( नवी मुंबई ) येथील टाटा मेमोरियल रिसर्च सेंटरसाठी अनेक प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी देण्यात आल्या होत्या व तेथील 32 प्रकल्पग्रस्त सुरक्षा कर्मचारी व इतर प्रकल्पग्रस्तांना कामावर घेण्यात आले होते. 15 वर्षापासून त्यांनी सेवा केल्यानंतर त्यांना अचानक सेवेतून बडतर्फ करण्यात आले व हद्दपारीच्या नोटीसेसे पोलिसांकडून बजावण्यात आल्या. कर्मचाऱ्यांना कंत्राटी पध्दत र्हिरण्याच्या नावाखाली व्यवस्थापनाने सेवेतून बडतर्फ केले आहे. तसेच या कामगारांना पोलिसातर्फे हद्दपारीच्या नोटीसा दिल्या होत्या. त्यामुळे या कर्मचाऱ्यांचे संसार उद्ध्वस्त होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. 1993 साली सुरु झालेल्या या सेंटरमध्ये 15 वर्षापासून हे कामगार कार्यरत होते. टाटा मेमोरियल प्रशासनाने कंत्राटी पध्दतीने कामावर घेतले वेळोवेळी पाठपुरावा करुनही या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेतले नाही तरी त्यांना नोकरीत सामावून घेण्याच्या दृष्टीने शासनाने कार्यवाही करावी.

श्री. दिवाकर रावते : या कर्मचाऱ्यांना पोलिसांनी हद्दपारीच्या नोटीसेस का दिल्या ?

श्रीमती मंदा म्हात्रे :सभापती महोदय, नोटीसेस दिल्यामुळे, गावामध्ये भीतीचे वातावरण तयार झालेले आहे. या कर्मचाऱ्यांच्या जमिनीही गेल्या आहेत......

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामधील जे जबाबदार अधिकारी असतील त्यांना या संदर्भातील संपूर्ण अहवाल घेऊन  सोमवार सकाळी 11.00 वाजता नागपूर येथे बोलवावे. त्या कर्मचाऱ्याची जागा गेली, आणि त्यांची नोकरी देखील गेली. हा विषय संशोधनाचा आहे.

............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..5..

**पृ. शी.** : एप्रिल,2006 या महिन्यात रेशन दुकानामध्ये वितरित करण्यात येणारा गहू खाण्यास योग्य नसणे .

**मु. शी.** : एप्रिल,2006 या महिन्यात रेशन दुकानामध्ये वितरित करण्यात येणारा गहू खाण्यास योग्य नसणे याबाबत. श्री. मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, यां-ी ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच-ा मांडतो.

श्री. मधुकर चव्हाण : एप्रिल, 2006 या महिन्यात रेशन दुकानामध्ये वितरित करण्यात येणाऱ्या गव्हाबद्दल तक्रारी आल्यानंतर राज्य शासनाने या गव्हाची तपासणी करण्यासाठी दोन वेगवेगळया प्रयोग शाळेत नमुने दिले. दोन्ही प्रयोगशाळेने या गव्हाच्या दर्जाबाबत वेगवेगळा अहवाल दिला, त्यामुळे राज्य शासनाने गव्हाचे वितरण थांबविले व गव्हाचे नमुने तपासणीकरिता केंद्र सरकारच्या प्रयोग शाळेत पाठविले. केंद्र सरकारच्या प्रयोग शाळेने हा गहू खाण्यास योग्य असल्याचा अहवाल दिला. परंतु दरम्यानच्या काळात हा गहू पडून राहिल्याने, तो गहू माणसांनाच काय पण गुरांना देखील खाण्यास धोक्याचे झाले, त्यामुळे राज्य शासनाला सुमारे 1775 मेट्रिक टन गव्हाच्या साठयाची विल्हेवाट लावावी लागली, सदर विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे मी तो विषय सभागृहाच्या निदर्शनास आणीत आहे.

यानंतर श्री. सुंबरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : विदर्भातील तेंदूपत्ता उद्योगातील कामगारांना वार्षिक बोनस मिळण्याबाबत.

**मु.शी.** : विदर्भातील तेंदूपत्ता उद्योगातील कामगारांना वार्षिक बोनस मिळण्याबाबत श्री.संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. -

विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर आणि गोंदिया या आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागामध्ये अस्तित्वात असलेल्या तेंदूपत्ता उद्योगामध्ये सुमारे 4 लाख कामगार कार्यरत आहेत आणि या कामगारांना वार्षिक बोनस मिळावा ही गेली अनेक वर्षांपासून असलेली मागणी शासनाने मान्य केली आणि 28.2.2006 रोजी या कामगारांना बोनस देण्याबाबतचा निर्णय जाहीर केला. त्यासाठी आवश्यक असलेले सानुग्रह निधी देखील शासनाने मंजूर केलेला आहे. मात्र दोन वर्षे उलटूनही अजून देखील या कामगारांना बोनसचे वाटप झालेले नाही. परिणामी शासनाविषयी या लाखो तेंदूपत्ता कामगारांमध्ये नाराजी आहे. महोदय, या विशेष उल्लेखाद्वारा मी शासनाला विनंती करू इच्छितो की, त्यांनी याबाबत त्वरित कारवाई करून या कामगारांना न्याय द्यावा.

**

..... व्हीव्ही 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : परळी व बीड जिल्ह्यात डेंग्यू,चिकन गुनिया व माकड गुनिया रोगाने घातलेले थैमान.

**मु.शी.** : परळी व बीड जिल्ह्यात डेंग्यू,चिकन गुनिया व माकड गुनिया रोगाने घातलेले थैमान या बाबत श्रीमती उषा दराडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडते. -

" परळी व बीड जिल्ह्यात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर 2007 मध्ये डेंग्यू, तसेच चिकन गुनिया व माकड गुनिया या रोगाने घातलेले थैमान, साथ सर्वत्र पसरून लहान, तरूण, वयोवृद्ध स्त्री-पुरूष अशा दोन ते अडीच लाख लोकांना साथीने ग्रासणे, जिल्हा रूग्णालयासह प्राथमिक आरोग्य रूग्णालयातही औषधांचा तुटवडा जाणवणे, गोरगरीबांना औषधे घेण्यासाठी खाजगी मेडिकलमध्ये जावे लागणे, या गोष्टींकडे आरोग्य खात्याने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी तेथील नागरिकांत भीतीचे, चिंतेचे व संतापाचे वातावरण निर्माण झाले असून तेथील जनतेच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. तरी या दृष्टीने सरकारने उपाय योजना करणे गरजेचे आहे.

**

..... व्हीव्ही 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : स्वामी रामानंदतीर्थ रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय,अंबेजोगाई, जिल्हा बीड येथील प्राध्यापकांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या.

**मु.शी.** : स्वामी रामानंदतीर्थ रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय,अंबेजोगाई, जिल्हा बीड येथील प्राध्यापकांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या या बाबत श्रीमती उषा दराडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडते. -

" अंबाजोगाई (जिल्हा बीड) येथील स्वामी रामानंदतीर्थ रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या पदव्युत्तर विभागातील प्राध्यापकांच्या मागण्या गेल्या काही दिवसांपासून प्रलंबित असणे, मागण्या मंजूर करण्यात याव्यात अशी प्राध्यापकांकडून होत असलेली मागणी, त्यांना शासना कडून आश्वासने देण्यात येऊन आश्वासनाची पूर्तता न झाल्याने त्यांनी आपल्या पदांचे माहे नोव्हेंबर 2007 मध्ये राजीनामे दिले आहेत. त्यामुळे आज या महाविद्यालयात आणि रूग्णालयात कोणी डॉक्टर्स नाहीत, प्राध्यापक नाहीत आणि त्यामुळे रूग्णांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. अशा प्रकारे हे वैद्यकीय महाविद्यालय मरणासन्न झाले असून या मेडिकल कॉलेजचे अस्तित्व टिकवावयाचे असेल तर या कर्मचाऱ्यांच्या बदल्या ताबडतोब करून, त्यांच्या मागण्याही मान्य करणे आवश्यक आहे जेणे करून तेथील रूग्णांचेही हाल थांबतील. तरी याबाबत शासनाने तातडीने उपाय योजना करणे आवश्यक असल्याने मी विशेष उल्लेखाद्वारे ही बाब येथे मांडत आहे.

**

..... व्हीव्ही 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शेतात कीटकनाशके फवारणीसंबंधात शेतकऱ्यांना आवश्यक असे प्रशिक्षण देणे.

**मु.शी.** : शेतात कीटकनाशके फवारणीसंबंधात शेतकऱ्यांना आवश्यक असे प्रशिक्षण देणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडते. -

" जळगाव जिल्हयामध्ये कपाशीचे पीक घेताना शेतात रस शोषणाऱ्या कीडीसाठी कीटकनाशक फवारताना टू-फोर-डी यपंपाचा वापर झाल्याने कपाशीची पाने कोमेजणे, कीटकांचा नाश होण्याऐवजी पाने गळून पडणे, शेंड्यावरील पाने काळसर तांबूस झाली तर काही पानांवर ठिपके पडणे, कोणत्या पंपाचा वापर कीटकनाशक औषध फवारणीसाठी करावा याचे पुरेसे ज्ञान शेतकऱ्यांना नसल्याने, त्याबाबतचे प्रशिक्षण त्यांना दिले गेलेले नसल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे शासनाने या बाबत खबरदारी घेऊन या संदर्भात शेतकऱ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने काही योजना आखावी. सभापती महोदय, आता या ठिकाणी माननीय कृषी मंत्री उपस्थित आहेत तरी त्यांना याबाबत काही सांगितले तर बरे होईल.

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, जळगाव जिल्ह्यातील कपाशीच्या बाबतीत औषध फवारणी केल्यामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान होत असल्याचे आणि याबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असल्याचे सन्माननीय सदस्यांनी येथे सांगितले आहे. तरी या प्रकराची निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि शेतकऱ्यांचे जे काही नुकसान झाले आहे ते नेमके कशामुळे झाले आहे हे पाहून, शेतकऱ्यांना औषध फवारणीसाठी काय काय काळजी घेतली पाहिजे हे सांगितले जाईल. तसेच या संबंधात कंपनीचा काही दोष असेल तर त्याबाबत त्यांचेवर देखील कारवाई केली जाईल.

***

..... व्हीव्ही 5 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शासनाच्या उदासीनतेमुळे कोर्टबाजीमध्ये अडकलेला मौजे आळंदी,जिल्हा पुणे येथील संत ज्ञानेश्वर यांची जन्मभूमी असणाऱ्या सिद्धबेट येथील संपूर्ण जमिनीचा थंडावलेला विकास.

**मु.शी.** : शासनाच्या उदासीनतेमुळे कोर्टबाजीमध्ये अडकलेला मौजे आळंदी,जिल्हा पुणे येथील संत ज्ञानेश्वर यांची जन्मभूमी असणाऱ्या सिद्धबेट येथील संपूर्ण जमिनीचा थंडावलेला विकास याबाबत श्री.गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. गोपीकिशन बाजोरिया (अकोला,वाशिम तथा बुलढाण स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडतो. -

" मौजे आळंदी, जिल्हा पुणे येथील संत ज्ञानेश्वर महाराज व त्यांच्या भावंडांची जन्मभूमी तथा वास्तव्यभूमी असणारी सिद्धबेटची संपूर्ण जमीन महाराष्ट्र शासनाने करारनाम्याच्या शर्तभंगापोटी तेथील तपोवन संस्थेकडून दिनांक 19.7.2005 रोजी ताब्यात घेण्यात आली. त्यानुसार पंचनामे, ताबेपावती, 7-12 उतारे आदी महसूल अभिलेख शासनाच्या नावे नोंद झाली. असे असताना तपोवन संस्थेने व त्यांच्या विश्वस्तांनी मुंबई उच्च न्यायालयात शासनाच्या आदेशाला दिलेले आव्हान, केसची बाजू मांडतांना सदर संस्थेच्या विश्वस्तांनी व त्यांच्या वकिलांना कोर्टाला खोटी माहिती देऊन केसला मिळविलेला स्टेटस्को, जैसे थे आदेश, शासनाच्या वकिलांनी योग्य प्रकारे बाजू मांडली नसल्याने स्टेटस्को ऑर्डर मिळएल्याने सदर धार्मिक व पर्यटन क्षेत्राच्या विकासाला बसलेली खीळ, सदर आळंदी क्षेत्री शासन विकास व पर्यटन करणार असून कोर्टबाजी मुळे तेथील विकास पूर्तता थंडावणे, तसेच तेथे संत ज्ञानेश्वरांचे स्मारक बांधण्याचा घेतलेला निर्णय, कोर्टाचा जैसे थे आदेश उठविण्याबाबत शासनाने दाखविलेली अक्षम्य उदासीनता., परिणामी तमाम वारकरी संप्रदायात पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे यासाठी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधतो."

( यानंतर श्री.बरवड ...WW 1 ..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया यांनी जो विशेष उल्लेख केलेला आहे त्यासंदर्भात आपण शासनाला निदेश द्यावेत. 26 तारखेला कोर्टामध्ये सुनावणी आहे. त्या ठिकाणी शासनाची बाजू बरोबर मांडली जात नाही.

**उपसभापती** : शासनाने या प्रकरणाची योग्य ती दखल घेऊन न्यायालयात आपली बाजू व्यवस्थित मांडण्याच्या संदर्भात वकिलांना अवगत करावे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, होय.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ D/

**पृ. शी.** : शासकीय मागासवर्गीय वसतिगृहातील मुलामुलींच्या आहारात व इतर बाबींच्या संदर्भात बदल करण्याची आवश्यकता

**मु. शी.** :शासकीय मागासवर्गीय वसतिगृहातील मुलामुलींच्या आहारात व इतर बाबींच्या संदर्भात बदल करण्याची आवश्यकता याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यां-ी ए□ विशेष उल्ले□ाची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडते.

"महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या शासकीय मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहाबाबत 1984 साली जी.आर.मध्ये ज्या आर्थिक तरतुदी करण्यात आल्या होत्या त्यानंतर गेल्या 23 वर्षात महागाईनुसार काहीही बदल केलेले दिसून आले नाहीत. महागाईचा विचार करुन प्रत्येक विभागवार आर्थिक तरतुदी बदलण्यात याव्यात. मुला-मुलींच्या आहारात केलेला भेदभाव, 1984 सालच्या जी.आर. प्रमाणे परिशिष्ट "ड" मधील कलम 2 व 6 प्रमाणे आहारामध्ये केलेली मुलांसाठी 400 ग्रॅम व मुलींसाठी 300 ग्रॅम ही विषमता बंद करुन सर्वांसाठी समान, पोटभर व सकस अन्नाची व्यवस्था करण्यात यावी. मुलींच्या वसतिगृहातील पुरुष सफाई कामगाराची बदली करुन तेथे महिला सफाई कामगार नेमावी, अधिकारी कर्मचारी यांच्याकडून मुली/मुलांचा होणारा शारीरिक, मानसिक व लैंगिक छळ बंद करण्यात यावा व तसे झ ाल्यास तातडीने संबंधितास निलंबित करण्यात यावे. शालेय पाठ्यपुस्तके, स्टेशनरी, गणवेश शाळा कॉलेज सुरु होताच वाटप करण्यात यावे. प्रत्येक ठिकाणी पर्यायी विजेसाठी जनरेटरचा वापर करण्यात यावा, यासाठी दुरुस्ती व रॉकेलसाठी आर्थिक तरतूद करण्यात यावी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ D/

**पृ. शी.** :लोकप्रशासन हा विषय इयत्ता 11 वी व 12 वीसाठी अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची आवश्यकता

**मु. शी.** :लोकप्रशासन हा विषय इयत्ता 11 वी व 12 वीसाठी अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची आवश्यकता याबाबत श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्य श्री. विक्रम काळे यां-ी ए□ विशेष उल्ले□ाची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

" देशामध्ये व राज्यामध्ये आपण लोकशाही स्वीकारलेली आहे. देशात संसद व राज्यात विधानमंडळ ही कायदेमंडळे अस्तित्वात आहेत. उद्याचे या देशाचे आधारस्तंभ ज्यांना म्हणतो त्या विद्यार्थ्यांना लोकशाहीची, प्रशासनाची ओळख व्हावी, माहिती व्हावी यासाठी उच्च शिक्षणामध्ये आम्ही राज्यशास्त्र व लोकप्रशासन हे विषय अभ्यासक्रमासाठी स्वीकारले एवढेच नव्हे तर संबंधित विषयात संशोधनाची सुविधासुध्दा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिली व विशेष म्हणजे विधान परिषदेमार्फत राष्ट्रकुल संसदीय मंडळ दरवर्षी हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्रातील विद्यापीठांतर्गत लोकप्रशासन व राज्यशास्त्र हा विषय अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासवर्ग आयोजित करते व आजही तो सुरु आहे. तर दुसरीकडे हा विषय इयत्ता 11 वी व 12 वी साठी अभ्यासक्रमात समाविष्ट करावा यासाठी विद्यार्थ्यांना आंदोलने करावी लागतात. ही खेदाची बाब वाटते. तेव्हा तातडीने लोकप्रशासन हा विषय शालेय शिक्षण विभागाने इयत्ता 11 वी 12 वी साठी अभ्यासक्रमांत समाविष्ट करावा. ही बाब मी या विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे."

सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी याबाबतीत उत्तर दिले तर बरे होईल.

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी लगेच उत्तर देण्याची गरज नाही. याबाबत योग्य ती उपाययोजना करावी अशी मी त्यांना सूचना करतो.

प्रा. वसंत पुरके : ठीक आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विदर्भामध्ये संगमरवर दगडाचा चांगला साठा उपलब्ध असताना ग्रॅनाईट व सजावटीसाठी असणाऱ्या दगडांबाबत असलेल्या किचकट धोरणामुळे महसुलाचा फायदा इतर राज्यांना होणे.

**मु. शी.** :विदर्भामध्ये संगमरवर दगडाचा चांगला साठा उपलब्ध असताना ग्रॅनाईट व सजावटीसाठी असणाऱ्या दगडांबाबत असलेल्या किचकट धोरणामुळे महसुलाचा फायदा इतर राज्यांना होणे याबाबत श्री. सय्यद जामा वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्य श्री. सय्यद जामा यां-ी ए□ विशेष उल्ले□ाची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री. सय्यद जामा ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"डायरेक्टरेट ऑफ जीऑलॉजीकल अँड मायनींग यांच्या पाहणीनुसार विदर्भामध्ये संगमरवर दगडाचा अतिशय चांगला साठा उपलब्ध असणे, परंतु इतर राज्यांच्या तुलनेत ग्रॅनाईट व सजावटीसाठी असणाऱ्या दगडांबाबतीत असलेली धोरणे खूपच किचकट आहेत. परिणामतः राज्यांच्या खाणींच्या भाडे तत्वाने देण्याच्या धोरणात त्रुटी आढळून येत असल्याने महसुलाचा फायदा इतर राज्यांकडे चालला असल्याने या बाबीवर तातडीने उपाययोजना करावी, याकरिता हा विषय विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित करु इच्छितो."

सभापति महोदय, जीऑलॉजीकल सर्वे ऑफ इंडिया और डायरेक्टरेट ऑफ जीऑलॉजीकल ॲंड मायनींग के सर्वे के अनुसार विदर्भ में बहुत अच्छा और कीमती मार्बल उपलब्ध है. लेकिन अन्य राज्य की तुलना में ग्रेनाईट एवम् सजावट के लिए लगने वाले स्टोन के बारे में महाराष्ट्र की नीति लचीली न होने के कारण अन्य राज्यों को फायदा हो रहा है. मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश एवम् अन्य राज्यों के उद्योगपति यहां पर आकर मार्बल को लीज पर ले लेते हैं जिसके कारण विदर्भ एवम् महाराष्ट्र सरकार को फायदा नहीं हो रहा है. इसलिए मैं इस विशेष उल्लेख के माध्यम से सरकार का इस ओर ध्यान आकर्षित करना चाहता हूं कि मार्बल के बारे में सरकार लीज संबंधी अच्छी नीति बनाए जिससे मायनिंग और मार्केटिंग की दृष्टि से विदर्भ को फायदा होगा और सरकार को भी रेवेन्यू मिलेगा. इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

यानंतर XX-1

**पृ. शी.** : मुंबईचा सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत)
(सुधारणा विधेयक) विधेयक.

**L.C.BILL NO. VIII OF 2007**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY GOVERNMENT PREMISES (EVICTION) ACT, 1955.)**

ॲड. प्रीतमकुमार शेगावंकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 8 मुंबईचा सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) अधिनियम, 1955 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 8 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एका तातडीच्या आणि गंभीर विषयाकडे मी या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. मागील 4 दिवसापासून मराठा समाजाला ओ.बी.सी. मध्ये समाविष्ट करावे या मागणीसाठी संभाजीब्रिगेडच्या लोकांचे आमरण उपोषण सुरु आहे. त्यातील 4 लोकांची तब्येत बिघडली आहे. काल संध्याकाळपासून त्यांनी राज्यभर आंदोलन करण्यास सुरुवात केली आहे. जाळपोळ, एस.टी.च्या काचा फोडणे असे प्रकार सुरु आहेत. पाच-सहा जिल्ह्यामध्ये हे आंदोलन पेटलेले आहे. वर्तमानपत्रातून मी असेही वाचले आहे की, पुढील आठवड्यापासून ते लोकप्रतिनिधींना फिरु देणार नाहीत. मागील 6-7 महिन्यापासून ते हा प्रश्न शासन दरबारी मांडत आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांची देखील त्यांनी भेट घेतलेली आहे. विदर्भ आणि कोकणातील कुणबी समाजाला ओबीसी समजण्यात येते. परंतु मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील कुणबी समाजाला ओ.बी.सी. समजण्यात येत नाही. परंतु त्यांचे रोटी-बेटीचे व्यवहार सुरु आहेत. या त्यांच्या मागणीसाठी त्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतलेला असल्यामुळे तेथे शासनाचा कोणी तरी प्रतिनिधी जाऊन त्यांच्याशी चर्चा करुन उपोषण थांबविले पाहिजे. अन्यथा राज्यभर हे आंदोलन पेटेल. म्हणून ही अतिशय तातडीची बाब मी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. सभापती महोदय, आपण शासनाला या बाबतीत निर्देश दिले तर आंदोलन थांबण्यास मदत होईल.

श्री. उल्हास पवार : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय महत्वाचा आणि तातडीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. सर्व समाजामध्ये जो गरीब माणूस आहे त्याच्या मनामध्ये हीच भावना निर्माण झालेली आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्या प्रमाणे त्यांचे सर्व रोटी-बेटी व्यवहार सुरु आहेत. नाशिकपर्यन्त या कुणबी समाजाला ओ.बी.सी.म्हणून सवलती मिळतात. परंतु पुण्यापासून पुढे सांगली, कोल्हापूरपर्यन्तच्या भागातील कुणबी समाजाला ओ.बी.सी.म्हणून सवलती दिल्या जात नाहीत. म्हणून या प्रश्नाचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अन्यथा प्रत्येक जिल्ह्यामध्ये याचे दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे.

**उपसभापती** : आदरणीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आता एक अत्यंत महत्वाचा मुद्दा सभागृहाच्या निदर्शनास आणलेला आहे. सन्माननीय सदस्य उल्हास पवार यांनी देखील त्यांच्या मुद्याला सहमती दिली आहे. ....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**.....

या संदर्भात ही सर्व मंडळी उपोषणाला बसली आहेत, हे उपोषण आणि त्या संदर्भात असलेला विषय हा निश्चितपणे अत्यंत महत्वाचा आहे. याबाबत शासनाकडून सखोल अभ्यास आणि त्याची चौकशी होणे आवश्यक आहे. या संदर्भात योग्य ती चौकशी आणि अभ्यास करुन मग शासन योग्य तो उचित निर्णय घेईल. परंतु मला या संदर्भात शासनाला सुचवावेसे वाटते की, आज सायंकाळी 5.00 च्या अगोदर शासनाच्या वतीने सन्माननीय मंत्रीमहोदयांनी या उपोषणकर्त्यांची भेट घ्यावी, त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे आणि या संदर्भात चर्चा करण्याकरीता राज्य शासनाला आपला स्वत:चा अहवाल द्यावा. शासन हे शासनाचे काम करीत असते. हे सभागृह सर्व सन्माननीय सदस्यांचे सभागृह आहे. सर्वपक्षीय सदस्य याठिकाणी बसत असतात. राज्याचे धोरणही ठरवित असतात. हे सभागृह कायदेमंडळ आहे. त्यामुळे मला असे वाटते की, आपल्या सर्वांचा प्रतिनिधी म्हणून शासनाचे जे कोणी मंत्रीमहोदय त्याठिकाणी जातील त्यांच्यासमवेत मी देखील त्या उपोषणकर्त्यांच्या भेटीसाठी यायला तयार आहे. साधारणत: सायंकाळी 5.00 च्या अगोदर जी वेळ सोयीची असेल ती मला अवगत करावी. मी या सभागृहाच्या वतीने, सन्माननीय सदस्यांच्या वतीने उपोषणकर्त्यांची भेट घ्यायला शासनाच्या मंत्रीमहोदयांसमवेत जाण्यास तयार आहे. या संदर्भात शासनाने ताबडतोब सभागृहाला अवगत करावे अशी मी विनंती करतो.

श्री.बाळासाहेब थोरात : होय.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता सभागृहाचे कामकाज थांबविण्यात यावे व उर्वरित कामकाजासाठी सोमवार, दिनांक 26 नोव्हेंबर, 2007 रोजी सकाळी विशेष बैठक घ्यावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, उर्वरित कामकाजासाठी सोमवार, दिनांक 26 नोव्हेंबर, 2007 रोजी सकाळी विशेष बैठक घेण्यात यावी.

श्री.बाळासाहेब थोरात : शासनाची संमती आहे.

**उपसभापती** : मी आपल्याला एकच विनंती करतो, मी या सभागृहाच्या भावना माननीय सभापतींच्या निदर्शनास आणून देतो. दुपारी 3.30 वाजेपर्यंत मला वेळ द्यावी. मी सन्माननीय सभापतींना याबाबत विनंती करीन आणि नंतर सभागृहाची बैठक तहकूब करण्याबाबतचा निर्णय घेईन. मी सभागृहाची बैठक दुपारी 3.30 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 13 मिनिटांनी दुपारी 3.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भातील नियम 97 अन्वयेचा जो प्रस्ताव आहे त्या प्रस्तावावर सोमवारी सकाळी 10.30 ते 12.30 यावेळेत चर्चा घेण्यात येईल. आता अशासकीय कामकाज घेण्यात येईल.

----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाज**

**पृ. शी.** : मोटार वाहन ( महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. IX OF 2007

( A BILL FURTHER TO AMEND THE MOTOR VEHICLES ACT, 1988, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 9- मोटार वाहन अधिनियम, 1988 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 9 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : घरेलू कामगार (कल्याण व सेवाशर्ती ) विधेयक.

L.C. BILL NO. X OF 2007

( A BILL TO PROVIDE FOR GRANTING CERTAIN FACILITIES, AMENITIES AND TO COVER ALL DISPUTES RELATING TO DOMESTIC WORKERS AND TO RECOGNISE THEM AS BEING WITHIN THE FOLD OF WORKING CLASS AND TO IMPROVE THEIR WORKING CONDITIONS AND GIVE THEM ACCESS TO COURTS IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 10 - महाराष्ट्र घरेलू कामगारांना काही सवलती आणि सोयी पुरविणे आणि त्यांच्याशी संबंधित सर्व विवादांचा समावेश करणे आणि कामगार वर्ग म्हणून त्यांना मान्यता देणे आणि त्यांच्या कामाच्या स्थितीमध्ये सुधारणा करणे आणि महाराष्ट्र राज्याच्या न्यायालयांमध्ये त्यांना दाद मागता येईल अशी व्यवस्था करणे यांसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 10 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----------

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा ) विधेयक.

L.C. BILL NO. XI OF 2007

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOKAYUKTA AND UPA LOKAYUKTAS ACT, 1971.)

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 11- महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, 1971 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 11 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अन्न व भेसळ प्रतिबंध विधेयक

L.C. BILL NO. XII OF 2007

( A BILL FURTHER TO AMEND THE PREVENTION OF FOOD ADULTERATION ACT, 1954, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांचे आहे. ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आपण मला ते विधेयक मांडण्याची परवानगी द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : विधेयक मांडण्याची परवानगी देण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 12- अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम, 1954 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.प.वि.क्र.7 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**..............

सभा□ृहापुढील □म□ाज संपलेले आहे. सभा□ृहाची बैठ□ आता स्थ□ि□ होऊ-न सोमवार, दि-नां□ 26 नोव्हेंबर, 2007 रोजी स□ाळी 10.30 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.30 ते 12.30 पर्यंत विशेष बैठक होईल. या विशेष बैठकीमध्ये "विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झ ाालेल्या आत्महत्या" विषयावर चर्चा होईल. सभागृहाचे नियमित कामकाज दुपारी 1.00 वाजता सुरू होईल.

( सभा□ृहाची बैठ□ दुपारी 3 वाजू-न 36 मिनिटांनी, सोमवार,
दि-नां□ 26 नोव्हेंबर, 2007 रोजीच्या स□ाळी 10.30 वाजेपर्य-त स्थ□ि□ झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही